
# हाकारा

वर्ष तिसरे, अंक पहिला
१९८२



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| **अध्यक्ष** | गं. बा. सरदार |
| **उपाध्यक्ष** | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| **चिटणीस** | रा. के. मुटाटकर |
| **सहचिटणीस** | जगदीश गोडबोले |
| | विजय भानू |
| **खजीनदार** | अनिल गोरे |
| **सभासद** | गोविंद गारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | थियो रेमिडियोस |


## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनुताई वाघ |
| सुधा काळदाते | विलास संगवे |
| विजय तेंडुलकर | वाहरु सोनवणे |
| वि. म. दांडेकर | गीता साने |
| मधुकर देवल | छाया सुरतवंती |
| चित्रा नाईक | दत्ता सावळे |

आ. ना. नारळकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा



(महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक)

## अनुक्रमणिका


संपादकीय ... २

अमेरिकेतील रेड इंडियन्स
**अरुण लिमये** ... ३

वनवस्थापनाची पारंपरिक पद्धत : बदल आवश्यक आहे काय ?
**दु. अ. मरबल्ली** ... ६

हिमालयातील पर्यावरणाची अभ्यास-पहाणी मोहीम ... ९

चंद्रपूर जिल्ह्यातील वैशिष्टयपूर्ण जमात
**सुलभा ओगले** ... ३३

जंगल वाचवा (कविता)
**किशोर देशपांडे** ... ३५

डोक्शामागून येणारी कविता
**भारत सातपुते** ... ३६

काठेवाडी गवळ्यांमुळे निर्माण झालेल्या समस्या
**मनोहर राजर्षि** ... ३७

रोजगार हमी योजनेतील एक अनुभव
**वि. नी. भावे** ... ४०

पुस्तक परिक्षण (मेजर डॅम्स्)
**सुभाष लेले**

तुजे नाव काय (कविता)
**आनंदा बनकर** ... ४४



वर्ष तिसरे : अंक पहिला
जानेवारी–मार्च १९८२
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : १५ रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये



पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद / हाकारा
द्वारा : जगदीश गोडबोले
सीमा, ब ७, शिरोळे मार्ग,
**पुणे ४११००४.**



**कार्यकारी संपादक**
जगदीश गोडबोले

**संपादक मंडळ**
रामचंद्र मुटाटकर
शरद कुलकर्णी
भाऊ मांडवकर



प्रकाशक : प्रा. रा. के मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.

मुखपृष्ठ कल्पना :
जगदीश गोडबोले.

रेखांकन : दिलीप भंडारे

संपादकीय

'हाकारा'चा तिसऱ्या वर्षीचा प्रथम अंक प्रसिद्ध करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

वनसवर्धनाच्या व पर्यायाने पर्यावरण–रक्षणासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाकडे लोकांचे, विशेषतः कार्यकर्त्यांचे लक्ष वेधावे म्हणून 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद' प्रयत्नशील आहे. त्यासाठी वन कर्मचारी व कार्यकर्ते यांची संयुक्त बैठक, नाशिक वन-विभागाचा अभ्यास-दौरा, हाकारा'च्या वन-संवर्धन विशेषांकांचे प्रकाशन (जुलै १९८० व जुलै १९८१) इत्यादी उपक्रम परिषदेने आयोजित केले होते.

या उपक्रमाचाच एक भाग म्हणून हिमालयाच्या गढवाल कुमाऊँ (उत्तराखंड) विभागात एक अभ्यास-मोहीम आयोजित करण्याचा प्रयत्न 'परिषद' गेली दोन वर्षे करीत होती. केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाकडे अनुदानासाठी अर्ज केला होता. दीर्घ कालावधीनंतर अखेर अंशतः अनुदान मिळाले व इतर अनेक अडचणी पार करून १ते२३ मार्च या कालावधीमध्ये मोहीम यशस्वीपणे पार पडली. मोहीमेचा अहवाल अंकात प्रसिद्ध करीत आहोत.

मोहिमेच्या कल्पनेला उत्तम प्रतिसाद मिळाला व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील दलित आदिवासींमधे काम करणारे कार्यकर्ते व इतर पर्यावरण प्रेमी यांनी मोहिमेत सहभाग घेतला. सुमारे वीस सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते यामध्ये होते. वनसंवर्धनाचा सर्वांगीण व समतोल विचार करणारी आणि त्याप्रमाणे कृति करणारे कार्यकर्ते, अभ्यासक यांची एकसंघ फटी यातून निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. संकल्पित वन-विधेयकाबद्दल साधकबाधक चर्चा करून जनमत तयार करण्याचा प्रयत्न काही सामाजिक संस्था राष्ट्रीय स्तरावर करीत आहेत. परिषद राष्ट्रीय स्तरांवरील अशा प्रयत्नांचाहि मागोवा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. आपल्या सूचना अवश्य कळवाव्या. 'हाकारा'च्या नवीन वर्षाच्या वाटचालीत नेहमीप्रमाणेच आपली साथ मिळावी ही आशा व विनंती.


## महंमद आणि पर्वत

'हाकारा'ची वार्षिक वर्गणी गेल्या अंकाबरोबरच संपली. अनेकदा केवळ विस्मरणामळे अथवा कामाच्या गडबडीमुळे परत वर्गणी पाठवायचे राहून जाते. म्हणूनच आम्ही जुन्या सभासदांना गेल्या अंकाबरोबच मनी ऑर्डर फॉर्म भरून पाठवला होता. वर्गणीचे नूतनीकरण अजून बाकी आहे अशा वाचकांनी वर्गणी लवकर पाठवावी ही विनंती.

**हाकारा/परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी फक्त वीस रुपये.**

**नवीन पत्ता : द्वारा जगदीश गोडबोले,**
**सोमा, ब ७ शिरोळे, मार्ग,**
**पुणे ४११००४.**

# अमेरिकेतील रेड इंडियन



अरुण लिमये

अमेरिकन म्हटले की डोळ्यापुढे जो चेहरा उभा राहतो तो उंच, धिप्पाड-गोऱ्या माणसाचा. पण हा युरोपियन गोरा साहेब १४९२ साली अमेरिकेत प्रथम उतरला आणि त्याने गुलाम म्हणून आपल्याबरोबर आफ्रिकेतील काळे निग्रोही आणले. हे दोन्ही वंश तसे परकेच. अमेरिकन भूमीचे मूळ मालक म्हणजे रेडइंडियन. हे आदिवासी आपल्या देशाला होंडाह (Hondha) या नावाने ओळखत. याचा अर्थ सुस्वागतम असा आहे. कोलंबसाने अमेरिका हे नाव प्रथम दिले.

कोणे एके काळी सर्व अमेरिका खंडभर विखुरलेले हे रेडइंडियन आज नवा-जोनेशन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात गोऱ्यांनी कोंबले आहेत. न्यू मेक्सीको, ॲरिझोना, कॅलीफोर्निया या भागातही हे आदिवासी रहातात. अमेरिकन माणूस चंद्रावर उतरला पण अद्याप या रेडइंडियनांची मूळ संस्कृती काय असते ते पहाण्यासाठी सामान्य अमेरिकनांचे एक पाऊलही आदिवासींच्या सांस्कृतिक जगात पडले नाही. अंतराळातील हजारो मैलांची अडचण आज वाटत नाही. पण दोन भिन्न संस्कृतीतील दुराव्याचे अंतर कमी करणे ही अति कठीण बाब आहे.

जगाच्या उत्पत्तीबद्दल एक लोकविलक्षण लोककथा अमेरिकेत प्रचलित आहे लाखो वर्षापूर्वी काळे जग होते. लढाईनंतर ते निळे बनले. त्यावेळी आकाशात पूर्व दिशेला भगदाड पडले. या निळ्या जगाचे पिवळे जग झाले, त्यावेळी दक्षिणेकडे आकाश फाटले. याचवेळी जगात स्त्री व सर्वज्ञ माणसाचा जन्म झाला. या पिवळ्या जगात ४ पर्वत होते आणि एक पाणराक्षस. तो माणसांवर रागावला. आणि त्याने माणसांची मुले पळविली. महाप्रलय झाला, त्यावेळी वेलीच्या सहाय्याने चौथे जग निर्माण झाले. परत परत पूर आले. शेवटी पाणराक्षस निवळला त्याने मुले परत केली आणि पाचव्या जगाची म्हणजेच नवाजोनेशनची अमेरिकनांकरता निर्मिती केली, अशी कथा आहे.

रेडइंडियन चेहऱ्यावरून ओळखता येतो. त्याचा चेहरा आशियाई आहे. वंशशास्त्रदृष्ट्या याला 'मंगोलॉईड फेस' म्हणतात. जगाचा नकाशा नीट न्याहाळून पाहिला, तर आशिया खंडातील रशियाचा सैबेरिया प्रांत व अमेरिका खंडातील अलास्का प्रांत हे एकमेकांच्या फार जवळ असल्याचे लगेच लक्षात येते. हजारो वर्षांपूर्वी जेव्हा या ठिकाणातील समुद्र गोठून बर्फाची जमीन तयार झाली. त्यावेळी मूळ आशियातून निघालेला मनुष्यप्राणी सैबेरियाअलास्का मार्गे अमेरिका खंडात आला असावा. हे आदिमानव फक्त बोलीभाषा वापरीत, चित्रे काढीत व खुणांनी एकमेकांना भूक लागली, तहान लागली, शत्रू आला या भावना कळवीत. आजही अमेरिकेत काही ठिकाणी ही खुणांची भाषा चालते.

## न संपणारी रात्र

हा माणूस एवढा साधा होता की, तो जमिनीला आपली काळी आई मानी. जमिनीत लोखंडी नांगर चालवायला तो भीत असे. ही जमीन सर्व समाजाच्या मालकीची व त्यात भरपूर पिकणारा मका सर्वांना पुरून उरत असे. १४९२ मध्ये जेव्हा कोलंबस अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरला, तेव्हा हे भोळे लोक त्याला देवच समजले. हा गोरा दाढीवाला अमेरिकेच्या प्रदेशावर

अवतरला त्यावेळी पहाट फुटली असे त्यांना वाटले. पण प्रत्यक्षात त्याच क्षणापासून युरोपियन संस्कृतीचे आक्रमण त्यांच्या आदिम संस्कृतीवर झाले व एका अंधाऱ्या, न संपणाऱ्या रात्रीला सुरुवात झाली.

अमेरिकेत उतरलेल्या या युरोपियनांनी बंदुकीची दारू, पिण्याची दारू आणि घोडा या अप्रुप गोष्टी रेडइंडियनांना दाखविल्या. पण ही देणगी फारच महाग पडली. कारण या वस्तुंबरोबरच युरोपियनांनी गोवर, कांजिण्या, टायफॉईड, जुलाब या रोगांचे जंतुही आपल्याबरोबर आणले. कोलंबस येथे आल्यानंतर ३ वर्षाच्या आतच रेडइंडियनांमध्ये या साथीच्या रोगांची लाट पसरली व ९० टक्के रेडइंडियन त्यात मृत्युमुखी पडले. चिवट होते ते तगले. युरोपियनांनी त्यांच्याकडून बटाटा, मका याची शेती कशी करावी त्याचे शिक्षण घेतले. काही औषधी वनस्पतीही त्यांनी युरोपमध्ये नेल्या.

आज जगभर धुम्रपानाचा प्रसार झाला आहे. जगप्रसिद्ध व मोठमोठ्या सिगरेट कंपन्याही अमेरिकनच आहेत. तंबाखूच्या धुराने जगभरचे वातावरण दूषित करणारे धुम्रपान रेडइंडियनांनीच जगाला शिकवले. तंबाखूचा शोध युरोपियनांना देऊन एका अर्थाने रेडइंडियन्सनी त्यांच्यावर सूड उगवला.

## मिशनरींची रीघ

पुढे काही शतके या रानटी माणसांना ' माणसाळविण्यासाठी ' मिशनरींची रीघ सुरू झाली. युरोपातील स्पेन देशात या आदिवासींना गुलाम म्हणून विकण्यात येऊ लागले. फ्रान्समधील स्त्रियांना उबदार केसांच्या प्राण्यांची कातडी पांघरणे फॅशन म्हणून आवडू लागले. अशी फर विकत घेण्यासाठी फ्रेंच व्यापाऱ्यांची रीघ या मुळच्या अमेरिकनांकडे लागली.

युरोपच्या व्यापाऱ्यात फ्रेंच व ब्रिटीश सत्ता यांच्यात परस्परात युद्धे होत व त्याचे पडसाद त्यांच्या वसाहतीत उमटत. १८१२ साली झालेल्या अशा एका युद्धात रेडइंडियनांनी इंग्रजांना मदत केली होती. इतर वेळी ते तटस्थ रहात असत. अमेरिकेत फ्रेंचांचा पाडाव होऊन इंग्रजांची सत्ता प्रबळ बनली. अमेरिकन क्रांतिच्या वेळी मात्र रेडइंडियनांनी इंग्रजांना मदत केली.

याचे फळ मात्र अमेरिकेच्या प्रेसिडेंट अॅन्ड्रयू जॅक्सन याने त्यांना पुरेपुर दिले. रेडइंडियनद्वेष्टया या माणसाला सर्व रेडइंडियनांना ' शार्प नाईफ ' किंवा अणकुचीदार चाकू ' या नावानेच ओळखत. त्याने अमेरिकन लष्कराच्या मदतीने सर्व खंडातील रेडइंडियनांना मिसिसीपी नदीच्या पश्चिमेस हाकलून दिले. मिसीसीपी या शब्दाचा


# जेव्हा माणूस माग काढतो

**अनौपचारिक शिक्षण व जाणीव जागृतीचे प्रशिक्षण.**

(ट्रेस या इंग्लीश पुस्तकाचे भाषांतर)

सामजिक कार्यकर्त्यांसाठी व्यवहार उपयोगी संदर्भ पुस्तक.

सुधारित व विस्तारित आवृत्ती.

सामाजिक न्याय व बदलसाठी संघर्षात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांनी वाचलेच पाहिजे असे—

इंग्लीश व मराठी दोन्ही भाषेत मिळू शकते.

पाने : २३१

**देणगी मूल्य** : साधी बांधणी— रु. १७.०२

लायब्ररी आवृत्ती— रु. २४.००

(पोस्टेज व पॅकेजिंगचा खर्च वेगळा)

संपर्क : जनसेवा मंडळ, कोरीट रोड, नंदुरबार, जि. धुळे, ४२५४१२

टिप : १. व्ही. पी. पी. ने पुस्तके पाठवू शकतो.

२. पंचवीस किंवा त्यापेक्षा जास्त प्रतिची ऑर्डर दिल्यास १०% सूट दिली जाईल.

मूळ अर्थ 'पाण्याचा पिता.' या महानदीच्या पश्चिमेकडील सारी जमीन रेडइंडियनांची, असा करारही त्याने केला. परंतु पुढे अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर कॅलीफोर्निया, टेक्सास या प्रांतात जसेजसे सोने सापडू लागले तसे, त्या सोन्यासाठी प्रचंड प्रमाणात 'गोल्डरश' सुरू झाला. या आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठी मुळची ही शांत जमात क्षात्रप्रवृत्तीची बनली.

रेडइंडियनांमध्ये 'मोंटांना' नावाची जमात आहे. काळे पाऊल आणि कावळा नावाच्या जमाती यात मोडतात. त्यांच्यातील 'अपाचे' ही जमात अमेरिकेन सिनेमांनी जगप्रसिध्द करून सोडली आहे. 'अपाचे' याचा अर्थ 'शत्रू'. कोटा प्रांतात 'सिडक्स' नावाचे आदिवासी रहातात. अमेरिकेच्या उत्तर भागात एस्किमो नावाचे आदिवासी रहातात. ते अद्यापही कच्चे मांस खातात व खाजगी मालमत्ता मानीत नाहीत. अतिउदार अंतःकरणाची ही माणसे आपल्या पाहुण्यांचा जगावेगळा सत्कार करतात व रात्री स्वतःची पत्नी अतिथीला भेट म्हणून देतात.

या आदिवासींची उतेह नावांची जमात घोडयावर बसण्यात निष्णात. युरोपियानांना घोडे पळविणाऱ्या उतेहांचा फार दरारा वाटे. संरक्षणासाठी किल्ले बांधण्याची कला या लोकांनी आत्मसात केली व कोलोराडो प्रांतात असे किल्लेही बांधले.

युरोपियनांनी आपला असा समज करून घेतला की आपण, या आदिवासींचे पालक आहोत. म्हणून त्यांना शिस्त लावून सुधारण्यासाठी त्यांनी रेडइंडियनांना रिझर्व्हेशन्समध्ये कोंबले.

ही रिझर्व्हेशन्स म्हणजे गुन्हेगारांना कोंडायच्या छावण्यांच्या स्वरूपाची असत. त्यातील रहिवाश्याला गोटा करून घेणे आवश्यक धरले जाई. काटेरी कुंपण छावणीभोवती असे. ओगान नावाच्या जुन्या लाकडी घरात हे रेडइंडियन रहात. त्याचे वैशिष्टय म्हणजे घरांचा रंग पांढरा, पिवळा, तपकिरी किंवा लाल असे, त्याची सर्व दारे पूर्वेला असत. अमेरिकेच्या सर्व जमिनीचे 'रेडइंडियन' हे मूळ मालक. परंतु उदार बनल्याचा आव आणून अमेरिकनांनी या जमिनीचे तुकडे रेडइंडियनांना कसायला दिलेत. रेडइंडियन बायका शेती कसीत.

## देणगी

मातीची भांडी, रग्ज, भरतकाम, विणकाम, टोपल्या करणे, दागिने घडविणे चांदीकाम यात रेडइंडियनांच्या निराळ्या संस्कृतीचा ठसा उमटला आहे. रंगीबेरंगी पक्षांची पिसे. त्यांच्यापासून केलेल्या टोप्या व कपडे. हे रेडइंडियनांचे खास वैशिष्टय. 'स्टिकबॉल' हा या आदिवासींचा खेळाचा प्रकार. हातातल्या रॅकेटला 'काबुचा' म्हणत. कितीही माणसांचा संघ बनविता येत असे. दोन प्रतिस्पर्धी संघ एकमेकांवर गोल चढवीत या मुळ खेळापासूनच हॉकी, बॅडमिंटन, टेनिस हे खेळ अमेरिकनांनी जगाला दिले.

संगीत आणि नाच ही फांका जीवनाची अविभाज्य अंगे आहेत. 'पाऊवाऊ' नावाचा सर्व जमाती एकत्र येण्याचा एक समारंभ असतो. त्यावेळी बासरी, ड्रम यांच्या सहाय्याने रात्रभर संगीत चालते.

एकदा नाच सुरू झाला, की मग तो दिवसेंदिवस चालतो. या नावाचे विविध प्रकार असतात. विजय नाच, भुताचा नाच, म्हैस नाच, सर्प नाच, पिसाळलेल्या कुत्र्याचा नाच असे विविध प्रकार आहेत.

रेडइंडियनांच्या धार्मिक समारंभात करमणुकीचा भाग नसतो. त्यामुळे पाहुण्यास हे समारंभ बघायला मिळतीलच असे नाही. उलट हिंदुस्थानात हिंदूंच्या धार्मिक विधीस समारंभाचेच स्वरूप प्राप्त झाल्याने कोणी परदेशी पाहुणे अशा प्रसंगी आले, तर हौसच वाटते. रेडइंडियनांच्या मुलांच्या खेळण्यात चक्राचा वापर आढळतो. पण, प्रत्यक्ष जीवनात या चक्राचा वापर रेडइंडियनांनी केला नाही.


'माऊंड' नावाच्या टेकडया अमेरिकेतील काही भागात आढळतात. त्या मनुष्यनिर्मित असतात. याच्या पायथ्याशी टोळीप्रमुखाच्या राजवाडयाचे अवशेषही काही ठिकाणी आढळतात. ईजिप्तमध्ये जसे पिरॅमिडस् तसे या आदिवासींचे माऊंड! मेक्सिको प्रांतात ३००० वर्षापूर्वीची माऊंड सापडली आहे. यांचा उपयोग एकतर देऊळ म्हणून किंवा मेल्यानंतर स्मशानभूमी म्हणून करीत असावे. अनेक माऊंडस्मध्ये उत्खननानंतर हाडांचे सापळे मिळाले.

## भाषेचा वापर जादूसाठी

भाषेचा अर्थापेक्षा जादूसाठी उपयोग पूर्वी अधिक होत असे. चित्रलिपितून चिन्हलिपीपर्यंत पोहोचायला अनेक वर्षापर्यंतचा काळ गेला. चेरोकीसेवाचा याने काही चिन्हे शोधून काढली. ज्याचा वापर निरनिराळ्या जमाती एकत्रितपणे करू लागल्या.

(पान नं. ४५ वर पहा)

# वनव्यवस्थापनाची पारंपरिक पद्धत : बदल आवश्यक आहे काय ?



दु. अ. मरबल्ली

नाशिक येथे वनविकास महामंडळाची स्थापना होऊन जवळ जवळ सात वर्षे उलटली आहेत. तथापि वनविकास महामंडळाच्या ध्येय धोरणांबद्दल व एकंदर कार्यक्रमाबद्दल बुद्धिवंत, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, निसर्गप्रेमी मंडळी व आदिवासी कार्यकर्त्यांमध्ये शंकेचे वातावरण काही प्रमाणात अजून आढळून येत आहे.

माझे मित्र डॉ. विजय बिडकर यांना जंगलांबद्दल व तेथे राहणाऱ्या आदिवासी बांधवांबद्दल विशेष प्रेम व सहानुभूति आहे त्यांचे प्रांजल मत असे आहे की, वनविकास महामंडळाने पेठ येथील जंगलात पारंपारिक वनव्यवस्थापन पद्धतीत मोडणाऱ्या सिलेक्शन पद्धतीचा (ठराविक मोठी वाढलेली झाडेच तोडायची) अवलंब करावा जेणेकरुन जंगलांचा नाश होणार नाही. त्यांची ही सूचना फार महत्वाची असून सकृतदर्शनी सुयोग्य अशीच वाटते. तथापि या विषयाचा विज्ञानाच्या दृष्टिकोनातून सखोल व सर्वंकश विचार करणे समाजाच्या किंबहुना जंगलात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या प्रबोधनाच्या दृष्टिने उपयुक्त ठरेल.

## सिलेक्शन पद्धतीचा स्वीकार

"सिलेक्शन पद्धति" सारख्या पारंपरिक वनव्यवस्थापन पद्धतीचा, युरोप खंडात मुख्यत्वे जर्मनीमध्ये सुमारे दीडशेवर्षापूर्वी शोध लावला गेला. पुढे भारताचे पहिले इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट म्हणून डॉ. ब्रॅन्डीस ह्या जर्मन शास्त्रज्ञाची नेमणूक १८६४ मध्ये झाली. त्यांनी येथील जंगलाचा प्रदीर्घ अभ्यास व निरीक्षण केले. त्यावेळची परिस्थिती खालील प्रमाणे होती.

(१) एकूण लोकसंख्या अत्यल्प होती व लोकांच्या वनोपजाच्या गरजा पण जुजबीच होत्या. त्यामानाने भारताचा बराच मोठा भाग जंगलाने व्यापलेला होता.

(२) जंगलामध्ये वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या व पूर्ण वाढ झालेल्या मोठ्या झाडांचे प्रमाण मुबलक होते व उभी परिपक्व व जुनाट झाडे, ज्यांची वाढ खुंटलेली होती अशी झाडे प्रथम तोडण्याची गरज होती.

(३) जंगलामध्ये विविध जातीचे अनेक वृक्ष होते. परंतु त्यापैकी सागवान, शिसम सारख्या एक दोनच मौल्यवान व उपयुक्त जाती सोडल्या तर इतर जातीच्या झाडांना बाजारात अजिबात मागणी नसल्यामुळे अशी झाडे तोडणे अर्थिकदृष्टया परवडणारे नव्हते. किंबहुना तोडण्याचा खर्चही त्यातून निघत नसे. म्हणून अशी तोडलेली झाडे जंगलातच सोडावी लागत असत.

(४) जंगले बहुतेक घनदाट असून त्यात सर्व वयांचे मुख्यत्वेकरुन नैसर्गिकरित्या पुन्हा उगविलेल्या झाडांचे ( Natural Regeneration ) प्रमाण मुबलक असे. तसेच मोठी व जुनाट झाडे तोडलेल्या ठिकाणी बालतरुंची व मध्यम वयाच्या वृक्षांची झपाट्याने वाढ होत असे म्हणून मानव निर्मित रोपवने ( Plantation of man-made forest) तयार करण्याची गरज त्यावेळी भासली नाही.

वरील परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. ब्रॅन्डीस यांनी त्याकाळात युरोपात अस्तित्वात असलेल्या सिलेक्शन पद्धतीचा अवलंब भारतातील जंगल व्यवस्थापनात करावा असे सुचविले आणि हे योग्य होते. या पद्धतीचा अवलंब करताना डॉ. ब्रॅन्डीस यांनी एकंदर जंगलाची वाढ लक्षांत घेऊन मूळ मुद्दयाला हात न लावता त्यातून मिळणाऱ्या व्याजाइतकेच म्हणजे साधारण एकूण जंगलाच्या वार्षिक वाढीइतकेच मर्यादित लाकूड परिपक्व झाडांच्या रूपातून काढण्याची तरतूद केली. त्यावेळच्या

लाकडाची अत्यल्प मागणी लक्षात घेता ही पद्धत फार उपयुक्त ठरली. या पद्धतीत खर्च थोडा लागे व जंगलात निसर्गतः वाढलेल्या मोठ्या वृक्षांची संख्या मुबलक असल्यामुळे शासनाला निव्वळ आर्थिक उत्पन्न पण जास्त मिळे.

## भारतातील जंगलाची सध्याची स्थिती

जंगलाची १०० वर्षापूर्वीची परिस्थिती व आजची (सद्य) परिस्थिती यात जमीन आस्मानाचा फरक झालेला आहे.

(१) लोकसंख्येत बेसुमार वाढ झालेली आहे. तसेच शिक्षण प्रसारामुळे आणि राहणीमानात झपाट्याने बदल झाल्यामुळे लोकांच्या आशा आकांक्षा वाढल्या आहेत. याचा परिणाम म्हणजे लोकांच्या घरगुती व शेतीकरिता लागणाऱ्या वनोपजाच्या गरजा अनेक पटीने वाढल्या आहेत.

(२) औद्योगिक क्रांतीमुळे लोकांच्या वाढीव गरजा पुरविण्याकरिता वनाधारित उद्योगांची झपाट्याने वाढ होत आहे. अशा उद्योगांना सातत्याने लाकूड पुरविणे आवश्यक आहे.

(३) अन्नधान्य वाढीच्या मोहिमेकरिता प्रचंड जल-विद्युत प्रकल्पांच्या जलाशयांकरिता व विस्थापितांचे पुनर्वसन करण्याकरिता, खाणीच्या व उद्योगाच्या वाढी-करिता लाखो हेक्टर जंगल तोड करून हस्तांतरित झाले आहे. त्यामुळे जंगलाचे प्रमाण कमी होत चालले आहे.

(४) दुसऱ्या महायुद्धापासून शासकीय जंगलात चोरट्या तोडीचे प्रमाण पुष्कळ वाढलेले आहे आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे वाढत चालले आहे. त्यामुळे शासकीय जंगलातील झाडोरा विरळ होत चालला आहे. मालकी व जहागिरी जंगलात तर तूट होऊन जंगले नाश पावली आहेत.

(५) सरपण व फाट्यांच्या गरजा भागविण्याकरिता स्थानिक लोक लहान व होतकरू झाडोरा तोडून मोळ्या घेऊन जातात. तसेच पाळीव गुरांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याने जंगलात चरताना नैसर्गिक-रित्या येणारे बालतरू तुडविले जाऊन त्यांना इजा पोहोचते. गुराख्यांच्या हातचाळ्यांमुळे अनेक बाल-तरूंची नकळत हत्या घडते. डिंक गोळा करण्यास, मोहाची फुले गोळा करण्यास सुलभ व्हावे म्हणून जंगलाला मुद्दाम आग लावण्याची प्रथा अनेक ठिकाणी आढळून येते. त्यामुळे जंगलात उभी असलेली मोठी झाडे पोकळ होतात व ती झाडे इमारतीच्या कामाला निरूपयोगी ठरतात. यापेक्षा गंभीर परिणाम म्हणजे असंख्य होतकरू बालतरू आगीमुळे उध्वस्त होतात. अशा प्रकारे गुरांच्या अमर्याद चराईमुळे, आगीमुळे व अवैध तोडीमुळे बालतरूंचा नाश झाला आहे व तेथील जमिनीची पोत पण खालावली आहे व नवीन बालतरू नैसर्गिकरित्या उगवणे दुरापास्त झाले आहे.

(७) समशीतोष्ण कटीबंधात योग्य असलेली पारं-परिक सिलेक्शन पद्धती आपल्या येथील उष्णकटी-बंधातील रूंदपर्णी व पानझडी जंगलात (डेसिडियस फॉरेस्ट) लागू करण्यात काही महत्त्वाचे मुलभूत दोष आहेत व आजच्या जंगलाच्या खालावलेल्या स्थितीत ते प्रकर्षाने जाणवतात. सिलेक्शन पद्धत सूचिपर्णी जंगलांकरिता (कोनिफेरस फॉरेस्ट) जेथे छायाप्रेमी किंवा छायेत वाढणारी वृक्षांची जात आढळून येते, तेथे फार उपयुक्त ठरते. पण आपल्या रूंदपर्णी जंगलातील मौल्यवान व महत्त्वाची झाडे प्रकाशप्रेमी आहेत. म्हणून नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या बालतरूंची मोठ्या वृक्षांच्या सतत पडणाऱ्या छायेमुळे सूर्यप्रकाशाअभावी वाढ कुंठीत होते व म्हणून नैसर्गिक पुनरूत्पत्तीतून वृक्षरोपांचे (साग इत्यादि) प्रमाण जंगलात कमी आढळून येते.

(८) सिलेक्शन पद्धतीखाली जंगलाची पुनरूत्पत्ती-नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या रोपांवर अवलंबून असल्या-मुळे त्यात मौल्यवान वृक्षांच्या प्रमाणात वाढ करणे (तदनुषंगाने जंगल उत्पन्नात वाढ करणे) किंवा त्यावर नियंत्रण ठेवणे दुरापास्त होते.

## पारंपरिक पध्दत अयोग्य

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, आज आढळून येणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीत १०० वर्षापूर्वी असलेली पण आज कालबाह्य झालेली पारंपरिक वन-व्यवस्थापन पद्धती म्हणजे सिलेक्शन पद्धती चालू ठेवावी असा दुराग्रह धरणे हे सुयोग्य होणार नाही, कारण त्याची सिलेक्शन फेलींगमध्ये परिणती होईल. ज्यामुळे तोडलेल्या ठिकाणी नवीन जंगलांची निर्मिती न होता जंगल विरळ व कमी होत राहील आणि कालांतराने तिथे उघडे बोडके डोंगर दिसायला लागतील. म्हणून सिलेक्शन फेलींगमध्ये व चोरट्या तुटीमध्ये काही फरक राहणार नाही. यामुळे आपण व्याजावर न जगता, मुळ मुद्दलावर म्हणजे वनरूपी ठेवीवरच आघात केल्यासारखे होईल.

## सधन वनशेतीची गरज


नोबेल पारितोषिक विजेते डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी याबाबत प्रगट केलेले विचार वनसंवर्धनाच्या दृष्टिने मार्गदर्शक आहेत. वनोपजांची वाढती गरज पुरविण्या-करिता, त्याच्या उत्पादनाचे अधिक उत्पादनाच्या तंत्राचा वापर करून जंगलाची उत्पादनक्षमता वाढविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या करिता अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची पैदास करण्याचे संशोधन करावयास पाहिजे. नवीन जाती या आर्थिक उत्पन्नाचे एक चांगले साधन आहेत. म्हणून या जातीच्या उत्पादन क्षमतेच्या पुरेपुर उपयोगाकरिता लागवडीचे नवीन तंत्र, योग्य व पुरेशा खतांचा वापर आग, कीड, उंदीर, अवैध तोड यापासून संरक्षण याही गोष्टींची जरूरी आहे.

अन्नधान्याच्या स्वावलंबनाकरिता पारंपारिक शेतीच्या पद्धतीचा त्याग करून आपण आधुनिक पद्धतीचा अवलंब केल्यामुळे या क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केलेली आहे आणि आम्ही स्वावलंबी झालो असे स्वाभिमानाने सांगू शकतो.याचप्रमाणे जंगल क्षेत्रातसुद्धा जमिनीच्या उत्पादन क्षमतेचा जास्तीत जास्त फायदा घेऊन, जास्त भांडवल गुंतवून, आधुनिक जंगल व्यवस्थापनेच्या पद्धतीचा अवलंब करून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नात भरीव वाढ करून वनोपजाचे उत्पादनातसुद्धा स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

## राष्ट्रीय शेती आयोगाच्या शिफारशी

राष्ट्रीय शेती आयोगाने अशी शिफारस केली आहे की ज्या ठिकाणी जमिनीची उत्पादनक्षमता जास्त आहे पण जेथे निकृष्ट प्रतीचे जंगल आहे तेथे क्रमाक्रमाने जंगल तोड करून योग्य भांडवल गुंतवून जलद वाढणाऱ्या व मौल्यवान वृक्षांची लागवड करून मानवनिर्मित रोपवने तयार करणे आवश्यक आहे. जेणेकरून स्थानिक आदिवासी बांधवांच्या तसेच साऱ्या समाजाच्या वनोपजाच्या गरजा कमीत कमी काळात जास्तीत जास्त प्रमाणात पुरवता येतील. हे काम स्वतंत्र वनविकास महामंडळाचेद्वारे कार्यान्वित केले पाहिजे. तथापि हा अटळ उपाय एक काळाची गरज म्हणून स्विकारून पर्यावरणाच्या रक्षणाची यथायोग्य दक्षता घेऊनच वनांची अव्याहतपणे वाढ होण्यासाठी वनविकास महा-मंडळे कार्य करीत आहे.

(—प्रादेशिक वनव्यवस्थापक वनविकास महामंडळ महाराष्ट्र—नाशिक.)



# हिमालयातील (उत्तराखंड विभाग) पर्यावरण अभ्यास-पाहणी मोहीम


वन संवर्धन व पर्यायानें पर्यावरण-रक्षणासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या समस्येकडे लोकांचे, विशेषतः कार्यकर्त्यांचे लक्ष वेधावे व या प्रश्नाचा सर्वांगीण व समतोल अभ्यास व्हावा असा प्रयत्न महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद करीत आहे. या दृष्टीने परिषदेने वन-कर्मचारी व कार्यकर्ते यांचे चर्चासत्र, नाशिक वन-विभागाचा अभ्यास-दौरा, 'हाकारा' च्या वन-संवर्धन विशेषांकांचे प्रकाशन आदि उपक्रम आयोजित केले होते. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून हिमालयातील (उत्तराखंड विभाग) पर्यावरणाची अभ्यास-पाहणी मोहीम १–२३ मार्च या कालावधी मध्ये पूर्ण करण्यात आली.

मध्य हिमालयातील गढवाल–कुमाउँचा प्रदेश "उत्तराखंड" या नावाने ओळखला जातो. गंगा–यमुना व त्यांच्या उपनद्या यांचे उगम आणि बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, जन्मोत्री या सारखी तीर्थक्षेत्रे यामुळे भारतीय जीवनात उत्तराखंडाला महत्वपूर्ण स्थान आहे. शिवाय विपुल निसर्ग–संपत्तीमुळे पर्यावरणाच्या (environment) दृष्टिनेही उत्तराखंडाला महत्त्व आहे. परंतु लोकसंख्येचा दबाव, धरण–रस्ते आदि विकासाची कामे व बेसुमार व्यापारी जंगलतोड यामुळे गेली काही वर्षे तेथील पर्यावरणाचे व निसर्ग–संतुलनाचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे वाढत्या प्रमाणात व व्याप्तीने होणाऱ्या भूस्खलन, महापूर आदि नैसर्गिक संकटाबरोबरच जंगलनाशांमुळे उद्भवलेल्या चारा, पाणी, सरपण यांच्या तीव्र टंचाईचा त्रासही स्थानिक पहाडी–आदिवासी लोकांना सहन करावा लागत आहे.

पर्यावरण नाशास प्रामुख्याने कारणीभूत ठरलेली व्यापारी जंगलतोड थांबावी आणि पर्यावरणाचे व पर्यायाने आपले नुकसान टळावे, म्हणून झाडाला "चिपकून" (मिठी मारून) जंगलतोड थांबविण्याचा अभिनव उपक्रम स्थानिक पहाडी –आदिवासी लोकांनी सुरू केला आहे. वाघापासून बचाव करण्यासाठी आई जशी आपल्या लेकराला कवेत घेते, तसेच लाकुडतोड्यांच्या कुऱ्हाडीपासून झाडे वाचविण्यासाठी बायका–मुले–पुरुष झाडांना अक्षरशः "चिपकून" बसतात. त्यामुळे हा अभिनव




उपक्रम "चिपको" या नावाने ओळखला जातो ('हाकारा' जुलै १९८०).




"चिपको" उपक्रमाद्वारे स्थानिक लोकांची पर्यावरण विषयक जाणीव वाढीस लागत आहे व पर्यावरणाच्या सुदृढतेसाठी वन-संपत्तीचे असाधारण महत्व लोक ओळखू लागले आहेत. त्यामुळेच एका बाजूला झाडांना "चिपकून" अदूरदर्शी जंगलतोड थांबविण्याबरोबरच, दुसऱ्या बाजूला स्थानिक लोकांनी उत्तराखंडातील प्रमुख नद्यांच्या काही संवेदनाशील पाणलोट क्षेत्रात लाखो वृक्षांची लागवडहि सुरू केली आहे.

## जंगल तोडल्याचे दुष्परिणाम

निसर्ग संतुलनाला धक्का बसल्याने त्याचे काय भीषण परिणाम घडतात याची प्रचिती हिमालयात भूस्खलन, महापूर आदि स्वरूपात तावडतोब व स्पष्टपणे अनुभवास येते. १९७० चा अलकनंदेचा महापूर व दोन वर्षापूर्वीची भागीरथीची दुर्घटना याच्या साक्षी आहेत. हिमालया-प्रमाणे महाराष्ट्रातही पहाडी व इतर भागात प्रचंड प्रमाणावर जंगल-तोड झाल्यामुळे निसर्ग-समतोल बिघडत आहे. हळु-हळु भिनणाऱ्या विषाप्रमाणे त्याचे परिणाम तावडतोब आणि स्पष्टपणे दृष्टोपत्तीस पडत नसले तरी अंतिम दुष्परिणाम अटळ आहेत. विशेषत: पहाडी-आदिवासी लोकांचे जीवन बहुतांशी जंगलावर अवलंबून असल्याने, जंगलनाशाचे दुष्परिणाम वाढत्या प्रमाणात त्यांना भोगावे लागत आहेत. महाराष्ट्रातील इतरही लोक व विभाग या भीषण परिणामांपासून वाचू शकणार नाहीत. म्हणूनच लोकांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ही अभ्यास-मोहीम आखली गेली.

उत्तराखंडात मोहीम आखण्याचे कारण म्हणजे जंगल-तोडीचे तिथे केवळ भीषण परिणाम तावडतोब व स्पष्टपणे दिसून येतात इतकेच नाही तर निसर्ग-संतुलन सावरण्या-साठी स्थानिक पहाडी-आदिवासी लोक विशेष प्रयत्न-शील आहेत व त्यातून सर्व-सामान्य लोकांमध्ये पर्या-वरणाची एक व्यापक जाणीव निर्माण होत आहे. शिवाय गंगा व यमुना व त्यांच्या उपनद्यांच्या पाणलोट क्षेत्राचा तसेच नंदादेवी, कामेत, नीळकंठ यासारख्या उत्तुंग गिरिशिखरांचा हा प्रदेश निसर्गरम्य तर आहेच, तसेच साहसी वृत्तीला आव्हानही देणारा आहे.

अभ्यास – मोहिमेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने उत्तरा खंडातील स्थानिक लोकांशी संपर्क साधण्यात आला होता व त्यांनी सर्व ते सहकार्य देण्याचे आनंदाने कबूल केले होते. अभ्यास-मोहीमेच्या कल्पनेला व पहाणी-विषयक आराखड्याला डॉ. माधव गाडगीळ, श्री. अनुपम मिश्र, प्रा. रामचंद्र मुटाटकर, डॉ. अनिल गोरे यांच्यासारख्या जाणकार शास्त्रज्ञ – प्राध्यापकांचे, तसेच महाराष्ट्राच्या वनखात्यातील अनुभवी अधि-काऱ्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले होते. केंद्र सरकारच्या शिक्षण खात्याने या मोहीमेला अंशत: अनुदान दिले होते.

## उमेदवारांची निवड

महाराष्ट्राच्या विविध वनवासी-आदिवासी भागात प्रत्यक्ष काम करणारे सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणाच्या प्रश्नात आस्था असलेले इतर लोक असा सुमारे पन्नास जणांचा गट या मोहीमेत सहभागी व्हावा असा प्रयत्न होता. त्यादृष्टीने वृत्तपत्रे व इतर माध्यमातून सामाजिक संघटना व इतरांना जाहीर आवाहन करण्यात आले. आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात काम करणाऱ्या सुमारे वीस सामाजिक संघटनांनी पाठवलेली कार्यकर्त्यांची नावे तसेच, आवाहनानुसार आलेल्या सुमारे दोनशे पत्रातून उमेद-वारांची निवड करण्यात आली.

उमेदवारांची निवड झाल्यावर त्यांना पूर्वतयारी संबंधी एक सविस्तर पत्रक पाठविण्यात आले. तसेच मोहीमेची उद्दिष्टे स्पष्ट करणारे पुढील पत्रकहि पाठ-विण्यात आले.

## मोहिमेची उद्दीष्टे :


१) आजपर्यंत पर्यावरण रक्षण, निसर्ग – संतुलन, वगैरे गोष्टी काही मूठभर लोकांचे छंद आहेत, असा आपल्यापैकी अनेकांचा समज होता. पण पर्यावरण-नाशाने सर्वांत जास्त नुकसान गोरगरीबांचेच होते हे अनुभवाने स्पष्ट होत आहे, म्हणून नैसर्गिक साधन – संपत्ती [ जमीन, पाणी, जंगले इ. ] आणि समाजजीवन यांचा संबंध समजावून घेणे.

२) निसर्ग संतुलन, पर्यावरण रक्षण याबाबत आज अनेक लोक बोलत, लिहीत असले तरी जोपर्यंत गोर-गरीब संघटितपणे आपला आवाज उठवीत नाहीत, तोपर्यंत याबाबतची धोरणे व योजना दिखाऊ असण्याचा धोका आहे. म्हणून या संदर्भात कोणते धोरणात्मक प्रश्न समाजासमोर आहेत व त्यांची कशी उकल करता येईल याचा विचार करणे.

३) जंगलाचा नाश व त्यामुळे येणाऱ्या अडचणी यांची प्रत्यक्ष ओळख करून घेणे, तसेच जंगल नाश थांबवून जंगल संवर्धन होण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची दिशा शोधणे.

४) मोहीम संपवून परतल्यावर वन-संवर्धनाबाबत आपण काय कृती करायची याचा विचार करणे.

५) संकल्पित वन–विधेयकाची माहिती करून घेणे. मोहिमेमध्ये आपण वरील मुद्यांबाबत चर्चा करूच. शिवाय मोहिमेला येण्यापूर्वी आपण आपल्या संघटनेतील



इतर कार्यकर्त्यांशीही याबाबत चर्चा करावी अशी अपेक्षा आहे. तसेच मागे आपण वन कर्मचारी व कार्यकर्ते यांची संयुक्त बैठक नाशिक येथे आयोजित केली होती. त्या मुद्यांबाबतहि विचार व्हावा अशी अपेक्षा आहे.

## मोहिमेची सुरवात

मोहिमेला निघण्यासाठी सर्व साथीदार रविवार दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी मुंबईला 'जनता केंद्रा' मध्ये जमले. मोहिमेसंबंधी तपशीलवार सूचना, परस्पर-परिचय व सामानाची छाननी इत्यादि गोष्टी पार पाडून पथक दि. १ मार्च रोजी सकाळी दिल्ली मार्गे डेहराडूनला रवाना झाले.

मोहिमेच्या प्रत्यक्ष कामाला सुरवात ३–४ मार्च रोजी डेहराडून येथील 'राष्ट्रीय वन–संशोधन' संस्थेस भेट व तेथील वन–अधिकाऱ्यांशी चर्चा याने झाली. पथकाने सर्व प्रथम संस्थेतील पर्यावरण, सामाजिक वन-संवर्धन, वानिकीशास्त्र, गौण वन–उपज, कीटकशास्त्र इत्यादि संग्रहालयांना भेट दिली व माहिती घेतली. संग्रहालयांमध्ये संबंधित विषयाचे नमुने व माहिती अतिशय व्यवस्थितपणे मांडली आहे. उदा. नुसत्या बांबूचेच करंगळी एवढया जाडीपासून हे मांडी एवढया जाडीचे अनेक नमुने आहेत. नंतर श्री. माधव गोगटे, सहाय्यक वन-संवर्धनिक (महाराष्ट्रातून संस्थेकडे डेप्युटेशनवर गेलेले) यांनी संस्थेविषयी माहिती दिली. दुपारी पथकातील सदस्यांची विषयाच्या आवडीनुसार पर्यावरण व सामाजिक वन–संवर्धन, गौण वन–उपज, वन प्रभाव आदि अभ्यासगटात विभागणी झाली व त्यांनी संबंधित ठिकाणाचे अधिकारी अनुक्रमे सर्वस्वी माथूर, गुलाटी, सुब्बाराव यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करून तपशीलवार माहिती घेतली.

संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्ण मुरारी तिवारी यांनी संध्याकाळी पथकाला मार्गदर्शनपर भाषण केले व सुमारे दोन तास मनमोकळी चर्चा केली. स्वातंत्र्यानंतर बदललेला सामाजिक संदर्भ लक्षात घेऊन वनकर्मचाऱ्यांनी लोकसंपर्काचे महत्व ओळखायला पाहिजे व लोकाभिमुख योजना बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन केले. त्यासाठी सामाजिक संस्थाना सहकार्याचे आवाहन केले. वनअधिकाऱ्यांच्या प्राशिक्षणामध्ये त्यांना आदिवासी जीवन-विकासासंबंधी सखोल माहिती करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी मान्य केले व त्यासंबंधीच्या सूचनांची निश्चित अंमलबजावणी होईल असे आश्वासन दिले. संकल्पित वनविधेयक, वनविकास महामंडळाचे कार्य व त्याचा समाज–जीवनावर होणारा परिणाम आदि विषयावरहि उद्‌बोधक चर्चा झाली. सामाजिक संस्थाच्या सहकार्याने वनीकरणाचे काही प्रकल्प हाती घेण्याचा मनोदयहि त्यांनी व्यक्त केला. चहापानानंतर पहिल्या दिवशीचा कार्यक्रम संपला.

दुसऱ्या दिवशी पथकाचे काष्ठ – अभियांत्रिकी Timber Engineering), काष्ठ–संग्रहालय (Xylarium), वनस्पती नमुना संग्रहालय ( Herberium व Documentation Centre ला भेट दिली.

काष्ठ अभियांत्रिकी विभागाकडून घरबांधणी, पूल बांधणी इत्यादि कामासाठी लाकडाचा कसा उपयोग करता येईल याचे मार्गदर्शन मिळते. या विभागात त्याची प्रात्यक्षिके मांडून ठेवली आहेत. काष्ठ–संग्रहालयात देश-परदेशातील असंख्य जातीच्या झाडांच्या फळयांचे नमुने ठेवले आहेत. लाकडाचे हे 'संदर्भालय' अतिशय नावाजलेले आहे. लाकडाचे वजन–रंग–वास, लाकूड-पेशींचा आकार, विभागणी, प्रमाण-बद्धता इत्यादि गोष्टींवरून लाकूड कसे ओळखावे याची सोप्या पद्धतीने माहिती करून देण्यात आली.

वनसंशोधनासंबंधी केंद्रात असंख्य ग्रंथ, अहवाल उपलब्ध आहेत. त्यातील काही विकत मिळू शकतात.

वनसंशोधन संस्थेत मिळालेली माहिती व चर्चा कार्यकर्त्यांना खूप उपयुक्त वाटली. भेट सर्वार्थाने यशस्वी व्हावी यासाठी वन अधिकारी श्री. माधव गोगटे यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच डेहराडून येथील एकूण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. दिलीप काळे यांनी खूप मदत केली.


डेहराडूनला मुद्दाम आलेल्या उत्तराखंडातील स्थानिक कार्यकर्त्यांनी ४ मार्चला रात्री सर्व पथकाला उत्तराखंडाचा इतिहास, भौगोलिक परिस्थिती, समाज-जीवन, वन-संबंध याबिषयी माहिती दिली. दिनांक ५ मार्च रोजी सर्व पथक प्रथम हृषिकेषला आले. तेथे पथकाची पाच गटात विभागणी होऊन दोन गट भागीरथी व तीन गट अलकनंदा आणि त्यांच्या उपनद्यांच्या खोऱ्यात रवाना झाले. ५ते१५ मार्च या सुमारे दहा दिवसाच्या वास्तव्यात व पद-यात्रेत प्रत्येक गटाने विविध गावांना भेटी दिल्या व प्रश्न पत्रिका (परिशिष्टात दिलेली आहे) व प्रत्यक्ष चर्चा-मुलाखतीद्वारे पर्यावरण विषयक समस्यांची, तसेच गावकरी योजित असलेल्या उपायांची माहिती करून घेतली. प्रत्येक गटाचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे—

# मोहिमेत सहभागी झालेले सदस्य

| क्र. | नांव | पत्ता |
|---|---|---|
| १. | आलमगीर मुलाणी | पानशेत, पुणे ४. |
| २. | सिताराम बाजारे | मुळशी, पुणे ४. |
| ३. | पुरुषोत्तम उगरचंद शेठ | सातारा. |
| ४. | सखरसिंग मोग्या पटले | मु. कुसुमवाडे, जि.धुळ |
| ५. | गुलाब बबन सपकाळ | अणे ता. जुन्नर. |
| ६. | नरेन वासुदेवराव जाधव | पेण, जि. रायगड. |
| ७. | नागू गायकवाड | मु. नायगाव, ता.मावळ, |
| ८. | विनायक गोपाळ अहिरे | मु. शिलाटणे, ता. मावळ. |
| ९. | नामदेव ईश्वर ओव्हाळ | मु. नायगाव, ता.मावळ. |
| १०. | जीवन सोमान्या शेलार | मु. पो. मनोर, ता. पालघर, जि. ठाणे. |
| ११. | भिमसिंग गिरासे | मु. पो. मनोर, जि. ठाणे. |
| १२. | रवींद्र मधुकर यादव | सांगली १६. |
| १३. | किशोर व. देशपांडे | मालाड, (पश्चिम) मुंबई-६४. |
| १४. | नीलम परुळेकर | पालघर, जि. ठाणे |
| १५. | प्रदीप बसाजी गायकवाड | मार्गाची वाडी, पो. पाथरज, ता.कर्जत. |
| १६. | जिजा कमळू रेरे | मार्गाची वाडी, जि. रायगड. |
| १७. | वाहरू सोनावणे | शहादे, जि. धुळे. |
| १८. | सरस्वती शेवाळे | शहादे, जि. धुळे. |
| १९. | नारायण रामचंद्र खुळे | फुलगांव, जि. पुणे. |
| २०. | काशीनाथ शंकर तांबे | मौजे भावडी, जि. पुणे |
| २१. | शोभा कोठारवार | मु. पो. आलापल्ली, ता. अहेरी, जि. चंद्रपूर. |
| २२. | विमल मारोती कुसराम | अहेरी, जि. चंद्रपूर. |
| २३. | सुनिता नरहर भाटवडेकर | पुणे ३०. |
| २४. | अंजली गोखले | पुणे ३०. |
| २५. | कुसुम कर्णिक | नारोडी, जि. पुणे. |
| २६. | सुरेश प्रभाकर परांजपे | विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७. |
| २७. | मधुकर घाटपांडे | अरणेश्वर, पुणे ९. |
| २८. | अलका कुलकर्णी | वांद्रे पूर्व, मुंबई ५१. |
| २९. | दामोदर पांडू ठाकरे | मु. सटाणा, जि. नाशिक. |
| ३०. | उल्हास राजज्ञ | धुळे. |
| ३१. | हिरामण बनकर देवरे | मु. कोंढावळ. ता. शहादे, जि. धुळे. |
| ३२. | भटा तुकाराम माळी | मु. कोंढावळ, जि. धुळे. |
| ३३. | सिताराम देवराव पवार | मुखेड, जि. नांदेड. |
| ३४. | डॉ. एस. एस. सहस्रबुद्धे | पाटण, जि. सातारा. |
| ३५. | चंद्रशेखर अवस्थी | अमरावती. |
| ३६. | हरिहर धोंडोपंत पुरोहित | अमरावती. |
| ३७. | गोरखनाथ नामदेव कांबळे | दहीवली, कर्जत, जि. रायगड. |
| ३८. | मंगल होनराव | पेण, जि. रायगड. |
| ३९. | राजू जोशी | पेण, जि. रायगड. |
| ४०. | विद्या खोपकर | औंध, पुणे. |
| ४१. | आर. पी. पालेकर | मु. पो. कशेले, कर्जत. |
| ४२. | जगदीश गोडबोले | पुणे ४. |
| ४३. | काळूराम धांगडा | शिसने, जि. ठाणे. |
| ४४. | गोपाळ बोदले | मु. शिसने जि. ठाणे. |
| ४५. | प्रकाश भावे | दहिवली (नीड) ता. कर्जत, जि. रायगड |
| + ४६. | प्रताप शिखर | खाडी. |
| + ४७. | विजय जडधारी | जाजल. |
| + ४८. | भगवती प्रसाद हाटवाल | गोपेश्वर. |
| + ४९. | भूपाल सिंग | गोपेश्वर. |
| + ५०. | जगदीप पुरोहित | गोपेश्वर. |
| + ५१. | कुंवरसिह सजवाण | चंद्रेश्वर. |
| + ५२. | भीमसिंग रावत | गोपेश्वर. |
| + ५३. | प्रकाश मेठानी | गोपेश्वर. |
| * ५४. | बी. व्ही. शेखर | नागेपल्ली जि. चंद्रपूर. |
| * ५५. | दत्तात्रय बिडकर | नाशिक. |
| * ५६. | रामचंद्र मुटाटकर | पुणे. |
| * ५७. | अनिल गोरे | पुणे. |

+ – स्थानिक कार्यकर्ते.

* – काही काळ सहभागी झालेले.



## गट क्रमांक १ – हेवलिका

**सदस्य :** भिमसिंग गिरासे (प्रमुख), प्रदीप गायकवाड, (गट उप-प्रमुख) जिजा रेरे, प्रकाश भावे, नारायण खुळे, गोरखनाथ कांबळे, विद्या खोपकर, भटा माळी, अंजली गोखले, प्रताप शिखर. स्थानिक कार्यकर्ते : कुँवरजी सजवाण.

पाच मार्चला सकाळी डेहराडूनहून निघून दुपारी १२ वाजेपर्यंत हृषिकेष–उत्तर काशी मार्गावरील खाडीत येऊन पोहोचलो. थंडीचा कडाका डेहराडूनपासून जाणवतच होता, तो खाडीत आल्यावर तीव्रच भासू लागला. खाडीमध्ये 'युवक संघ' जाजलच्या कार्यालयात बाडबिस्तारा टाकला. नंतर तेथील स्थानिक कार्यकर्ते श्री. दयालसिंग, श्री. दयालभाई व श्री. कुँवर प्रसून यांच्याशी ओळख झाली. साथीला प्रतापशेखरजी होतेच. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून त्या परिसरातील भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, परिस्थिती, लोकांचे व्यवसाय,– शेती, लोक शिक्षणाची, दळणवळणाची साधने याबद्दल अंदाज घेतला व मोहिमेतील गांवे ठरविण्यात आली. हेवलिका नदीच्या खोऱ्यात आमची भटकंती होणार होती. यामधील काही गांवे हेवलघाटी (खाडी), टेहरी, बेमुंडा, जाजल, खोलात तर रामपूर, पाली, अद्वानी सैंड, ल्हाशी ही गांवे समुद्रसपाटीपासून साधारण ६ ते ७००० फूट उंचीवर होती.

पहिले दोन दिवस हवामान ठिक नसल्याने बाहेर जाता येणार नाही या कल्पनेने साशंक झालो. दुसऱ्या दिवशी सकाळी बर्फाचा पाऊस झाला. खाडी हे गाव म्हणजे रस्त्यावरील दुकानांचे आहे. प्रत्यक्ष गाव तिथून बऱ्याच अंतरावर आहे पण तेथे दुकानदारी सोडन दुसरा कोठलाही व्यवसाय चालत नाही.

## जाजल गावात फेरफटका

दि. ६ मार्चला आम्ही खाडीच्या आसपासच हिंडलो. या भागात विशेष पाहाण्यासारख्या अशा पाणचक्क्या. प्रत्येक गावात दोन ते तीन पाणचक्क्या असतात. त्याच तत्त्वं फार सोपे आहे. आपल्याही भागात करून घेण्यासारखं आहे. डोंगरावरून जे पाणी कोसळत असतं ते पाणी उंचीवरून खाली आणतात. त्यांच्या शक्तीचा उपयोग करून एक लाकडी चाक बसवून त्याला गती दिली जाते. त्यामुळे जास्त प्रमाणात पैसे खर्च न करता धान्य दळले जाते.

आजच्या इंधन टंचाईच्या काळात या तत्त्वाचा उपयोग करून इतरही भागात पाणचक्क्या सुरू करता येतील. अर्थातच त्याला वेळेच्या मर्यादा पडतील. पण वाया जाणाऱ्या पाण्याच्या शक्तीचा वापर करून– घेण्याचा हा प्रयत्न स्तुत्य आहे. याच तत्त्वावर या भागात 'हायड्रम' योजना सरकारने अवलंबिली आहे. या योजनेत दोन मोठ्या लोखंडी पाईपचा वापर करून उंचावरून आलेले पाणी एका मोठ्या पाईपमधून आणतात व ते छोट्या पाईपातून वर चढवून टाकीत साठवतात. त्या पाण्याचा उपयोग मुख्यत्त्वे शेतीकरता करण्यात येतो. जास्त वेगाने आलेले पाणी वर चढविताना छोट्या रुंदीच्या पाईपातून आपोआप वर ढकलले जाते. सध्या या योजनेनुसार हरिजन कुटुंबाना पाणी पुरविले जाते.

## जनता कोर्टाचा निर्णय

'चिपको' आंदोलनातील सहभागामुळे या गावातील लोकांची एकत्रितपणे विरोध प्रकट करण्याची पार्श्वभूमी तयार झाली असावी. खाडीत घडलेला एक गमतीचा प्रसंग म्हणजे तेथील काही लोकांना एका व्यक्तीने आपल्या दुकानात दारूच्या बाटल्या चोरून आणून ठेवल्यात असा सुगावा लागला. ही व्यक्ती स्वतःला राजकीय पक्षाचा पुढारी म्हणवते व स्वतः तथाकथित डॉक्टर असून त्याचे गावात औषधाचे दुकान आहे. कुंवर प्रसून, प्रतापशेखर व गावातील इतर काही लोकांनी त्या दारूच्या बाटल्या हुडकून काढल्या लागलीच भर चौकात गावसभा घेण्यात आली. तो चोरटी दारू विक्री व त्यामुळे तेथील सामाजिक शांतता व सुरक्षितता बिघडते म्हणून जनतेच्या निर्णयानुसार त्या बाटल्या जप्त करून त्याच जागेवर फोडण्यात आल्या. फारशी न शिकलेली ही माणसे पण त्यांच्यात

जागृती मात्र बरीच आढळली. रात्री परत कार्यकर्त्यांची सभा होऊन मद्यनिषेध आंदोलन कशा तऱ्हेने चालू ठेवता येईल यावर चर्चा झाली.

## जानदेवींचे रामपूर

रामपूर हे गाव खाडीपासून वर डोंगरावर आहे. पाठीवर सामान घेऊन पर्वत चढण्याचा मोहिमेतील पहिलाच दिवस होता. महाराष्ट्रातील डोंगरापेक्षा येथील डोंगर फारच ठिसूळ आहेत. डोंगर चढताना मनात सारखी धाकधूक. डोंगर खचून कधी खाली पडायला होईल नेम नाही. गावात पोहोचल्यावर गोरखनाथ व इतरांनी गाणी म्हणत लोकांना आमच्या आगमनाची नांदी दिली. रात्री जेवणानंतर येथीलहि मलामंडळाच्या अध्यक्षा जानदेवींच्या घरी जोरदार सभा झाली. सभेला चांगला प्रतिसाद मिळाला. गावातील बहुतेक तरुण नोकरीनिमित्त बाहेरगावी असल्याने स्त्रिया व वृद्ध पुरुष यांची संख्या जास्त होती. या गावाची रचना इतर पहाडी भागातल्या घरांप्रमाणे विखुरलेली. घरे उतरती व स्लेट पाटीचे छप्पर असलेली. बहुतेक दुमजली. घराच्या तळ मजल्यावर गुरांकरता गोठा. जनावरात गाय, म्हैस काही घरात बकरी. गाईपेक्षा म्हशींचे प्रमाण जास्त कारण गाईला चाऱ्याकरीता सोडायला जंगलच नाही. चारासुद्धा बराच लांबवरून ५/६ मैलावरून आणावा लागतो. रामपुरमधील बऱ्याच लोकांनी विशेषतः स्त्रियांनी 'चिपको' आंदोलनात भाग घेतला होता. जवळच्या अदवानी गावातील जंगल वाचविण्यात यांचा मोठा वाटा होता. लोकजागृतीसाठी जे तंत्र वापरण्यात आले ते उल्लेखनीय वाटले. उदा. १) लाऊडस्पीकर वरून 'जंगल बचाव मानव बचाव', 'क्या है जंगलके उपकार... मिट्टी पानी और बयार यासारख्या घोषणा देणे. २) घराच्या छतावर थाळी वाजवून सभेला एकत्र बोलावणे. ३) जंगल तोडीला अटकाव म्हणून झाडाना चिपकणे, राखी बांधणे, रेझिन मिळविण्याकरीता ज्या झाडांवर खोल घाव घालण्यात आले आहेत त्यां झाडांना मलमपट्टी बांधणे. ४) आंदोलनाच्या वेळेत जंगलात भागवतकथा व रामायण यासारख्या ग्रंथांच्या वाचनाचे कार्यक्रम करणे. या सर्व गोष्टीचा प्रभाव पडून या गावातील स्त्रियांच्यात जंगलाबाबत जागृती दिसते. फळे, चारा, सरपण जमा करण्यामुळे बायकांचा जंगलाशी जवळचा संबंध येतो. त्यामुळे जंगलावर त्यांचे प्रेम आहे, त्यासाठी ते जीव टाकतात.

## महिलांचा पुढाकार

१९७७ मध्ये नरेंद्रनगर येथे होणाऱ्या लाकडाच्या लिलावावर आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी बहिष्कार टाकायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी पोलिसांचो जादा कुमक बोलावून सर्व कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. ही बातमी समजताच रामपुरातील महिला जानदेवी, सुदेशादेवी, शांतीदेवी व इतर तातडीने नरेंन्द्रनगरला गेल्या व पोलिसांचे कडे तोडून त्यांनी सर्वांची सुटका केली. त्याकरता सर्व स्त्रियांना १५ दिवस तुरुंगात राहावे लागले. सुदेशादेवी म्हणत होती, 'माझ्या नवऱ्याने तर धमकी दिली होती की परत आल्यावर घरात घेणार नाही म्हणून' पण बाई मोठी धीराची मागे हटली नाही.

## जागृती

पूर्वी त्यांच्या मनात जेलबद्दल भीती होती, आता ती राहिली नाही. त्याच प्रमाणे इतर पुरुषांसमोर जाहीर सभेमध्ये सुदेशादेवी आपल्या अडचणी मांडीत होत्या. मात्र त्यानंतर या गावात काहीही आंदोलन झाले नाही. त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांचे संपर्कही फार कमी पडत असल्याने जाणीवेची ही पातळी जास्त उंचावलेली दिसली नाही. अजूनही धार्मिक भावना फार मोठ्या प्रमाणावर आढळते. जंगल संवर्धना संबंधी भवितव्यात तसा काही कार्यक्रम आखलेला नाही. पण सरकारने जर त्यांना उपयोगाची झाडे दिली तर ते लावण्याची त्यांची तयारी आहे.

जानदेवी म्हणत होती, 'बाई हे जंगल वाचवून मला काय उपयोग, मी माझ्या पोराबाळांकरता जपतीय, माझं आयुष्य काय संपलय आता!" जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात जा स्त्री ही दुःखीच आहे ती कधी ही स्वतः करीता जगत नसते. आधी आईवडील, नंतर नवरा व शेवटी मुलाबाळांकरता. या स्त्रियांना बरेचसे हिंदी समजत होते. जे काही शब्दात व्यक्त करू शकत नव्हतो ते आमचे कान, डोळे, हातवारे व स्पर्शाने भागत होते. त्यामुळे या प्रवासात कोठेही भाषेची अडचण आम्हाला विशेष जाणवली नाही.

## निरुपयोगी लागवड

आपल्या लोकांच्या दृष्टीने गमतीचा पण त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असा की मुलीचे लग्न जमविताना नवऱ्या मुलाच्या गावाजवळ जंगल आहे की नाही ते प्रथम विचारतात. का, तर आपल्या मुलीला गवत, सरपणासाठी लांब जावे लागू नये म्हणून ! म्हणजे ज्या गावातील जंगले कमी होत चालली तिथल्या मुलांची स्थिती लग्न जमविण्याच्या बाबतीत हलाखीची ठरते. इतका या लोकांचा व जंगलाचा निकटच संबंध आहे. या गावाभोवती आता जवळजवळ जंगल नाही. लोकांचे म्हणणे कोणतीही नैसर्गिक आपत्ती आत्ता पर्यंत गावावर आलेली नाही. परंतु आज एकीकडे एक मोठा कडा कोसळण्याच्या स्थितीत आहे, त्यामुळे ५/६ एकर जमीन नष्ट होईल. पूर्वी ठेकेदारांनी जंगलतोड केली त्याबरोबर कारागीर लोकांनी पण लाकडी भांडी बनविण्याकरता जंगलतोड केली. आता मात्र बेमुंडातील कारागीरांना उत्तर प्रदेशातून दूर वरून लाकूड विकत आणावे लागते. भीमल, खैर झाडाचे लाकूड लोकांच्या फार उपयोगाचे आहे. भिमलची पाने जनावराना खूप आवडतात. त्याउलट सरकार वनीकरणाच्या योजनेखाली जे निलगीरीचे वृक्षारोपण करते त्यापासून फक्त पैसा मिळतो. त्याचा या लोकांच्या दैनंदिन जीवनाला काय आधार ?

रात्री रामपूर मध्येच राहून ८ तारखेच्या सकाळी तिथून पहाडावरून खाली उतरून एक दीड किलोमीटर दूर पुन्हा दुसरा पहाड चढत पाली या छोट्या गावात येऊन पोहोचलो. गावाची रचना साधारण रामपूर सारखीच याही गावातील लोकांनी अद्वानीचे जंगल वाचविण्यात मदत केली. गावात दयालसिंग ह्या सर्वोदयी कार्यकर्त्याच्या मदतीने माहिती काढली. जंगलातील तैलड, बेबर, बॉक इत्यादि कंदमुळे लोक खातात. यातील बॉक हे कंद फार कडू असते. ते चिरुन खळखळत्या पाण्यात कडवटपणा जाण्यासाठी रात्रभर ठेवतात बंगजीर हे वरईसारखे धान्य त्यात साखर घालून खातात. गावातील शेती उताराची पायऱ्या-पायऱ्यांची असते. ज्या जमिनीत साधारणपणे ५ क्विंटल गहू होतो त्याची किंमत एकरी २,००० रुपये असते. डोंगरउतारावर सावा, जव, उडीद, मुंडवा, थोडा जाडा भात, गहू ही पिके घेतली जातात. या गावातील महिलामंडळाला सरकारकडून शिवण यंत्रे मिळाली आहेत. पण त्यांना शिकवणारे कोणीच नाही !

अदवानी गावाकडे जाणारा बसचा रस्ता अतिशय कच्चा व अरूंद होता. गाडी चालविणाऱ्या ड्रायव्हरची कमालच ! एक गाडी एका वेळेस जेमतेम जाऊ शकेल. अशातच घाटात समोरून एक बस आमच्या गाडीला एकदम समोर आली. अर्थातच चढणाऱ्याला अग्रक्रम या नियमाने आमची गाडी अगदी कडेला गेली टोकाला. आमच्या जिवाची भयंकर घालमेल झाली. पण ड्रायव्हरने शांतपणे गाडी पुढे काढली. हेवलघाटीपासून हे गाव खूप उंचावर आहे. गावाभोवती चीड व सालचे मिश्र जंगल होते. या गावातील जंगल हे त्या परिसरातील मोठे जंगल. जंगलाजवळच गाव आहे. या जंगलाचा लिलाव १९७७ साली झाला होता. पण जंगल आमचे सर्वस्व आहे या तीव्र भावनेने तेथील लोकांनी प्रखर आंदोलन केले होते. तसेच त्या वेळेस ' लिसा ' (राळ) विरोध आंदोलनही छेडले गेले. त्याकरता घायाळ झालेल्या झाडांवर माती लावून कापडाने बांधून टाकून मलमपट्टी करीत. या आंदोलनाला ' मलमपट्टी आंदोलन ' असे म्हटले जाते. यामागची त्यांची कल्पकता वाखाणण्यासारखी आहे. या गावाजवळून सडक निघाल्यामुळे डोंगराचा काही भाग खचत आहे. त्याने जमिनीची धूप होतेच व प्रतही कमी होत आहे. मात्र इतरत्र जंगलतोड वाचविल्याने जमिनीवर फारसा परिणाम झालेला दिसत नाही. गावात जमीनदार कोणीही नसल्याने सर्वसाधारण या सर्व गावांमध्ये शेतमजूर व जमीनदार असे वर्गीय स्वरूप दिसून येत नाही. भूमिहीन असे लोक नाहीत. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था बारा मीटर पाईपने पाणी आणून केली आहे. चारा, जळणाकरता लाकूड जवळच्यात जंगलातून मिळते.

## महिलांचा सहभाग

या जंगलातच चिपको आंदोलन मोठ्या प्रमाणावर छेडले गेले. बाहेरगावी नोकरीकरीता गेलेल्या लोकांना जंगलाबद्दल आस्था नाही. काही लोक पावसाळ्याचा हंगाम संपल्यावर मजुरीकरता संपूर्ण कुटुंबासह बाहेरगावी जातात पण पावसाळ्यापूर्वी परत फिरतात. त्याच्या कामाच्या ठिकाणी सुद्धा संघटन असते. चिपको आंदोलना बरोबरच दारूबंदी सारख्या आंदोलनात सुद्धां स्त्रियांचा सहभाग असतो.

पहाडी भागातील लोकांचे जीवन खडतर आहे. या

छोट्या गावामध्ये शाळा, दवाखाना, वीज अशा सोई नसतात. त्यामुळे साहजिकच येथील लोकांना फारसे शिक्षण मिळत नाही. पूर्वी जंगलावर व शेतीवर या लोकांचे भागत असे. आता जसजशी लोकसंख्या वाढते तसतसे माणशी जंगलाचे प्रमाण कमी होते. ते पुरेसे नसते व उत्पन्नाचा दुसरा काही मार्ग नसल्याने नोकरी-करता बाहेरगावी जावे लागते. कमी शिक्षण असल्याने बहुतांशी लोकांना मजूरी करुन पोट भरावे लागते. त्यामुळे येथील स्त्रियांवरील जबाबदारी वाढली आहे. घरातले काम करून, शेती करणे अथवा शेती करवून घेणे व एकंदर कुटुंबाची सर्व जबाबदारी वाहाणे असा बहुतांशी भार उचलावा लागतो. काही ठिकाणी स्त्रियांना महत्त्वाचे स्थान आहे. पण एकंदर विचार करता स्त्रियांचे स्थान दुय्यमच आहे.

९ तारखेच्या दुपारी अदवानीत आधी गावातील लोकांच्या मुलाखती व जंगलात फेरफटका झाल्यावर संध्याकाळीच तेथून जवळच असलेल्या गंगसार गावात जाण्याचे ठरवले. निघेपर्यंत सात वाजले होते. पौर्णिमेची रात्र होती. जंगलातून गाणी गात गात चाललो होतो. त्याचा परिणाम काय होणार ? रस्ता चुकलो. रस्ता चुकण्याचा आनंद ओसरत असतानाच गावाकडे जाणाऱ्या लोकांनी आम्हाला बरोबर मार्गावर आणले. त्या गावात लग्नसमारंभ होता. त्यात रात्री खास गढवाली असा मन्नाड नाचाचा प्रकार पाहायला मिळाला. त्यातील ताल व ठेका मनाला वेगळीच धुंदी आणणारा आहे. आपल्या-कडे ज्याप्रमाणे गोंधळ वगैरे घालायची पद्धत आहे साधारण तशीच ती आपल्या देवदेवतांना केलेली आळवणी असते. नाचात फक्त पुरुष भाग घेतात. साधारण आपल्या सारखेच, बायका नाचत नाहीत. फक्त ज्या बायकांच्या अंगात आले; त्या मात्र घुमत, नाचत होत्या. आमच्यातील उत्साहीवीर भिमसिंग व जगदीश या मन्नाडमध्ये अर्थातच सामील झाले.

## धर्माचा पगडा

गंगसार गाव म्हणण्यापेक्षा ती एक पंधरा वीस घरांची वस्ती आहे, अदवानी जवळची. या लोकांच्यावर धर्माचा पगडा जबरदस्त आहे. नवरा, नवरीला पड्यात ठेवणे, ऐपत नसली तरीही कर्ज काढून गावजेवण घालणे. एकंदर लोकशिक्षणाचा जवळपास अभाव असल्याने हे स्वाभाविकच आहे. चिपको आंदोलनाने लोकांच्या धार्मिक भावनेला आवाहन केले जाते. त्यामुळे अशा बाबतीत लोकजागृती ते करू शकले नाही. आतापर्यंतची आमची भटकंती खाडीच्या आसपासच्या भागातच चालली होती. अकरा मार्चला सकाळी आम्ही सर्वजण टेहरी गढवालकडे रवाना झालो. टेहरी-गढवाल हे जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे. त्याची समुद्र सपाटीपासून उंची ७५० मीटर आहे हे गाव भिलंगना व भागीरथीच्या संगमा-वर वसलेले आहे. येथे या दोन्ही नद्यांच्या संगमावर धरण बांधयची योजना अमलात आणणे चालू आहे. (टेहरी धरण प्रकल्पासंबंधी अधिक माहिती गट क्रमांक दोनच्या अहवालामध्ये मिळेल.)

टेहरीला आम्ही 'वन निगम'च्या ऑफिसला भेट दिली, तिथे वन-निगमाचे मुख्य अधिकारी श्री. बिस्त यांच्याशी वार्तालाप झाला. वननिगमाची स्थापना म्हणजे 'चिपको' आंदोलनाला सरकारने दिलेला प्रतिसाद आहे असे त्यांनी सांगितले. ठेकेदारांपासून मजुरांचे होणारे शोषण थांबविण्यसाठी निगमाची स्थापना झाली आहे. वन-निगमातर्फे जंगलतोड करण्यात येते पण पुढे जंगल संवर्धनाच्या बाबतीत सरकारची काय योजना आहेत, याबद्दल 'निगमा'कडे काहीच माहिती नव्हती.

## सामाजिक असुरक्षितता

टेहरी गावातील वातावरण उद्विग्न भासले. लोक-जीवन अस्वस्थ झालंय. भवितव्यातील गोष्टीचा विचार करताना लोक विसरू शकत नाहीत, की आपल्याला इथून एक दिवस हलायचंय – येथील कॉलेजचे प्राचार्य श्री. विभूते नावाचे मराठी गृहस्थ आहेत. ते म्हणाले की आमचे कॉलेज पत्र्याच्याच शेडमध्ये आहे. कारण विद्यापीठ म्हणते की हे सगळे पाण्याखाली जाणार आहे तर का उगीच खर्च करा ? सामाजिक असुरक्षितता निर्माण झाली आहे. सर्वांना वाटतंय की गंगा नदीचे हे सुपीक खोरे या धरणामुळे एक दिवस कबरस्थान होईल.

टेहरीतील मुक्काम हलवून आम्ही घनसाली गावात बसने आलो. आतापर्यंत बसने केलेल्या प्रवासापैकी हा दुसऱ्यांदा होता. घनसाली रस्त्यावर उतरून चोंटी या गावापासून पश्चिमेस ५.६ किलोमीटर डोंगर चढून लहासी व सेंडा गावास आम्हाला जावयाचे होते. लहासी गावातील जंगल वाचविण्यासाठी या गावातील महिलांनी बराच पुढाकार घेतला होता. या गावात एक महिलामंडळ आहे. त्यातील महिलांची मागणी अशी 'आमचे मंडळ सरकारकडून रजिस्टर करून घ्या म्हणजे

आम्हाला सरकारकडून शिवणाची यंत्रे मिळतील.'

लहासी गावाच्या नावामागे असा एक इतिहास आहे की फार पूर्वी इथे फक्त रजपूत व हरिजनांची वस्ती होते. त्यांच्यात भांडणे होऊन येथील हरीजनांना वस्ती सोडून जावे लागले पण त्यावेळेस एका हरिजन वृद्धेचे मरण ओढवले होते. त्या स्त्रीचे प्रेत तसेच टाकून ते गाव सोडून गेले. म्हणून ते ' लाहां 'शाचा अपभ्रंश होत लहासी नाव पडले. हे गाव ७००० फूट उंचीवर आहे. रात्री गावात खूप उशीरा पोहोचल्याने मिटींग झाली नाही, पण गावात जाताना आम्ही बरोबर बाजाची पेटी नेल्याने गढवाली व मराठी गीते यांच्या मैफलीने रात्रीची मजा वाढवली.

## सामाजिक जाणीव

दुसऱ्या दिवशी पनघटावर मिटींग घेतली. पुरुष, पाणी भरता भरता हंडे ठेवून स्त्रीया व मुले सभेत सामील झाली. या गावात वनखात्याचे जंगल आहे. आंदोलनाच्या वेळी या भागातील सर्वात मोठ्या ठेकेदाराने ह्या जंगलाचे कंत्राट घेतले होते. बाहेरून ३५० मजूर बोलावून आणले होते. श्री. सुंदरलाल बहुगुणा प्रथम या गावात आले. त्यांनी लोकांना कल्पना दिली की आपले हे जंगल कसे वाचवता येईल. गावच्या स्त्रीपुरुषांनी मग पुढाकार घेऊन आंदोलन यशस्वी केले. त्याशिवाय गावकऱ्यांनी गावाचे म्हणून जे जंगल राखले आहे. त्याकरता त्यांनी गावाचा असा एक राखणदार ठेवला आहे. त्याशिवाय गावातील स्त्रिया आळीपाळीने जंगलावर लक्ष ठेवतात. व त्या जंगलातून कोणीही काही पळवून आणले तर त्याला गावसभेच्या मताने दंड करतात. या लोकांचे म्हणणे की जंगल काही आमचे एकट्याचे नाही. त्यापासून पर्यायी फायदा शहरातील लोकांनासुद्धा होतो. मग तुम्ही जंगल वाचवायला मात्र आम्हालाच का सांगता? प्रत्यक्ष तुमच्यातील काही लोक इथे राहून आमच्यात काम का करीत नाहीत? प्रश्न फारच भेदक होता. त्या माणसाचे जुजबी समाधान करण्याचा प्रयत्न केला पण तो निष्फळ होता हे जाणवलं. आमच्यातील काही जण कार्यकर्ते होते. पण एकंदरित विचार करताना मनाला रुखरुख लागली की आपल्या सुशिक्षित म्हणविणाऱ्या समाजात अशी जाणीव निर्माण करण्यात आपण कुठेतरी कमी पडतोय नक्की.

१३ मार्चला संध्याकाळी लहासी गांव सोडून रात्री सिल्यारा‌ला सुंदरलाल बहुगुणा यांच्या आश्रमात धडकलो. ह्या आश्रमात गरीब घरातल्या खास करून मागासवर्गीय मुली श्रमदान करून शिकतात. तेथेच त्यांची राहाण्याची सोय आहे. या सर्व कामात सुंदरलाल बहुगुणांच्या पत्नी विमला यांचा मोठा वाटा आहे. दुसऱ्या दिवशी जवळच्या चमियाला गावात जाऊन एक गावसभा घेतली. रात्री आमच्या मोहिमेतील गट नं. २ आम्हाला येऊन मिळाला. आपल्या धाडसाच्या हकीकती सांगत.

१४ मार्चला सकाळी सिल्यारापासून १० किलोमीटर चालत धनसाली गावापर्यंत जाऊन तेथून टॅक्सीने श्रीनगरच्या दिशेने रवाना झालो. वाटेत टॅक्सी बंद पडल्याने पुन्हा आमची पदयात्रा सुरू झाली. श्रीनगरजवळ एक कडा कोसळल्याने १५ दिवस रस्ता बंद होता. अशा रितीने अभ्यास मोहिमेतील प्रत्यक्ष — पहाणीचा भाग पार पाडून आम्ही सर्व जण श्रीनगरला एकत्र आलो.

## गट क्रमांक — २ : भागीरथी

**सदस्य :** १) उल्हास राजज्ञ-गटप्रमुख २) गुलाब सपकाळ, उपगटप्रमुख ३) रवी यादव ४) किशोर देशपांडे ५) सिताराम पवार ६) सुनीता भाटवडेकर ७) शोभा कोठारवार ८) नागू गायकवाड ९) मधु घाटपांडे १०) विजय जडधारी (स्थानिक कार्यकर्ते).

उत्तराखंडातील जिल्हयांपैकी ' टेहरी ' आणि ' उत्तरकाशी ' ह्या दोन जिल्हामध्ये जाऊन तेथील गावांचा आमच्या गटाला अभ्यास करावयाचा होता.

आम्ही अभ्यासाला निवडलेली गावे पुढीलप्रमाणे —

(अ) उत्तरकाशी जिल्हा : १) डाँग २) पोखरी ३) कन्सेंट ४) डबरानी ५) कनोडियागाढ ६) भंगेली.

(ब) टेहरी — गढवाल जिल्हा : १) लम्बगाव १) नौघर ३) रौनिया ४) पोरवरी ५) चमोलिया ६) सिलियारा.

आम्ही ज्या भागात हिंडलो तो भाग भागीरथी नदीच्या खोऱ्यामध्ये येतो.

## अभ्यास आणि अहवालाची पद्धत

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने दिलेल्या प्रश्नावलीतील १४ मुद्यांपैकी गटांतील प्रत्येक सदस्याने स्वतःच्या आवडी व अनुभवाप्रमाणे १-२ मुद्यांचा विशेष अभ्यास केला व प्रत्येक सदस्याने आपला अहवाल आपल्या गटप्रमुखाकडे सादर केला. हा मुख्य अहवाल

प्रत्येक सदस्याच्या अहवालाच्या आधारे लिहण्यात आला आहे.

## हिमालयातील भूस्खलन

पाच मार्चला आमचा गट हृषीकेषहून उत्तरकाशी-कडे निघाला. नरेन्द्रनगर (समुद्र सपाटी पासून उंची १००० मीटर) ते उत्तरकाशी (११४० मीटर) ह्या प्रवासात १५८० मीटर ते ६४० मीटर ह्या विविध उंचीवरून आम्ही प्रवास केला. एकीकडे उत्तुंग शिखरे तर दुसऱ्या बाजूला प्रचंड दऱ्या. त्यामधून वळणे घेत जाणाऱ्या अरुंद रस्त्यांवरून आमचा प्रवास झाला. उत्तरकाशीच्या १० किलो मीटर आधी गाडी अचानक थांबली. खाली उतरून बघतो तो रस्ताच गायब ! हिमालयातील दैनंदिन जीवनातील पहिला कठिण अनुभव आम्हाला आला. हिमालयातील भूस्खलन पाहायला मिळाले. त्या भूस्खलन झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यां-वरून आम्ही पलिकडे पोहोचलो. तेथे थांबलेल्या दुसऱ्या गाडीने उत्तर काशीस आलो.उत्तर काशीत सर्वोदयी कार्य-कर्ते श्री. भट यांच्या सर्वोदय आश्रमात मुक्कामास आलो. तेथून अभ्यास मोहिमेतील पुढील पर्वास सुरवात झाली.

डॅांग, पोखरी, कन्सेंट, गावे उत्तरकाशीच्या अगदी जवळ आहेत. डबरानी, भंगेली, कनोडियागाढ उत्तर काशीहून सुमारे ६० किलो मीटर अंतरावर आहेत.

टेहरी जिल्ह्यातील आम्ही अभ्यासलेली गावे लम्ब-गावपासून १० किलो मीटर च्या परिसरात होती. बहुतेक सर्व गावात पाचवीपर्यंत शाळा होती. हमरस्त्यापासून जवळ असलेल्या गावातच वीजेची सोय होती. परंतु सर्वगावांत मात्र नव्हती. ह्या सर्व गांवापर्यंत जायला बसची सोय होतीच असे नाही. काही गावात जायला अतिशय अरुंद रस्त्यावरूनही जावे लागले.


गावातील घरे ही लाकूड आणि स्लेटचा दगड ह्यांनी बनलेली होती. घरे दुमजली व दर्शनी भागावर लाकडाचे कोरीव काम केलेली होती. खालच्या भागात गोठा आणि चाऱ्याचे साठवण करण्याची जागा व वरच्या मजल्यावर स्वयंपाकघर व बैठकघर बऱ्याच ठिकाणी आढळले. काही घराच्या दर्शनी भागात गणपती कोरलेला आढळला. छपरासाठी स्लेटचा दगड वापरतात. त्यामुळे अशी घरे हिवाळयात उबदार व उन्हाळयात थंड रहातात. या छपराचे आयुष्य पत्र्याच्या आणि थोडे सिमेंट-कॉंक्रीटच्या घराच्या बरोबरीने आहे असे अनुभवी लोकांनी सांगितले. छपरांचा जुनाटपणा बऱ्याच ठिकाणी आढळून आल्यामुळे ह्यात सत्यता वाटते. घरातील खांब, तुळया वगैरे ठिकाणी लाकडाचा वापर केलेला आढळला.

## एक पाणवठा

गावामध्ये रजपूत, ब्राम्हण, हरिजन लोक आढळले. रजपूत लोक स्वत:ला सिंग (सिंह) म्हणवून घेतात. ब्राम्हण आणि हरिजनांचे प्रमाण कमी होते. हरिजन लोकांचा मुख्य व्यवसाय लोहारकाम, वाद्य वाजविणें, सुतारकाम हा होता. प्रत्येकाकडे सरासरी १ ते २ एकर जमीन असल्यामुळे भूमिहीन किंवा शेतमजुरांच्या समस्या येथे आढळल्या नाहीत. दलित आणि सवर्णांचा पाणवठा हा एकच आढळला. पाणी एकत्र भरले तरीही ते एकमेकांच्या हातचे पाणी पीत नाहीत किंवा एकमेकां-कडे जेवायला जात नाहीत. आपल्याकडील अस्पृश्यांच्या स्थिती पेक्षा तेथील हरिजनांची स्थिती बरी वाटली. गावात कोठेही सांडपाण्याची वेगळी व्यवस्था आढळली नाही. थंडीमुळे एकंदरीत अस्वच्छता आढळली. उत्तरा खंडात आढळलेली आणखी एक गोष्ट म्हणजे तेथे धार्मिक वातावरणाचा लोक-जीवनावर फार मोठा पगडा आहे. तेथे भारतातील मोठी-मोठी तीर्थ-क्षेत्र आहेत व सतत यात्रेकरूंचे जाणे-येणे चालू असते म्हणून असेल, परंतु वातावरण अतिशय धार्मिक वाटले.

शेती हा महत्त्वाचा व्यवसाय येथे आढळतो. शेती-मध्ये महत्वाचे पीक गहू, भात पिकवला जातो. शक्य

**पाणचक्की**



तेथे बटाटे, मिरची, भाजीपाला, राजमा यांचे पीक घेतले जाते. 'मंडवा' चे पिकही घेतले जाते. शेती डोंगराच्या उतारावर पायऱ्या पायऱ्याने केली जाते. १६ मुठी गहू जेथे पेरला जातो तेवढया जागेला एक नाली असे म्हणतात. २० नालींचा एक एकर बनतो. प्रत्येकाकडे १ ते २ एकर जमिन असतेच. परंतु शेतीचे क्षेत्र कमी असल्यामुळे जेमतेम ३ ते ४ महिने धान्य पुरते. व इतर व्यवसाय त्यांना करावे लागतात. शेतीसाठी खत म्हणून घरी कंपोस्ट खत तयार करतात. गुरांचे शेण, गवत, पाणी, झाडांचा पाला ह्यापासून ते बनवले जाते. रासायनिक खतांचा वापर आढळला नाही. शेतात स्त्री व पुरूष दोघेही राबतात. पूर्वी स्त्रीया नांगर धरीत नव्हत्या. ते अशुभ मानले जाई पण पुरूष मोठ्या प्रमाणांत जेथे जेथे बाहेर गेला तेथे तेथे हल्ली स्त्रीया नांगरही धरतात असे एका गावात सांगण्यात आले.

तेथील शेती कष्टाची वाटते. शेतीची अवजारे खांद्यावर घेऊन डोंगर चढणें, खताच्या टोपल्या वाहणें, तयार माल घरी आणणें इत्यादी कामे अतिशय कष्टाची वाटतात.

## इतर जोडधंदे

पशुपालन हा जोडधंदा येथे आढळतो. गाय, बैल, शेळयामेंढ्या इ. जनावरे घरोघरी आहेत. २ बैल, १ ते २ म्हशी, गाई आढळतात. पैसा मिळवण्यासाठी घरटी १ ते २ म्हशी आढळतात. ह्या भागात गाईचे दूध देण्याचे प्रमाण कमी आहेत. येथील लोक कधी स्वस्थ बसलेली दिसली नाहीत. गप्पा मारतांना सुद्धा हातातल्या टकळीवर लोकरीचे धागे करण्याचे त्यांचे काम चालूच असते. काही गावात लोकर तयार करण्याची मशिने आढळली. पूर्वीच्याकाळी तिबेटी लोकांबरोबर हे लोक व्यापार करीत असत.

बहुतेक गावातील लोक नोकरीवर नाहीत. शेती व्यतिरिक्त उत्पन्नाचे साधन म्हणून रस्त्यावर मजूर म्हणून हे लोक काम करतांना आढळतात.

## 'गाँव का सर'

गावे आणि जंगले ह्यांचा संबंध अतिशय जवळचा वाटला. गावकऱ्यांना चारा, पाणी, नेहमीचे इंधनाचे लाकूड ह्यासाठी जंगलावर अवलंबून राहावे लागते. 'डांग' ह्या गावातील एका गावकऱ्यापेक्षा त्यांचा शब्दावरून तेथील गावकऱ्यांच्या जंगलाविषयी भावना लक्षात येतात 'जंगल हमारे गाँवका सर है' असे त्याने जंगलाविषयी मोठ्या आपुलकीने सांगितले. बहुतेक गावांभोवती जंगलामध्ये चीडची झाडे आढळली काही ठिकाणी बांज, बुरांज, भीमल, गुरियारची झाडे आढळली.

## जंगलतोडीचे तोटे

स्थानिक लोकांना जंगल-तोड थांबवण्याचे महत्त्व उमगले आहे. जमिनीची धूप होणे, उपजाऊ जमीन नष्ट होणे, चारा घटणे, नद्यांना पूर येणे वगैरे गोष्टी जंगलतोडीशी निगडीत आहेत हे त्यांना समजले आहे. चीड, ओक, देवदार झाडांचे महत्त्व ह्या लोकांनी आम्हाला समजावून दिले. अलिकडे देवदार आणि ओक ही महत्त्वाची झाडे कमी झाली आहेत ह्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. बांज व देवदार ह्या झाडांना ते कल्पवृक्षच मानतात.

डाँग गावाशेजारी जंगल तोडून तेथे तंत्रशाळा होणार होती. तंत्रशाळा होण्यास लोकांचा विरोध नव्हता. परंतु जंगल तोडले जाणार ह्या गोष्टीला त्यांनी जोरदार विरोध केला. तंत्रशाळा जंगल न तोडता दुसरीकडे उभारता येईल असा पर्याय सुचविला. जंगलामधे पाईनवृक्षाला घाव घालून राळ काढली जाते. विरोध राळ काढण्यास नसून ती ज्या पद्धतीने काढण्यात येते त्या पद्धतीला आहे. ठेकेदार वृक्षावर खोल आणि मोठे घाव घालतात (जास्त राळ मिळविण्यासाठी). ह्या पद्धतीमुळे झाड अधू बनते व कालांतराने वाऱ्याच्या झोताबरोबर कोलमडून पडते.

## फसवणूक

कन्सेंट ह्या गावात विठू गाढ नावाचा पहाड आहे. तेथे मनेरी-भाली वीज-घर प्रकल्पासाठी लागणारी-मशिनरी बसवण्यात येणार आहे व तेथील पहाड तोडून त्यामधील दगड वापरण्यात येणार आहे. हा प्रकल्प अनेक वर्षे चालणार आहे. त्या पहाडातील दगड काढून घेतल्याने काही वर्षात तो पहाड खाली येण्याची व शेतीचे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे स्थानिक लोकांचा विरोध आहे. तेथील जंगलात बांज-बुराज, सानल वगैरे निरनिराळ्या प्रकारची झाडे आहेत व तीसुद्धा नष्ट होतील. ह्या प्रकल्पाच्या सुरवातीस सरकारकडून अनेक आश्वासने देण्यात आली. ह्या क्षेत्रातील लोकांना नोकरी देऊ, शेत-जमिनीचा योग्य मोबदला देऊ इ. सरकारने एकही आश्वासन पूर्ण केले नाही. येथील कामासाठी बिहार आणि मद्रासमधून

माणसे आणली गेली व स्थानिक लोकांना डावलण्यात आले. आतापर्यंत अर्ज, विनवण्या, सरकारी अधिकाऱ्यांशी बोलणी झाली आहे. परंतु ह्याचा उपयोग नाही म्हणून हे लोक सरकारशी लढाई करण्याच्या मनस्थितीत आहेत. आमची सहनशीलता संपली असून आमच्या गरीबीचा, असहायतेचा ही मंडळी फायदा घेत आहेत. ह्यासाठी आंदोलन रूपी लढाई थोड्याच दिवसात उभारणार आहेत, अशी लोकभावना होती.

डबरानी ह्या गावात कनोडिया-गाड येथे १९७८-मध्ये मोठी दुर्घटना घडली. तेथे दोन्ही बाजूने पहाड. कोसळून भागीरथी नदीला मोठा बांध तयार झाला. ८ तास पाणी अडले गेले व नंतर बांध फुटून जवळचे गंगनानी हे गाव पूर्णपणे वाहून गेले. तसेच एक हजार हेक्टर जंगल नष्ट झाले. तसेच तेथे ६ ते ८ मीटर भू-क्षरण (Silt) डबर व मोठाले दगड ह्यामुळे संपूर्ण शहर गाडले गेले.

'भू-सर्वेक्षण खात्या'कडून ह्या भागाची पहाणी व अभ्यास झाला.त्यांच्या अहवालानुसार ही घटना नैसर्गिक, भूगर्भातील घडामोडीमुळे झालेली आहे. परंतु हिमालया-तील हा सर्व परिसर भूकंप दृष्टया अस्थिर आहे व भूगर्भातील दोषामुळे मानवनिर्मित कोणतीही साधी गोष्ट मोठ्या दुष्परिणामाकडे नेते. उदा०जंगलतोडीमुळे व वनसंवर्धनाच्या अभावामुळे नद्यांना पूर येणे व भू-क्षरण होणे ह्यात वाढ झाली आहे. 'ग्यानसू' येथे दहा वर्षापूर्वी मोठा जंगल लिलाव झाला होता. ५ लाख वृक्ष अधिकृतरित्या कापण्यात आली. २२ जून ८० रोजी अचानक रात्री प्रचंड पूर आला अनेक लोक मृत्युमुखी पडले. शेती व जनावरांचे बरेच नुकसान झाले ह्या घटनेचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी ह्या भागात वृक्षा-रोपण करावयाचा सल्ला दिला आहे.

## तीव्र पडसाद

तसेच 'मातली' येथे सुद्धा मोठ्या प्रमाणांत भूस्खलन झाले. उत्तरकाशीहून १० किलो मीटर अंतरावर 'रेतूरी सेरा' येथे मोठ्या प्रमाणांत भूस्खलन व पूर येणे ह्यामुळे नुकसान झाले. नवे रस्ते नष्ट झाले. कनोडिया गाढच्या दुर्घटनेच्या वेळी भागीरथीवरील लोखंडी पूल १०० फूट दूर फेकला गेला. त्यावरून ह्या दुर्घटनेची तीव्रता लक्षात येते. ह्या दुर्घटनेचा तीव्र पड-साद भंगेली गावात पहावयास मिळाला. आम्ही त्या गावात पोहचलो तेव्हा गावातील 'सावकार सिंग' ह्यांची भेट घेतली. 'तुमच्यासारखे पुष्कळ लोक येतात आणि जातात पण आम्ही होतो तेथेच आहोत. आमच्या समस्या त्याच आहेत. आतापर्यंत पुष्कळ अर्ज, विनवण्या झाल्या. परंतु सरकार आम्हाला दाद देत नाही. कनो-डियागाढ दुर्घटनेमुळे आमची उपजाऊ जमिन वाहून गेली. धष्टपुष्ट जनावरे वाहून गेली. आमच्या जमिनी वाहून गेल्या. तरिही त्यावरचा शेतसाराही आम्हालाच भरावा लागतो.' असे त्यांच्या बोलण्यात आले. रात्री तेथील छोटया मुलींनी जे लोकसंगीत गायले त्यामध्ये सुद्धा कनोडिया घाट, गंगा ह्यांचेच वर्णन होते. ह्या गावात पाचवीपर्यंत शाळा आहे. रस्ता अतिशय धोक्याचा आहे. हे गाव १० हजार फूटावर आहे. रस्ते चांगले नाहीत व दवाखाना नाही. गावाकडे जाताना दोनदा गायब झालेल्या रस्त्यावरून वाट काढत आम्हाला जावे लागले. खाली खोल वाहणारी भागीरथी व वर आ वासून पहाणारा पहाड व त्या भूस्खलन झालेल्या दगडांवरून जाणारी आमची तुकडी हिंमतीने पुढे मार्ग काढत होती. अशा दुर्गम ठिकाणी राहून आयुष्य काढणाऱ्या निधड्या छातीच्या व आपत्तीला हसत-खेळत तोंड देणाऱ्या लोकांसाठी काही तरी करा-वेसे वाटले.

## वनसंपत्ती

जळण, चारा आणण्याचे काम मुख्यत: स्त्रीयाच करतात. त्यासाठी ३ ते ४ किलो मीटर अंतरावर जावे लागते. टेहरी जिल्ह्यातील रौनिया, लम्बगाव, नौघर, पोखरी ह्या गावाच्या जवळपास सिव्हील पंचायतींनी जंगले राखली आहेत. ह्या जंगलातून लाकूड जरा का चोरून घेतले तर त्या माणसाळा १२५ रुपयां पर्यंत दंड करतात. गावकऱ्यांनी त्यांना उपयुक्त झाडे लावली आहेत. झेंडवा, माली, बमोरा, गेहुआई, काफल इ. फळे सुद्धा आहेत. लग्नसमारंभात जर जास्त लाकडाची जरूरी लागली तर गावकऱ्यांची मिटींग होते व लाकूड किती द्यावयाचे ठरविले जाते. उत्तरकाशी जिल्ह्यातील अभ्यासलेल्या गावामध्ये सुद्धा जळण चारा आणायला ४ किलो मीटर जावे लागते. 'रौनी' ह्या गावामध्ये पाण्याचा झरा जवळपास नाही. ५ ते ७ कि. मी. अंत-रावर पाण्यासाठी जावे लागते. 'पोखरी' गावात नळाच्या पाण्याची सोय स्वत: केली आहे. त्यामुळे सरकारकडे पाणी–कर भरावा लागत नाही.

पोखरी ह्या गावामध्ये १९६२ मध्ये टीडी नावाची

कीड धान्यावर पडली. ४ ते ५ वर्षापूर्वी मोठ्या मोठ्या गारा पडल्या होत्या व शेताचे फार नुकसान झाले सरकारने अर्धा शेतसारा माफ केला होता.

गावामध्ये स्त्री–पुरुष यांची संख्या समान दिसली. मुले सरासरी ३ ते ४ दिसली. प्रचंड थंडीचा कडाका, हिमालयातील काबाडकष्ट त्यामुळे म्हातारी माणसे फारशी जगत नसावीत, असे वाटते.

उत्तराखंडातील पुरुषप्रधान संस्कृतीचा व निसर्गाचा पहिला बळी म्हणजे स्त्री होय. पहाटे चार वाजल्यापासून रात्री दहापर्यंत स्त्रीला अखंड राबावे लागते. जनावरांना लागणारा चारा, स्वयंपाकास लागणारे इंधन, खते तयार करण्यास लागणारा पालापाचोळा आणणे ही कामे प्रामुख्याने स्त्रीयांनाच करावी लागतात.

आमच्या बरोबर असलेले स्थानिक कार्यकर्ते श्री.विजय जडधारी ह्यांनी एक मजेशीर बातमी सांगितली. ती अशी की 'गंगी' ह्या गावामधे चारा, पाण्याचे इतके प्रश्न आहेत की कुठल्याही परिस्थितीमधे आपल्या मुलीला त्या गावी द्यायला मुलींचे पिताजी तयार होत नाहीत. त्यावरून ह्या पहाडी कन्येच्या कष्टप्रद जीवनाची आपल्याला जाणीव होते.

## सुटीची मागणी

उत्तरकाशीमधे ज्या गावांना आम्ही भेटी दिल्या त्या गावामधे कुठेही महिला संघटन आम्हाला दिसले नाही. परंतु टेहरी गढ़वाल जिल्ह्यातील स्त्रिया त्या मानाने जागृत वाटल्या. गेल्या ६ ते ७ वर्षापासून ह्या गावात महिला मंडळे आहेत. आठवड्यातून एक दिवस त्यांची बैठक होते. ह्या भागामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणाचे प्रमाणही जास्त आढळले पोखरी गावामध्ये विशेष गोष्ट आढळली ती म्हणजे **आम्हाला आठवड्यातून एक दिवस सुट्टी दिली पाहिजे अशी मागणी महिलांनी केली आहे.** ती सुट्टी तेथील महिला घरादाराची, मुलाबाळांची स्वच्छता करण्यात घालवितात. ही गोष्ट फार चांगली आहे. पुरुषांनी सुद्धा ती मागणी मान्य केली आहे. हिमालयातील पहाडी भागात एकंदरीत स्वच्छता तशी कमी आढळली. त्यामुळे त्या स्त्रियांची ही मागणी फारच आवडली. द्वारकादेवी व भूमादेवी ह्या दोन कणखर व्यक्तिमत्वाच्या महिला अध्यक्षा म्हणून लाभल्या आहेत. स्त्रियांचे एकंदरीत समाजातील स्थान चांगले वाटले. त्यांचे मत विचारात घेतले जाते.

## सौंदर्याची देणगी

स्त्रियांच्यावर बरीच कामे पडतात. महिलांच्या ज्या बैठकी होतात, त्यामध्ये दारूबंदी, मुलाबाळांच्या समस्या, शेतीमधील समस्या वगैरे अनेक गोष्टींवर ह्या स्त्रिया चर्चा करू शकतात व निर्णय घेऊ शकतात. ह्या गोष्टी पाहिल्यावर मनापासून आनंद वाटतो. हिमालयातील ह्या स्त्रियांना व पुरुषांना सौंदर्याची देणगी लाभलेली आढळते.

आम्ही ज्या उत्तरकाशीच्या जिल्ह्यातील भागातून हिंडलो. त्या भागात चिपको आंदोलनाबाबत काहीच माहिती स्त्रियांना नव्हती. पुरुषांना निदान नाव तरी माहीत होते, पण स्त्रियांना 'चिपको आंदोलन' हा शब्दच नवीन होता. टेहरी गढवालमधील रौनी ह्या गावी त्या संबंधी माहिती होती.

गावामधे वन कर्मचारी, वनमजूर ह्यांची व आमची काही भेट झाली नाही. 'नौघर' आणि 'पोखरी' ह्या दोन गावामधे ठेकेदारांची वस्ती जास्त आढळली ठेकेदारांचा अर्थातच आंदोलनास विरोध आढळला. वनसंवर्धनाच्या बाबतीत कोणीही विचार केला नाही. पण रौनी गावातील तरुण कार्यकर्ते विजयसिंग ह्यांनी मात्र ह्यापुढे वनसंवर्धनासाठी जरूर प्रयत्न करू असे सांगितले.

लंबगावरमधील प्रोफेसर रतौडी ह्यांच्या म्हणण्यानुसार लहानपणांपासून मुलांमध्ये जंगलाबद्दल प्रेम निर्माण केले पाहिजे. 'व' 'वनाचा' 'ल' लाकडातला अशीच आपल्या मुळाक्षरांची ओळख करून द्यायला पाहिजे. 'वन' विषयी अभ्यास करायला स्वतंत्र प्रोफेसर नेमले पाहिजेत, ह्याविषयी जरूर विचार व्हावा.

१५ मार्च रोजी गटातील काही सदस्यांनी टेहरीला जाऊन 'टेहरी धरण-प्रकल्प' योजनेची माहिती घेतली.

## टेहरी धरणयोजना

ह्या योजनेअंतर्गत 'भागीरथी' नदीवर 'टेहरी' ह्या ठिकाणाहून १–१/२ किलो मीटरावर एक दगडी धरण बांधण्यांचा प्रस्ताव आहे.ह्या धरणाची उंची २४६ मीटर असेल. धरणाच्या ठिकाणी नदीचे पाणलोट क्षेत्रफळ २९०० वर्ग मैल असेल. ह्या धरणामुळे जो जलाशय तयार होईल त्याची क्षमता $२.१२\times१०^{६}$ एकर फूट असेल. त्यातील $२.०७+१०^{६}$ एकर फूट जलाशय सिंचन व वीज उत्पादन ह्यासाठी वापरात आणण्याची योजना आहे. ह्या धरणाच्या बांधकामासाठी अंदाजे

$१९४ \times १०^{५}$ घन मीटर माती आणि दगड ह्यांची आवश्यकता आहे. ह्या व्यतिरिक्त $२८ \times १०^{५}$ घनमीटर चिकण मातीची आवश्यकता आहे.

वीजउत्पादनक्षमता ६०० मेगावॅट होणार आहे. आणि $२८७५ \times १०^{६}$ युनिट वीज प्रतिवर्षी उत्पादन होणार आहे.

वीजनिर्मितीव्यतिरिक्त ही योजना जमीन-सिंचनात विविध सुविधा देणारी आहे. यांत २.७० लाख हेक्टर अतिरिक्त जमीन सिंचन होणार आहे व १४.१२ लाख हेक्टर जमीनीला अधिक पाणी उपलब्ध करून देण्यात येईल. ह्या योजनेचा खर्च अंदाजे ३०५ कोटी रुपये (१९७४ च्या मूल्यांनुसार) होता. वर्षाऋतूमध्ये जलाशयाच्या क्षमतेहून अधिक झालेले पाणी स्पिल वे (Spill-way) मधून धरणातून बाहेर जाईल. ह्या योजनेचे कार्य पूर्ण झाल्यावर पुरामुळे होणारी हानी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

## धरणाचे तोटे

टेहरीच्या ह्या प्रचंड धरणामुळे होणाऱ्या विविध फायद्यांबरोबरच ह्या धरणामुळे पर्यावरण व मानवी जीवनावर होणारा त्याचा प्रचंड आघात ह्या अभ्यासातून 'टेहरी धरण संघर्ष समिती'ची स्थापना झाली व हे धरण तेथे न होता अन्य उपायांनी छोटी छोटी धरणे बांधून आपले प्रश्न सोडवावेत असे स्थानिक जनतेला वाटते. ह्या धरणासंबंधी संघर्ष समितीने मांडलेले नकारात्मक मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१) भूकंपक्षम कक्षेत धरण येते.

हे धरण ज्या जागीबांधण्यात येणार आहे, तेथील भू-भौतिक परिस्थिती, (भूकंप अभियांत्रिकी परिस्थिती) गुंतागुंतीची आहे. भौगोलिकदृष्टया अत्यंत तरुण असलेला हिमालय व तेथील गुंतागुंतीची, पृथ्वीच्या पृष्ठभागाची दोषपूर्ण हालचाल यामुळे ती जागा मोठे धरण बांधण्यास योग्य दिसत नाही. १९०५ मध्ये झालेल्या कांगडा भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ८.० इतकी होती. ही तीव्रता फार मोठी मानली जाते. टेहरी धरणाची जागा कांगडा भूकंपाच्या ७ व ८ भूकंपरेखामध्ये मानली जाते. धरणनिर्मित भूकंपाचा अभ्यास करताना, ज्या धरणांची उंची १०० मीटरहून अधिक आहे त्या धरणांमध्ये भूकंप होण्याची शक्यता वाढते असे वैज्ञानिकांचे संशोधन आहे.

२) धरणातील पाणी झिरपल्यामुळे निर्माण होणारे धोके. नदीच्या पात्रातील अनेक खडकांमध्ये ओपन जॉइंटस्-भूदोष असलेले पट्टे आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी झिरपले जाणार आहे.

३) भूस्खलनामुळे धरणास निर्माण होणारे धोके.

४) कल्पनातीत जोखीम स्विकारावी लागेल.

भागीरथीच्या पात्रात जे भूक्षरण होते ते जगात जास्त समजले जाते. त्यामुळे धरणाचे आयुष्यमान कमी होणार आहे. करोडो रुपये खर्ची पडणार आहेत, ७०,००० पेक्षा अधिक लोकांना स्थलांतर करण्याची वेळ येणार आहे. तेथील पूर्वापार चालत आलेले सांस्कृतिक, ऐतिहासिक जीवन नष्ट होणार आहे. हजारो एकर उपजाऊ जमीन धरणाच्या पाणलोटक्षेत्रात नाहिशी होणार आहे. लोकांच्या पुनर्वसनासाठी 'डून' दरीतील अत्यन्त मौल्यवान जंगले नष्ट होणार आहेत.

५) पर्यावरण व इतर संबंधित भागाचा अभ्यास केला गेलेला नाही.

६) स्थानिक लोकांचा ह्या धरणास विरोध आहे.


७) अनेक मान्यवर भूगर्भतज्ज्ञांनी हे धरण बांधण्याच्या विरोधी मते प्रकट केली आहेत.

भागीरथी – अलकनंदेच्या (गंगेच्या) पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी एक 'मास्टर प्लॅन' बनविण्यात आला असून टेहरी, मनेरी, विष्णुप्रयागसारख्या जल–विद्युत व पाट–बंधाऱ्यांच्या सुमारे ४२ योजनांचा त्यामध्ये समावेश आहे. त्यामुळे सुमारे ५००० मेगावॅट विद्युत–निर्मिती व $३.४ \times १०^{६}$ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

## संतुलन राखले जावे

देशाच्या विकासासाठी पाणी व वीजेची अत्यंत आवश्यकता आहे हे कोणीहि नाकबूल करणार नाही. पण या योजना आखताना उत्तराखंडाच्या एकूण नैसर्गिक व सामाजिक संतुलनाचा काळजीपूर्वक अभ्यास व्हायला पाहिजे असे वाटते. दुर्दैवाने तशी वस्तुस्थिती नाही आणि देशभरचा अनुभवहि विशेष आशादायक नाही.

'विकास' कोणाचा, कोणाच्या जीवावर आणि काय किंमतीवर याचे समीकरण तपासून पहायला पाहिजे !




## गट क्रमांक – ३ : अलकनंदा

**सदस्य –**

१) सुरेश परांजपे, गटप्रमुख २) राजू जोशी, उप-प्रमुख ३) हरिभाऊ पुरोहित ४) आलमगीर मुलाणी ५) काळुराम धांगडा ६) नामदेव ओव्हाळ ७) जीवन शेलार ८) मंगला जोशी ९) अलका कुळकर्णी.

गोपेश्वरच्या दशौली ग्रामस्वराज्य संघाचे कार्यकर्ते भूपालसिंग (ऊर्फ मामुजी) आणि जगदीशप्रसाद हाटवाल हे दोन मार्गदर्शक आमच्या गटाबरोबर होते.

अलकनंदेच्या खोऱ्यातील पीपलकोटी–जोशीमठ भागातील प्रदेशाचा व त्यातील काही गावांचा आम्ही अभ्यास केला. पीपलकोटीपासून बेमरू, स्युण, पोखरी, लांझी, डिंवग, तपोवन या मार्गाने लंगसी पर्यंत आम्ही डोंगरवाटांवरून पायी प्रवास केला. नंतर बसने प्रवास करून रेणी आणि पाखी ही गावे पाहिली.

## अभ्यासाची व अहवालाची पद्धत

पहाणी-पत्रकातील मुद्यांना अनुसरून अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा असल्याने आमच्या गटातील प्रत्येक सदस्याने आपल्या आवडीनुसार त्यापैकी १।२ मुद्यांचा विशेषकरून अभ्यास केला.

आम्ही अभ्यासलेला प्रदेश उत्तरप्रदेश राज्याच्या गढवाल भागातील चामोली जिल्ह्यात येतो. गोपेश्वर आणि जोशीमठ ही या भागातील मुख्य डाकघरे आहेत.

बद्रीनारायणाला जाणारा मोटार रस्ता हा या भागातला एकमेव मोटाररस्ता होय. हा रस्ता अलकनंदेच्या डाव्या काठावरून जातो. आम्ही पाहिलेली गावे या रस्त्यापासून ५ ते १० किलोमीटर अंतरावर आहेत. पाखी (गरुडगंगा) हे गाव रस्त्यावरच आहे. रेणी गाव जोशीमठहून मलारीकडे जाणाऱ्या मोटाररस्त्यावर आहे. ते ऋषिगंगा व धौलीगंगा यांच्या संगमावर आहे. अलकनंदेच्या उजव्या काठावर बेमरू, पोखरी व डिंवग ही गावे आहेत. अलकनंदेस मिळणाऱ्या मैनागाडच्या काठी स्युण गाव आहे. या सगळ्या गावांची उंची समुद्रसपाटीपासून चार हजार ते सहा हजार फुटांच्या दरम्यान आहे. सगळ्या गावातून दिवसात एकदा टपाल निघते. बेमरू, डिंवग व पाखी गावात पोष्टाची सोय आहे.

सगळ्या गावांमध्ये शाळा आहेत. काही शाळा १ ली ते ५ वी पर्यंत आहेत. काही शाळा ८ वी पर्यंत आहेत. ९ वी, १० वी चे शिक्षण पिपलकोटी/चमोली येथे आहे. गोपेश्वर/जोशीमठ येथे महाविद्यालये आहेत. श्रीनगर येथे गढवाल विश्वविद्यालय आहे. कोणत्याच गावात बँक नाही. जवळची बँक पीपलकोटी येथे आहे. जोशीमठला बँका आहेत.

पाखी गाव रस्त्यावर असल्याने तेथे वीज आली आहे. इतर कोणत्याच गावात वीज पोहोचलेली नाही. या गावात दवाखाना आहे. पण पुरेशी औषधे नसतात, असे ऐकले. इतर गावात दवाखाना नाही. परंतु ठराविक दिवशी डॉक्टरची फेरी असते. हॉस्पिटलसाठी पिपलकोटी/जोशीमठला जावे लागते.

गावात घरांची सरासरी संख्या २०।२५ आणि या गावांची सरासरी लोकसंख्या १२५।१५० आढळली. ठाकूर (क्षत्रिय, राजपूत) लोक बहुसंख्य आहेत. ते नावाच्या शेवटी 'सिंग' (सिंह) उपपद लावतात. पंडित (ब्राह्मण) व अछूत (हरिजन) फार कमी आहेत. 'दत्त' किंवा 'प्रसाद' नावावरून ब्राह्मण आणि 'लाल' नावावरून हरिजन ओळखावा. हरिजन वस्ती गावापासून दूर असते. त्यांच्या घरी सवर्ण खात-पीत नाहीत. तरीही गावकऱ्यांचे व हरिजनांचे संबंध सलोख्याचे व तणावरहित दिसले. रेणी गावात भुतिया (भोटिया) हे अनुसूचित जमातीचे लोक रहातात.

गावातली घरे दुमजली आहेत. भिंती दगडाच्या, खांब, वासे, तुळया आणि दारा-खिडक्यांच्या चौकटी लाकडी असतात. छपरे सपाट दगडाने-स्लेटने आच्छादली जातात. हे स्लेटचेच तुकडे भिंतीच्या दगडांमधे 'सिमेंट'चे काम करतात. दर्शनी दरवाजावर गणपती कोरलेला असतो. काही सधन गावकऱ्यांच्या घरांच्या दर्शनी भागात लाकडी महिरपींचा व कोरीव कामाचा उपयोग आढळला.

## परस्पर सामंजस्य

१६ मुठी म्हणजे १ नाली, २० नाली म्हणजे १ एकर असा जमीन मोजणीचा हिशेब आहे. जेवढ्या जमिनीत १ मूठ धान्य पेरले जाते तेवढा तुकडा १ मुठीचा ! एक एकर सलग शेत पहावयास मिळत नाही. डोंगर उतारावर पायऱ्या पायऱ्यांनी शेती केलेली असते. एका कुटुंबाकडे सरासरी ३० ते ४० नाली जमीन असते. गावापासून नदीकडे पाचशे ते हजार फूट उंचीच्या उतारावर गावची शेते पसरलेली असतात. मोठ्यातल्या मोठ्या शेतकऱ्याकडेही पाच एकरापेक्षा जास्त जमीन नसते. रूढार्थाने येथे कुणी जमीनदार नाही, भूमिहीन नाही आणि शेतमजूरहि नाही. शेतीच्या हंगामात एखाद्या कुटुंबाची अडचण असेल तर इतर गावकरी त्याला मदत करतात. पण अशा उसनवार कामगारास रोख पैसे देत नाहीत; त्या दिवसाचे जेवणखाण दिले की भागले.

तांदूळ, गहू, मुंडवा (नाचणी) राजमा ही काही पिके आहेत. खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगमांत पिके घेतात. स्युण गावामधून गेलेल्या ओढ्याच्या एका अंगास रब्बीचा गहू उभा होता, तर दुसऱ्या अंगाच्या रिकाम्या शेतांमध्ये शेते जाळण्यासाठी काटक्या-कुटक्या जमा केलेल्या होत्या. श्रावण, भाद्रपद म्हणजे ऑगस्ट, सप्टेंबर हे पावसाचे महिने आहेत. झरे बारमाही आहेत; पण त्यांचे पाणी कमी कमी होते. पाखी गावात डोंगरात उंचावर नहर (कालवा) बांधून त्याचे पाणी पन्हाळींनी खाली शेतांपर्यंत आणले आहे. ' नहर हवा ' ही सगळ्याच गावांची मागणी (मांग) दिसली. शेण, माती, पालापाचोळा यांचे नैसर्गिक खत वापरतात. कृत्रिम रासायनिक खते वापरीत नाहीत. दर एकरी ८/१० क्विंटल उत्पन्न असावे.

रस्त्यावरच्या गावांमध्ये दुकानदारी चालते. रस्त्यापासून फार दूर नसलेल्या गावांतून तूप, माल्टे (संत्री) लोकरीचे कपडे, जळाऊ लाकडे अशा वस्तू विक्रीसाठी रस्त्यावरच्या गावात येतात. अनेक गावांचे मिळून बाजाराचे एकच गाव असते.

गप्पा मारताना गावकरी स्वस्थ न बसता टळकीवर लोकर कातत असतात. रेणी गावात इतर गावांपेक्षा लोकर कातण्याची व विणण्याची सुधारित यंत्रे आढळली. रेणी गाव तिबेटकडे जाणाऱ्या ' नितिघाटी ' च्या वाटेवर असल्याने येथले भुतिया लोक तिबेटशी पूर्वापार व्यापार करीत असत. १९६२ च्या युद्धानंतर हा व्यापार बंद पडला. रेणीमध्ये लोकरीचे कलाकुसरीचे गालिचे तयार होतात. त्यांना ५००ते ७०० रुपये किंमत येते. व्यापारामुळे रेणीचे भुतिया हे इतर गावातील गढवालींपेक्षा चलाख दिसतात.

काही गावकरी पाणचक्कीत भांडवल घालतात. डोंगरात उंचावरून येणाऱ्या झऱ्याच्या वेगवान पाण्याच्या जोरावर या पाणचक्क्या चालतात. पाखी गावात गरुडगंगेच्या प्रवाहावर अशा ५/७ चक्क्या उभ्या दिसल्या. चक्कीचा मालक दळलेल्या धान्यातून काही भाग वसूल करतो. गोपेश्वरजवळ डोंगरी झऱ्यांचा उपयोग करून छोट्या प्रमाणावर वीजनिर्मिती होते.

रस्ताबांधणी व रस्तादुरुस्तीच्या कामांमुळे काही गावकऱ्यांना रोजगार मिळतो. हरिजनांकडे दोन कामे दिलेली आढळली. ते लोहार काम करून गावासाठी नांगराचे फाळ तयार करतात. ' दास ' आहेत ते उत्सवात ढोल वाजवितात.

## कुटुंबाची गोशाळा

सगळी कुटुंबे दूध-दुभत्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहेत. दुधासाठी म्हैस आणि शेणखतासाठी गायी पाळतात. लोकरीसाठी बकऱ्या-मेंढया पाळतात. डिंबग गावात बकऱ्यांचा उपयोग धान्यवाहतुकीसाठी होत असलेला आढळला. प्रत्येक कुटुंबाची गोशाळा असते. ती घराजवळ असेल असे नाही. स्युण गावात ओढ्याच्या एका बाजूस सर्व राहती घरे व दुसऱ्या बाजूस सर्वांच्या गोशाळा अशी रचना आढळली. गोशाळांची जमीन व छप्पर गवताने शाकारले जाते. म्हैस हे चणीने मोठे जनावर आहे. ते डोंगरउतारावर चरू शकत नाही. चारा गोळा करून म्हशीसमोर आणून टाकावा लागतो. गायी चणीने लहान आहेत. त्या गवतासाठी डोंगरउतारावर कुठेही अडचणीच्या जागी जातात. चारा

कमी होत चालल्याचा परिणाम म्हशींची संख्या रोडावण्यात झाला आहे. पोखरी गावात भरपूर दूधदुभते दिसते. तेथे प्रत्येक कुटुंबाकडे १०/२० बकऱ्या आहेत. म्हैस दरवेळेस ८/१० लिटर दूध देते. गाय जेमतेम १ लिटर दूध देते. शिकणाऱ्या मुलांचा गुरेचारणीस उपयोग होत नाही, याचा गावकऱ्यांना खेद वाटतो.

स्युण गावाला जंगल जवळ आहे. त्यात सूचिपर्णी व रुंदपर्णी असे दोन्ही प्रकारचे वृक्ष आहेत. रेणी आणि पाखी गावची जंगले गावापासून उंचावर आहेत. बेमरू गावाचे जंगल विरळ आहे. पोखरी, लांझी, डिंवग या गावांना जंगले नाहीत. कारण ही गावे वृक्षहीन डोंगर-उतारांवर आहेत. येथे पूर्वीही कधी जंगल नव्हते. अलकनंदेचे हे ठळक वैशिष्ट्य दिसते की, तिच्या एका काठावरच्या डोंगरउतारांवर वृक्षांनी आच्छादिलेली जंगले आहेत, तर दुसऱ्या काठावरचे डोंगर उजाड, बोडके, वृक्षहीन दिसतात.

पंचायती किंवा सिव्हिल-स्वयंवने ही गावाची हक्काची जंगले होत. त्यापलीकडचे जंगल सरकारचे म्हणजे वनखात्याकडे असते. रेणी आणि पाखी वगळता इतर कोणत्याच गावात जंगलतोडीचा प्रश्न पूर्वीही नव्हता व आताही नाही. रेणी गावात पूर्वी जंगलतोड झाली; परंतु तेथे चिपको-आंदोलन झाल्यापासून जंगलतोड थांबली. पाखी गावात भूस्खलनामुळे डोंगरउतारावरचे झाडीचे पट्टे नष्ट होत आहेत.

## नैसर्गिक आपत्ती

पूर, दुष्काळ आणि भूस्खलन या नैसर्गिक आपत्ती गावकऱ्यांवर अधूनमधून कोसळतात. १९७० सालचा अलकनंदेचा पूर लोक अजून विसरलेले नाहीत. पाताळगंगेच्या खोऱ्यात झालेल्या भूस्खलनामुळे जे डबर (Debris) वाहात आले त्याचा तात्पुरता बांध अलकनंदेत उभा राहिला. अलकनंदेची पातळी वाढत गेली. पाण्याच्या दाबाने बंधारा फुटल्यावर पुढच्या गावांवर धरणफुटीने कोसळावा तसा जलप्रलय झाला. १९७८ मध्ये भागीरथीच्या खोऱ्यात डबरानीजवळ अशीच घटना घडली. अशा घटना पुढेहि घडण्याचा संभव आहे. अलकनंदेच्या पुराने जे बेलाकुची गाव वाहून गेले तेथला प्रदेश आम्ही जवळून पाहिला. लंगसीच्या जवळ पाताळगंगेच्या काठी मोठमोठे कडे धोकादायक अवस्थेत आहेत. ते केव्हाही कोसळतील व १९७० सालची परिस्थिति पुन्हा उद्भवेल अशी भीती वाटते.

अलकनंदेच्या उजव्या तीरावरील बेमरू, पोखरी, लांझी, डिंवग या गावचे डोंगर कणखर, घट्ट दगडाचे दिसतात. तेथे भूस्खलनाच्या खुणा फार कमी दिसल्या. याउलट अलकनंदेच्या डाव्या तीरावरील गरुडगंगेपासून पाताळगंगेपर्यंतचा जो प्रदेश पोखरी गावातून एका दृष्टिक्षेपात दिसतो त्या प्रदेशात सतत सुरू असलेल्या भूस्खलनाच्या खुणा जागोजागी दिसतात. भूस्खलनामुळे जागोजागी खंडित झालेला बद्रीनाथचा रस्ता व त्यावरून जाणाऱ्या बसगाड्या केविलवाण्या दिसतात. जंगलतोड आणि भूस्खलन यांचा निश्चित संबंध समजणे कठीण होते. कारण आज जे डोंगर वृक्षहीन आहेत तेथे भूस्खलन झालेले नाही आणि ज्या डोंगरावर झाडी आहे तेथे भूस्खलन मोठ्या प्रमाणात आहे, असेही दृश्य दिसले.

स्युण गावच्या लोकांना एकदा ओढ्याच्या पुराने फटका दिला. घरात दारे बंद करून ठेवलेली, अंगावर पिणारी मुले ओढ्याच्या अलीकडे व त्यांच्या कामावर गेलेल्या माता ओढ्यापलीकडे अशी दिवसभर ताटातूट झाली. या ओढ्याचे नाव ' ग्वाड् गढेरा.'

या नैसर्गिक उत्पाताशिवाय एकदा गावावर टोळधाडीचे आकस्मिक संकट आले होते. डुक्कर आणि अस्वले यांसारख्या जंगली जनावरांमुळे उभ्या पिकांचे अनेक वेळा नुकसान होते.

आम्ही हिंडलेल्या भागात जंगलतोडीचा प्रश्न आढळला नाही. गावांची लोकसंख्या फारशी वाढती नाही. जंगलतोडीचे प्रमाणही मोठे नाही. त्यामुळे जंगलाची घनता आणि लोकसंख्या यांचे प्रमाण फार खालावलेले नाही. जळण, चारा, पाणी मिळण्यात अडचणी आहेत, पण त्या पूर्वापार तशाच चालत आल्या आहेत.

## स्थलांतर कमी

शिकलेली मुले सैन्यात भरती होतात व गावाला दुरावतात याची गावकऱ्यांना खंत वाटते. येथील गावकऱ्यांची पहिली पिढी नुकतीच शाळेतून बाहेर पडत आहे. त्यामुळे नोकरीसाठी शहरांकडे स्थलांतर करणाऱ्यांची संख्या अजून तरी फार नाही.

पूर आणि भूस्खलन यामुळे सबंध गावच्या शेतजमिनींचे नुकसान होते, त्या वेळी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असेल, पण अशा आपद्ग्रस्त गावकऱ्यांशी आमचा संबंध आला नाही.

गावातील स्त्रीपुरुषांची संख्या समसमान दिसली. प्रत्येक जोडप्यास सरासरी ३/४ मुले आहेत. म्हाताऱ्या

माणसांची संख्या कमी दिसली. काबाडकष्ट, आजार आणि थंडीचा कडाका यामुळे वयाच्या साठीनंतर फारसे लोक जगत नसावेत.

## स्त्रिया अधिक मुक्त

पोखरी, ड्विंग, रेणी व पाखरी गावातल्या स्त्रिया धीट वाटल्या त्या आमच्या समोर सहजतेने वावरत होत्या. इकडल्या गावांमधून 'महिला मंगल' दले जीव धरत आहेत. बहुतांश कामे स्त्रिया करतात. त्यामानाने पुरुषांमध्ये उद्योगशीलता कमी आहे. कौटुंबिक निर्णयांमध्ये स्त्रीचे मत विचारात घेतात. येथल्या स्त्रिया चळवळीसाठी चटकन संघटित होतात. मराठी स्त्रीपेक्षा गढवाली स्त्रिया अधिक मुक्त वाटल्या.

आम्ही पाहिलेल्या गावांपैकी फक्त रेणी येथे चिपकोचे आंदोलन झाले होते. रेणी गावापाठच्या डोंगरावर जंगलतोडीसाठी ठेकेदाराने मालमोटार भरून माणसे आणली. गावातले पुरुष त्या वेळी गावात नव्हते. काही कामासाठी शहरात गेले होते. अशा वेळी गौरादेवींच्या नेतृत्वाखाली गावातील स्त्रिया संघटित झाल्या. त्यांनी जंगलतोड होऊ दिली नाही व ठेकेदाराच्या माणसांना परत पाठवले. गौरादेवींनी चिपको आंदोलनात गौरवगाथा लिहिली आहे. आजही गावात गौरादेवींच्या शब्दास मोठा मान आहे.

## सामाजिक वनीकरण

इतर गावांमध्ये अशा आंदोलनाचा प्रसंग आलेला नाही. तेथे चिपकोचे वेगळे स्वरूप पहावयास मिळते. बेमरू, स्युण, पोखरी, ड्विंग येथे गोपेश्वरच्या दशौली ग्रामसेवकसंघाने वृक्षारोपणाचे काम केले आहे. विशेषत: पाखी गावात फार मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण झाले आहे. गावकऱ्यांच्या मदतीने कार्यकर्त्यांनी दीवार बंदी केली आहे. पाखी गावात भूस्वलन होते त्या उतारांवर दगडी भिंती घालून कार्यकर्त्यांनी गवताचे बी पेरले आहे. पाखी गावात राष्ट्रीय सेवा योजनेतील महाविद्यालयीन तरुणांनीही कार्य केले आहे. तेथे सामाजिक वनीकरणाचा प्रयोगही झाला आहे. गावाजवळ मोटाररस्त्यावर दर १५ फुटांच्या अंतराने वृक्षारोपण करून त्या रोपांभोवती संरक्षक जाळ्या बसवल्या आहेत.

आम्ही हिंडलेल्या इतर गावांतील गावकऱ्यांनी चिपको आंदोलनात सक्रिय भाग घेतला नसला तरी त्यांनी 'चिपको' बद्दल बरेच काही ऐकले आहे. चिपकोच्या काही मागण्या अशा आहेत —— (१) जंगलखात्याने विशिष्ट कारणासाठी जंगलतोड करायचे ठरवले तर स्थानिक लोकांना रोजगार द्यावा. ठेकेदाराने बाहेरून मजूर आणू नयेत. (२) काही ग्रामोद्योग वनसंपत्तीवर आधारित आहेत. त्यासाठी स्थानिक लोकांना झाडे विकावीत. शहरातील उद्योगांसाठी जंगलखात्याने जंगलाची तोड करू नये. (३) कोणत्याच कारणासाठी जंगलतोड होऊ नये असा एका टोकाचा विचार सुद्धा काही 'चिपको'वाले मांडतात. (४) ज्या गावावर जंगलतोड व भूस्खलन यांचे संकट कोसळले आहे, तेथे नवे वनीकरण करण्याबाबत 'चिपको'वाले जंगलखात्याशी सहकार्य करतात.



रेणीच्या झुंजार गौरादेवी

लोकांच्या, विशेषत: स्त्रियांच्या भावनांना आवाहन करण्यासाठी चिपकोची काही विशिष्ट तंत्रे आहेत, ती तंत्रे अशी – (१) जी झाडे तोडण्यासाठी जंगलखात्याने खुणा (Marking) केल्या असतील त्या झाडांना स्त्रियांनी मिरवणुकीने जाऊन राखी बांधणे (२) राळ काढण्यासाठी झाडांना घातलेल्या मोठ्या घावांभोवती माती लिंपून व कापडाने बांधून त्यांची 'मलमपट्टी' करणे. (३) इतके करूनही ज्या झाडांची तोड होते त्यांच्याबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी 'भागवतसप्ताह'

करणे. हे भावनिक उपाय परिणामकारक नाहीत, असे ज्यांना वाटते ते जहाल लोक शहरांमध्ये जेथे जंगलाचे लिलाव होतात तेथे घुसून लिलाव होऊ देत नाहीत.

## महिला पहारेकरी

चिपको आंदोलनात महिलांचे स्थान बरेच वरचे आहे. रेणी गावात जंगलतोड होऊ नये म्हणून महिलांनी पुढाकार घेऊन वनरक्षिकेचे काम आळीपाळीने केले. गोपेश्वरमध्ये खाणीतून काढल्या जाणाऱ्या दगडांमुळे भूस्खलन होते, हे लक्षात आल्यावर, महिलांनी पुढाकार घेऊन, खाणींतून दगड काढले जाऊ नयेत, यासाठी महिला पहारेकरी नेमले.

वनसंवर्धनाबद्दलगा काही वकरी उत्सुक दिसले नाहीत पाखी गावात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण होऊनसुद्धा गावकरी त्याबद्दल उदासीन दिसले. दीवार–बंदीसाठी मात्र ते मदत करतात. कारण त्यामुळे जंगली जनावरांचा उपद्रव कमी होतो. जळण, चारा, राष्ट्रीय गरजा, वनसंवर्धन याबाबत व्यापक विचार करण्याची मजल गावकऱ्यांना व 'चिपको'च्या सामान्य कार्यकर्त्यांना अजून गाठावयाची आहे, असे दिसते. या प्रश्नांबाबत काही विचार सुचतात, ते असे – गावकरी जळणासाठी लाकूडफाटा वापरतात त्याला पर्याय न देता प्रतिबंध करणे अव्यवहार्य आहे. भाकड गायी शेणखतासाठी पोसणे हितावह नाही. कृत्रिम खतांचा प्रसार झाला पाहिजे; लहान चणीची पण भरपूर दूध देणारी गायीची जात संकरित करता आली तर दुधाचा व चाऱ्याचा प्रश्न बरोबरच सुटेल. दुधासाठी म्हशी बाळगण्याची जरुरी राहणार नाही. म्हशीला चारा देण्यासाठी मनुष्यबळ खर्ची टाकण्याची गरज नाही. आज शेणखतासाठी जेवढ्या गायी बाळगाव्या लागतात त्यांची संख्या वरील उपायांनी कमी झाली तर चाऱ्याच्या गवतावरचा भार हलका होईल.

## सहकारी संघटनांना उत्तेजन

जंगल कामगार सहकारी संघटना गावोगाव स्थापण्यास उत्तेजन दिले पाहिजे. त्यामुळे ठेकेदाराचा जाच नाहीसा होईल व स्थानिक रोजगार वाढेल. आवश्यकतेनुसार जंगलतोड करताना जंगलखात्याने शेतीची कामे नसतील असा ऋतू निवडावा. त्यामुळे शेतकऱ्यांना बिगरशेती-रोजगार मिळेल. जंगलांचा लिलाव शहरात न ठेवता जेथे जंगल तुटायचे आहे, तेथे करावा. त्यामुळे स्थानिक लोकांना लिलावात स्पर्धा करता येईल. जंगलखात्याच्या योजनांना जरूर ती पूर्वप्रसिद्धि मिळावी. जनतेला विश्वासात घेतले तर जंगलखात्याच्या योजनांबद्दल जनता साशंक राहणार नाही. पंचायती किंवा सिव्हिल–स्वयं वनक्षेत्रात वनसंवर्धनाचे काम करण्यासाठी स्वयंसेवी संघटनांनी पुढे आले पाहिजे. तसे झाले नाही तर जंगलखात्याच्या वनीकरणाच्या प्रयत्नांवर पाणी पडेल.

## गट क्रमांक ४, ५

**गट क्रमांक ४ – सदस्य :** पुरुषोत्तम शेठ-गटप्रमुख, सहस्रबुद्धे–उपगटप्रमुख. नीलम परुळेकर, काशिनाथ तांबे, विमल कुसराम, हिरामण देवरे चंद्रशेखर अवस्थी, आर. पी. पालेकर, दामोदर ठाकरे.

**गट क्रमांक ५ – सदस्य :** कुसुम कर्णिक-गटप्रमुख, वाहरू सोनावणे–उपगटप्रमुख, सीताराम बाजारे, सखरसिंग पटले, नरेन जाधव, विनायक अहिरे, सरस्वती शेवाळे, गोपाल बोदले.

**स्थानिक कार्यकर्ते :** १) भीमसिंग रावत २) जयदीप पुरोहित ३) प्रकाश मेठानी.

**पहाणी केलेल्या गावांची नावे :** १) टंगसा २) गैर ३) कठूड ४) दोगडी ५) कांडई ६) बछेर ७) पपडियाना ८) पाडोली ९) गोपेश्वर.

अलकनंदानदीची उपनदी बालखिलाच्या पाणलोटक्षेत्रात आमचे दोन गट पहाणी करत हिंडले. तिच्या पूर्व तटावर गोपेश्वर, पपडियाना, पाडोली आणि पश्चिम तटावर गैर, टंगसा, कांडई, कठूड, दोगडी, बछेर अशी गावे वसली आहेत. गोपेश्वर हे चमोली जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. मुख्य शहर या सर्व गावांपासून जवळ आहे. बरेच जण रोज गोपेश्वरला जाऊन परत येतात. तेथे नोकरी वा धंदा करतात. बस किंवा पायीही प्रवास करतात. शहर जवळ असल्याने त्याचा या गावांवर झालेला परिणाम सहज जाणवतो. तसेच गोपेश्वरच्या 'दशौली ग्रामस्वराज्यसंस्थे'चा प्रभावही प्रकर्षाने जाणवतो. या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या गावी उभ्या केलेल्या संस्था आणि चालवलेली कामे, वनसंवर्धनकार्यक्रम यातून हा प्रभाव दिसून येतो.

मध्यहिमालयाचा उंचीवरचा हा ५ ते ६ हजार फूट भाग खूप उंचसखल आहे. उंच आकाशाला भिडणारे

पहाड आणि पाताळात जाणाऱ्या नद्या, व्ही-आकाराच्या दऱ्या, चीड, बांज, तून, बुरांज या वृक्षांनी नटलेली धरती, तर कुठे भूस्खलनाने जखमी झालेली धरती, बर्फाने आच्छादिलेली उंच पर्वतशिखरे, हे सारे बघून मन अंतर्मुख होते. पर्वतांच्या अंगाखांद्यावर पायऱ्या-पायऱ्यांनी बांधलेली खाचरे, मधूनमधून कलकल करीत जाणारे स्वच्छ निर्झर, प्रदूषणविरहित वातावरण, निरनिराळे पक्षीगण याने मन प्रसन्न होते; पण या सगळ्या पार्श्वभूमीवर इथले कठीण मानवी जीवन मनाला अवघडून टाकते.

## अवघड रस्ते

पहाणी केलेली गावे हमरस्त्यापासून ५ किलोमीटरच्या आत होती; पण काही ठिकाणी असलेले पायरस्ते अवघड होते. पावले जपून टाकीत, तोल सांभाळीत काही वेळा चालावे लागे. अशा वेळी वाटायचे की, हे गावकरी-विषेशत: महिला, वृद्ध आणि लहान मुले रस्त्यावरून सतत येजा कशी करीत असतील. बहुतेक सर्व गावी पोस्टाची व्यवस्था होती. दोगडीसारख्या अवघड गावीही आठवड्यातून तीन वेळा पोस्टाचा रनर येऊन पत्रे वाटप आणि नेण्याचे काम करतो, हे विशेष वाटले सर्व गावांतून प्राथमिक शाळा आहेत. काही गावांत माध्यमिक शिक्षणाची सोय आहे. गोपेश्वरला महाविद्यालय आहे. आताची नवी पिढी शिक्षणापासून वंचित रहाणार नाही. पण त्यांच्या आईवडिलांची पिढी बरीचशी अशिक्षित आहे. एका पिढीच्या फरकात शिक्षणात पडलेला हा बदल आश्चर्यकारक वाटतो. बँकेची सोय गोपेश्वरलाच आहे. गावे लहानलहान असल्याने तेथे बँक असणे शक्य नाही. बँकिंग एक संस्था म्हणून गावागावातून रुजलेली नाही. सहकारी सोयायटचांची थकबाकी बरीच असावी असे वाटते.

विजेची सोय हमरस्त्याच्या जवळपास गाव असल्यास त्याला मिळते. एका गावाने वीज मिळावी म्हणून धडपड केली, पण वीजमंडळाकडून असहकार आहे असे दिसल्यावर लढा देऊन स्वत:च वीज निर्माण केली. याची अनोखी हकिकत पुढे दिली आहे. हमरस्त्यापासून गाव दूर असल्यास त्याला रस्ता म्हणजे पायरस्ताही असतोच असे नाही. पहाडी मुलुख त्यामुळे रस्ते तयार करणे कठीण जाते. पाठीवर ओझी घेऊन जाताना पायाखाली धडभला रस्ताही नसला तर काय अवस्था होते याचा अनुभव दोगडीचा खडा रस्ता चढताना चांगलाच आला. येथील माणसांच्या कष्टाळू वृत्तीचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. काही गावे स्वत:चा रस्ता स्वत:च करीत आहेत. यात सरकार मजुरीचा खर्च काही वेळा उचलते असे कळले, पण प्रामुख्याने गावकऱ्यांनाच स्वयंस्फूर्तीने पुढे यावे लागते. टंगसाचा रस्ता असाच तयार झाला आहे आणि अजून काम चालू आहे. गावाचा रस्ता 'तंग–सा' म्हणून गावचे नाव टंगसा पडले आहे असे गावकऱ्यांनी सांगितले. कठूड गावचे जीवन एवढे कठीण की, त्याचे नाव कठूड पडले! दोगडीचा रस्ता बनविण्याचे काम चालू होते. आम्ही गेलो तेव्हा, गावकऱ्यांनी सांगितले की, गोविंदीनदीवरचा पूल त्यांनी गेल्या वर्षी एक शिबीर घेऊन बांधला. मनात आले, की हा पूल नसताना गावाची अवस्था काय असेल? वाटेत नदी आडवी आल्याने सुकलेली गावे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी बघितली आहेत. रस्ते आहेत तेथपर्यंतच बसची सोय असणार हे उघडच आहे. दिवसातून दोन–तीन बसेस अनियमित पणे ये, जा करतात. पहाड असल्याने रस्ते वळणाचे आणि अडचणीचे आहेत. ते रुंद करणे त्यांची दुरुस्ती करणे, त्याना मजबुती आणणे ही कामे सतत करावी लागतात. या कामावर असणारे मजूर ८–१० वर्षे नोकरी करूनही कायम नोकर केले जात नाहीत ही तक्रार सर्वत्र सारखीच आढळते.

हृषीकेष – जोशीमठ मुख्य रस्ता मात्र संरक्षण सज्जतेच्या दृष्टीने बाराही महिने तंदुरुस्त व खुला ठेवण्यात येतो.

गावे डोंगराच्या उतारावर बसली आहेत. डोंगराला पायऱ्या पाडून, थोडी सपाटी तयार करून छोटी छोटी घरे बांधली आहेत. हिमालयाच्या नाजूक पर्यावरणाची काळजी घेऊन घरे बांधली आहेत. रुंदीला कमी, लांबीला जास्त अशी घरे, दोन मजले, वरती आतून लाकडी छत, बाहेरून स्लेटची कौले, दोन मजल्यांच्या मधले छत लाकडाच्या फळ्या, त्यावर मातीची जमीन, दारे, खिडक्या लहान लहान, दाराच्या कमानीवर सुंदर नक्षी, हत्ती, गणपती, कमळे कोरलेली, घराच्या पुढे लांबट चौकोनी अंगण, हे दगडांनी माचलेले असते. त्याला दीड-दोन फुटांचा चांगला रुंद कठडा केलेला असतो, याचा उपयोग खळे म्हणून केला जातो. ऊन खायला. मोकळेपणी बसून कामे करायला याचा उपयोग होतो. गावे छोटी छोटी, कुटुंबसंख्या ६०–७० च्या आसपास. गावाची रचना जातवार दिसते. सर्वांत खालच्या अंगाला, तुटक बसलेली दलितवस्ती सहज कळते. बहुधा त्यांची

पाण्याची सोय वेगळी केलेली. काही ठिकाणी एकत्रही होती. सवर्णातही ब्राह्मण, ठाकूर यांच्या वस्त्याही एकमेकांपासून फार अलग नाहीत, तरी सरमिसळ नाहीत. वरच्या वस्तीतले सांडपाणी निश्चितपणे खालच्या दलित वस्तीला त्रासदायक होत असणार. पपडियाना गावात पाण्याच्या झऱ्याला मध्ये घेऊन या दोन वस्त्या दोन अंगाला वसल्या आहेत, पण सर्व गावाची हगंदरी दलित वस्तीच्या वरच्या अंगाला आहे, हे पाहून आपल्याकडच्या परिस्थितीची आठवण झाली. गावात दलित, ठाकूर आणि ब्राह्मण अशा जाती प्रामुख्याने आढळतात. दलितांचे सध्याचे व्यवसाय सुतारी, लोहारी, शिंपीकाम हे आहेत, हे ऐकून आश्चर्य वाटले. पूर्वीची परिस्थिती काय होती हे कळू शकले नाही, पण असे व्यवसाय करणाऱ्याला अस्पृश्य ठेवणे शक्यच होत नसणार हे सरळ आहे. दास किंवा डोंब ही सर्वांत खालची जात, वाद्ये वाजविण्याचे काम करते. जातीच्या शिडीप्रमाणे आर्थिक स्थितीही बदलते. तरीही भूमिहीन शेतमजूर हा प्रकार येथे नाही. गावाची एकूण रहाणी कष्टाची असली, दारिद्र्य असले तरी आपल्या डोंगराळ मुलुखाच्या मानाने रहाणीमान बरे वाटले.

घरोघरी कालीन (गालिचा) लिहाफ (रजई), घोंगड्या, गरम कपडे होते. थंडीमुळे स्वच्छता फार ठेवता येत नसेल, पण कपडे अपुरे नव्हते. घरात भांडी-कुंडी पुरेशी होती. पितळ, तांबे, ॲल्युमिनियम, काही ठिकाणी स्टीलची भांडीही आढळली. मोरी, संडास यांच्या सोयी गावात कोठेच नाहीत. आपल्याकडे गावात शिरत-निशिरता कित्येक वेळा हगंदरीचा असह्य वास येतो तसा येथे आला नाही. पाण्याची परिस्थिती सर्वत्र बरी होती. त्याचा परिणाम म्हणून कदाचित हे असू शकेल.

## कुदरती जल

गावातल्या लोकांना तेथील 'कुदरती जल' विषयी फार आस्था आहे. जंगल डोक्यावर असले की झरे आटत नाहीत. या झऱ्यांना पाइप बसवून प्रत्येक गावात नळ बसवले आहेत.

गावाच्या आसपास गावाची शेतजमीन पायऱ्या-पायऱ्यांनी काढलेली असते. अरुंद लांब पट्ट्यांनी ही शेतजमीन तयार केलेली आहे. प्रत्येक कुटुंबाला १॥ ते २ एकर जमीन आहे. फक्त बछेरला ८–१० एकरांचे धनी आढळले. जमीन नालीवर मोजण्याची पद्धत आहे. खरीपात भात, नाचणी (मुंडुवा) सावा, वरई ही पिके आणि रब्बीला गहू, उडीद, सरसो, मका ही पिके घेतात.

बऱ्याच गावांतून माल्टा ह्या संत्र्यासारख्या फळाचे उत्पन्न बरेच दिसले. प्रत्येक घराला परसबाग असतेच. त्यात पालेभाज्या प्रामुख्याने केल्या जातात. दोन गावांत वरून येणारे पाणी पाटाने वळवून शेतीसाठी वापरलेले दिसले. तेथे तीन पिके काढली जातात. शेती जुन्या पद्धतीनेच केली जाते. शेतीतील कामे करण्यासाठी प्रत्येक घरी दोन बैल असतात. फार क्वचित बैल नाही अशी परिस्थिती. गायींची संख्या बाजवीपेक्षा जास्त आहे. त्यांचा उपयोग जास्त करून शेणखत मिळवण्याकरिता असतो, दुधाचे उत्पन्न बेताचे. म्हशींची संख्या फार कमी आहे. दूध विकणे चांगले समजत नाहीत. गावागावातून दूधडेअरी हा प्रकार नाही. त्यामुळे दूध-ताक घरोघरी वापरले जाते आणि लोकांची शरीरप्रकृती चांगली रहात असावी.

## चाऱ्याची टंचाई

कुक्कुटपालन हा जोडव्यवसाय म्हणून अजिबात करत नाहीत. भाजीपाला – शेतीचा नास कोंबड्या करतात म्हणून त्या पाळत नाहीत. शेतीचे उत्पन्न बेताचे, शेतजमीनही कमी यामुळे या उत्पन्नावर कुटुंबाचा गुजारा होऊ शकत नाही. ५० ते ७५ % गुजारा यावर होऊ शकतो. उरलेले उत्पन्न नोकरी, कामधंदा यातून भागवावे लागते. पूर्वी बकऱ्या-मेंढ्यांची संख्या मोठी असायची. दिवसें-दिवस ती कमी होते आहे. बहुधा चाऱ्याची उपलब्धता कमी हे त्याचे कारण असावे. जनावरांसाठी चारा मिळणे कठीण होत आहे. पपडियाना-सारख्या गावांना स्वतःचे जंगल नसल्याने १४ किलो-मीटर इतक्या लांब जाऊन पाठीवरच्या टोपलीत भरून, चारा आणून गुरे संभाळावी लागत आहेत. गोपेश्वरचे नागरीकरण झाल्याने झाडी बरीच तुटली आणि म्हणून पपडियानाची परिस्थिती अशी झाली असे गावकरी सांगत होते.

गावाचे आणि जंगलाचे असलेले अतूट नाते येथे प्रकर्षाने जाणवते. पूर्वी येथे घनदाट जंगले असावीत. जंगलखाते आणि त्याचे ठेकेदार रस्ते बनवणारे पी. डब्ल्यू. डी. खाते आणि रस्ता बनवणारे मजूर–गट, सीमाभागातील लष्कर, प्रचंड संख्येने येणारे यात्रेकरू यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर जंगल–तोड झाली. रस्ते बनवण्यासाठी काम लवकर व्हावे म्हणून भूस्तरशास्त्राचा विचार न करता वापरलेले सुरुंग आणि रस्त्याची खोदाई याने पहाड आतून ढिले झाले. वाढती लोकसंख्या, जनावरांची संख्या यांचा 'बोझ' या साऱ्या कारणांनी

ह्या भागाचे पर्यावरण धोक्यात आले आहे. ठिकठिकाणी भूस्खलनाच्या जखमा चिघळताना दिसत आहेत. येथील जंगले जोपर्यंत शाबूत होती, तोपर्यंत पर्यावरण ठीक होते; पण जंगल तुटून जमिनीवरचे आच्छादन गेले आणि त्याचे दुष्परिणाम सातत्याने जाणवतात. छोट्या नदीचे पाणी जंगल असलेल्या भागातून येते. ते नितळ दिसते; पण तेच मोठ्या नदीतील गढूळ पाणी बघवत नाही. किती गाळ प्रत्यही वाहून जातो आहे याची गणती बघितली की, उरात धस्स होते. गाळाचे प्रमाण अमेरिकेत १ ते ६% आहे तर या भागात ते १०० ते ४००% एवढे आहे. एकूण परिस्थितीवर याचा होणारा परिणाम महाभयंकर आहेच; पण:स्थानिक परिस्थितीवरही याचा परिणाम तितकाच गंभीर होतो आहे. जंगलांवरती येथील जनजीवन निर्भर आहे चारा, खत, जळण याकरता ते जंगलावर प्रत्यक्ष अवलंबून आहेत. जंगल आहे तोपर्यंत आमचे कुदरती–जल आहे हे त्यांना पक्के माहिती आहे आणि जंगल टिकेल तोपर्यंत आमचे अस्तित्व टिकेल हे महत्त्वाचे पर्यावरणसूत्र बऱ्याच लोकांच्या लक्षात आले आहे. जंगलातही रुंदपर्णी झाडांचे जंगल जनजीवनाशी संबंधित आहे; परंतु जंगलखात्याला नेमके हे जंगल नको आहे. त्यांना हवे आहे किमती लाकूड देणारे सूचिपर्णी वृक्षांचे जंगल. त्यामुळे जनता आणि जंगलखाते यांच्यात संघर्ष वाढला आहे. बांजचे जंगल लोकांना इतके महत्त्वाचे वाटते की, गोपेश्वर, दोगडी, बछेर या गांवातले जंगल राखण्याचे कार्य दक्षतेने केले जाते आहे. रुंदपर्णी झाडांपासून, फळे मिळतात, फुलांपासून मधमाशा मध गोळा करतात. इंधन, चारा, खताकरिता पाला सारे मिळते. शिवाय जमिनीचे रक्षण होते.


## त्रस्त पर्यावरण

जंगलविनाश आणि इतर कामासाठी झालेला मानवी हस्तक्षेप याने येथील पर्यावरण त्रस्त आहे. १९७० ची अलकनंदानदीवरील दुर्घटना याचा घाव खोल बसला आहे. आमच्या पहाणी क्षेत्रातील गावात ही आपत्ती प्रत्यक्षात आली नाही; परंतु इतर भागात कार्यकर्त्यांनी ही दुर्घटना जवळून अनुभवली असल्यामुळे ते याविषयी जागृत आहेत. १९७० मध्ये अलकनंदेच्या पाणलोटक्षेत्रात ढगफूट (Cloudburst) झाली. अगोदर त्रस्त झालेले पर्यावरण या घनघोर वर्षावाला तोंड देऊ शकले नाही. प्रचंड पूर आला. नदीचे पाणी ६० फूट उंचीइतके वाढले, १००० चौरस किलोमीटर एवढ्या भागाची धूप झाली. १० किलोमीटर डांबरी सडक वाहून गेली. ६ पूल वाहून गेले. २४ बसेस वाहून गेल्या. ३६६ घरे पडली. ५०० एकरातले उभे पीक नष्ट झाले. १ मैल लांब आणि ½ मैल रुंद, १०० मीटर खोल असे नैसर्गिक गौनातळे या गाळाने भरून सपाट मैदान बनले आहे. या गाळाने येथून ३०० किलोमीटर दूर असणारा गंगा नदीच्या कालव्याचा (१८० ते २०० फूट रुंदीचा) १० किलोमीटर लांब पट्टा ५ ते ८ फूट इतका गाळाने भरून गेला. हे सारे नुकसान या भागाने अनुभवले असल्यामुळे जंगलबचाव, वृक्षसंवर्धन या बाबतीत एक सामाजिक जागृती या भागात दिसली.

चमोली जिल्हाचे मूळचे मुख्य ठिकाण चमोली हे अलकनंदेच्या अगदी काठावर आहे. त्याला पुराचा तडाखा बसला. परत असाच प्रसंग येऊ नये म्हणून जिल्हयाचे ठिकाण हलवून पहाडात उंचावर गोपेश्वरला नेण्यात आले.

## गंधकामुळे भूस्खलन

कांडई गावात एका वेगळ्या कारणाने भूस्खलन होऊन राहिले आहे. येथील जमिनीत लोह आणि गंध-



काचे प्रमाण बरेच असल्याने हे भूस्खलन होते आहे असा सरकारी अहवाल असल्याचे लोकांनी सांगितले. १९५३ पासून हे सुरू आहे १×१/२ किलोमीटर एवढा भाग आतापर्यंत खचला आहे आणि हे वाढतच आहे. आज ना उद्या कांडई गाव उठवावे लागणार आहे. भूस्खलनात आणखी किती वाढ होणार आहे, त्याचा परिणाम किती होणार आहे याविषयी जेवढ्या गंभीर पणे विचार व्हायला हवा तसा सरकारकडून होत नाही. कार्यकर्त्यांनी येथे झाडे लावण्याचा प्रयत्न केला; पण झाडे टिकत नाहीत. टिकली तरी इतक्या लहान रोपांना हे भूस्खलन रोकता येत नाही.

पहाणी केलेल्या भागातील वर नमूद केलेल्या गावात काही घरांचे स्थलांतर करावे लागलेले दिसले, संपूर्ण गावाचेही पुढे-मागे स्थलांतर होणार असे दिसते आहे. बाकी कोणत्याही गावात अशी स्थिती दिसली नाही. आपल्याकडील काही खेड्यांतून लोक जगायला म्हणून बाहेर निघून जातात तसाही प्रकार आढळला नाही, पण नोकरी-धंद्याकरिता पुरुष बऱ्याच प्रमाणावर बाहेर जातात. उत्तरप्रदेशाच्या मैदानी भागात, दिल्लीइतकेच नाही तर मुंबईपर्यंतही जातात. वाढती लोकसंख्या हे त्याचे प्रमुख कारण असावे असे वाटते. आमच्या भागात भीमाशंकरच्या पठारावर स्थलांतराचा प्रश्न नाही, पण ठाणे जिल्ह्यात काम करीत असताना 'जगायला जाणे ' याचा अनुभव आला. जवळजवळ गावातले ६०–७० % लोक जगायला जातात. शहरगावी मोलमजुरी करून कसे तरी जगतात हे पाहून अस्वस्थ व्हायला होत असे. ठाणे जिल्ह्यातील डहाणू भागात वन-विकास महामंडळाने नैसर्गिक जंगलतोड्यांत ' जगायला जाणाऱ्यां'चे प्रमाण वाढेल अशी भीती तेथे काम करणाऱ्या कार्यकर्त्याने आमच्याजवळ बोलून दाखवली.


गावातून पुरुष बाहेर गेल्याने साहजिकपणे येथील रहिवाशात स्त्रिया आणि लहान मुले यांची संख्या जास्त आढळते. म्हाताऱ्या माणसांचे प्रमाण कमी वाटले. कामाचा मोठा बोजा स्त्रियांवर आहे. शेतीचे काम, घरचे काम, मुलाबाळांचे संगोपन, गुरांचे काम याखाली स्त्रिया दबून गेलेल्या आहेत. पाठीवरती टोपली अडकवून, एक कांबळे नेसून, कमर घट्ट आवळून बांधून अनवाणी पायांनी त्या कामाकरितारानात,शेतात जाताना सतत दिसतात. पुरुष गावात असला तरीही तो शेतात नांगर धरण्यापलीकडे फारसे काही करीत नाही. शेतीत स्त्रियांचा वाटा मोठा आहे हे जाणून सरकारी प्रचार, मोहिमेचा रोखही स्त्रियांकडे वळतो आहे असे दिसले, बछेर गावात सरकारी अधिकारी सोयाबीन लागवडीची माहिती सांगण्याकरिता महिलांच्या सभेत मुद्दाम आले होते. कार्यकर्त्यांच्या प्रभावाने गावातून महिला मंगल दले स्थापन झाली आहेत आणि जंगल–संवर्धनाच्या कामात ती जागरूकपणे काम करीत आहेत. दोगडी गावात हे दल जंगल राखण्याकरिता जात असते, बछेर गावात या दलाने जंगल राखणे आणि नवीन झाडे लावणे याबरोबरच शेतातून मोकाट गुरे चरू न देणे अशी कामेही हाती घेतली आहेत. बछेरमधील दलाच्या अध्यक्षा कलावतीदेवी प्रभावीपणे कार्य करीत आहेत. ग्रामपंचायतीच्या सरपंच (येथे सभापती) पदासाठी त्या निवडणूक लढविणार आहेत. गोपेश्वर गावात दलाच्या कार्यकर्त्या प्रभावीपणे काम करीत आहेत. गावातील बांजचे जंगल केवळ त्यांच्यामुळे टिकले आहे. झाडांना तर या स्त्रियांनी अभय दिलेच आहे, इतकेच नाही तर दगडांनाही त्यांनी रक्षण दिले आहे. येथे नदीकाठी दगड खणून काढले तर भू-स्खलन होण्याची मोठी शक्यता आहे. याकरिता या स्त्रिया दिवसातून एक वेळ आळीपाळीने या पहाऱ्याच्या कामाला जातात.

## दास्य तसेच

पण असे जरी असले तरी स्त्रियांची सामाजिक परिस्थिती बरी नाही, तिचे दास्य संपले नाही. पूर्वी बालविवाह प्रचलित होते, आता १५।१६ वर्षांनंतर लग्न होते, पण त्यात स्त्रीला कुठेही प्रतिष्ठा नसते. मुली कॉलेजला गेल्या तरीही त्यांना मोकळेपणा नसतो. विधवांचा विवाह दलित जातीतही मंजूर नाही, पती परांगदा होण्याच्या हकीकती जास्त आढळतात, पण १०।१५ वर्षे झाली तरी स्त्री तशीच वाट बघत राहिलेली आढळली. दैव खोटे हेच त्याच्यावरचे उत्तर म्हणून स्वीकारलेले आहे. स्त्रीला कामाच्या ओझ्याखाली जनावरापेक्षा जास्त राबावे लागते. सकाळी उठल्यापासून तिचे काबाडकष्ट सुरू असतात. लहानग्या लेकराला टोपलीत ठेवून ती राबत असते. सासुरवाशीण असली तर एवढे राबूनही पोटाला धडपणे मिळेल याची खात्री नाही. काही वेळा जीवन असह्य होऊन या महिला २–३ जणी एकत्र येऊन एकमेकींना एकत्र बांधून घेऊन नदीत उड्या टाकून आत्महत्या करतात, हे ऐकून धक्का

(पुढील मजकूर पान ४९ वर )

# चंद्रपूर जिल्ह्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण जमात



सुलभा ओगले

चंद्रपूर जिल्ह्यात निवास करीत असताना ज्या अनेक गोष्टी उदा. तेथील जंगले, तेथील खनिज संपत्तीचे साठे, तेथील हवा, पाणी इ. गोष्टी वैशिष्टयपूर्ण वाटतात, तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील लोकही वैशिष्टयपूर्ण वाटतात. विशेषेकरून चंद्रपूर जिल्हृयात फार मोठ्या प्रमाणावर असलेली आदिवासी जमात ! विसाव्या शतकाच्या या अवकाशयुगात माणूस चंद्र, मंगलादी ग्रहाकडे झेप घेत असतानाही उघडया नागडया अवस्थेत निबीड जंगलाच्या आणि दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयाने राहत असलेला आदिवासी पाहून डोके सुन्न होते. अजूनही हे मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेपासून विशेष दूर झालेले नाहीत. तीरकमठयाने शिकार करून कच्चे, अर्धवट शिजलेले मांस तो खातो आहे व त्याला जगाच्या उलाढालीचा काहीही पत्ता नाही. चंद्रपूर जिल्हृयातील काही विशिष्ट मार्गाने (जसे वरोरा ते चिमूर) जात असताना गावेच्या गावे एका विशिष्ट जमातीच्या लोकांनी व्यापलेली दिसतात. ती विचार करायला लावतात. त्या गावामध्ये सहज डोकावून बघितले तरी त्यांची दयनीय स्थिती, शिक्षणाचा अतिशय अभाव, कसे बसे कंठीत असलेले जीवन बघून मन बेचैन होते व त्यातूनच त्यांच्या जिवनाबद्दल कुतुहल निर्माण होते.

वरोरा ते चिमूर आणि पुढे जात असताना गावेच्या गावे माना जमातीनी व्यापलेली आढळून येतात. त्यांच्याविषयी सहज चौकशी केली तरी त्यांच्या व्यथा आणि कथा ऐकावयास येतात. या त्यांच्या व्यथापूर्ण कथा ऐकत असताना त्यांचे एक वैशिष्टच दृष्टीआड करता येत नाही तो म्हणजे त्यांचा मानीपणा किंवा हेकडपणा.

इतिहासाची पाने उलटली तर त्यांचा उज्वल इतिहास पाहून मन थक्क होत. परतु लवकरच आपले राज्य हरवून त्यांना जो वनवास स्वीकारावा लागला ते वाचून त्यांच्याविषयी करुणाही वाटू लागते.

## मानांचा इतिहास

माना ही जमात प्रामुख्याने गोंड ह्या आदिवासी जमातीत मोडण्यात येत असली तरी ती गोंडाच्याही आधीची आहे, असे आढळून येते. १८६९ साली चंद्रपूर जिल्हृयाचे मुख्य अधिकारी मेजर 'लुसी स्मिथ' व इतर संशोधक यांनी मानांविषयी जे लिहून ठेवलेले आहे त्यावरून त्यांची गोंडापासून वेगळी अशी गणना केलेली आहे. माना हे शूर लढवय्ये राज्यकर्ते होते. परंतु त्यांच्यातील ही लढाऊ वृत्ती लवकरच लोप पावून त्यांनी मानी शेतकऱ्यांचा व्यवसाय स्वीकारलेला दिसतो. मानांनी आपली शस्त्रे खुंटीला टांगून हातात नांगर धरला व भाताचे पिक कुशलतेने काढण्यात नाव मिळविले व पराभूततेमुळे अथवा हतबलतेने साऱ्यापासून वेगळी अशी वसाहत स्थापन केलेली आढळते. चंद्रपूर जिल्हृयातील गडचिरोली (आरमोरीकडील भाग), वरोरा तहसील (वरोरा चिमूर मार्ग) ब्रह्मपुरी (दक्षिण) ह्या चंद्रपूर जिल्हृयाच्या तहसीलमध्ये विशेष करून खेडे विभागात मानांची वसाहत असलेली गावेच्या गावे आहेत.

माना (Mana) हे मूळचे **नागवंशीय** लोक आहेत असे इतिहास सांगतो. (१) त्यांचे मूळ स्थान ओरिसा असून ते प्रथम बस्तरमधे व तिथून चंद्रपूर जिल्हृयात सरकलेले दिसतात. प्रथम वैरागड (गडचिरोली) येथे तेथील किल्ला हस्तगत करून मानांनी चंद्रपूर जिल्हृयात आपले पाय रोवले.

वैरागड :–हे चंद्रपूरच्या इशान्येस ८० मैलावर खोब्रागडी व सातनाला ह्या दोन नद्यांच्या संगमावर

असलेले ठिकाण असून तिथे असलेला किल्ला ह्या अतिप्राचीन असल्याचे सांगितले जाते. त्याचा संबंध थेट द्वापारयुगातील 'वैरोकोना' ह्या राजाशी लावण्यात येत असला तरी तो प्रथम 'कुरुमप्रदोह' ह्या नागवंशीय क्षत्रिय राजाने (मानाने) बांधला असल्याची कथा वाचावयास मिळते. या किल्ल्यावर प्रथम चंचुप्रवेश करण्याचा काळ इतिहासाच्या आठव्या नवव्या शतकाइतका ऐतिहासिक आहे. त्यामुळे माना हे चंद्रपूर जिल्ह्याचे बरेच पुरातन रहिवासी असल्याचे आढळून येते वैरागड येथे राज्य स्थापन केल्यानंतर ब्रह्मपुरी तहसिलीत गडबोरी व चंद्रपूर तहसीलीत राजोली येथे किल्ले बांधून मानांनी आपला राज्यविस्तार केल्याचे संशोधक सांगतात. पहिला राजा 'कुरुमप्रल्हाद' याच्या नंतर उल्लेखनीय कामगिरी सुर्जत-बडवाईक व त्यानंतर त्यांचा शेवटला राजा 'गहिलू' यांनी केली. त्यांनी अनुक्रमे सूरजगढ व माणिकगढ (मानिकगढ) हे किल्ले बांधलेले असल्याचा उल्लेख इतिहासात आहे. याच किल्ल्यावरून मानांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या उत्तर–पूर्वभागात आपला प्रभाव वाढविला होता. सुर्जत-बडवाईकने बांधलेला सुरजगढ हा किल्ला चंद्रपूरच्या अग्नेयेस अहिरी जमिनदारीत आजही भग्नावस्थेत असलेला आढळून येतो. त्यावर ठाकूरदेवाचे मंदिर आहे. शेवटचा राजा 'गहिलू' याने बांधलेला किल्ला माणिकगढ ह्या चंद्रपूरच्या दक्षिणेस चंद्रपूरपासून २० मैलावर आजही मोडकळीस आल्याच्या अवस्थेत आहे. वैरागडच्या नागवंशीय (मानांची) राजांची अधिष्ठायी देवता माणिकादेवी ही होती. बस्तर संस्थानातील नागवंशीय राजांची ही अधिष्ठायी देवता माणिकादेवी अथवा माणिकेश्वरी हीच असल्याने वैरागडला राज्य स्थापन करणारे राजे (म्हणजे आजचे माना) हेही नागवंशीय क्षत्रिय होय असे म्हणण्यास प्रत्यवाय राहत नाही.

## भाऊबंदकीमुळे स्थलांतर

केवळ भाऊबंदकीमुळे त्यांना नवीन जागेची आवश्यकता भासू लागली व त्यामुळे ते चंद्रपूर जिल्ह्यात टोळीने शिरलेले असावेत. त्यावेळेपासूनच ह्या लोकांची घनता वैनगंगा नदीच्या पश्चिमेकडच्या पट्टयात जास्त आढळून येते व आजही ती तशीच आहे हे विशेष. मानिकादेवी अथवा मानिकेश्वरी ह्या देवीच्या कृपेनेच आपली ही प्रगती वा राज्यविस्तार होऊ शकला ह्या भावनेने शेवटला राजा 'गहिलू' ह्याने बांधलेल्या किल्ल्यास मानिकागढ असे नाव दिले. त्याचेच पुढे मानिकगढ असे नाव झाले असावे. आजही मानिकगढ येथे माणिकेश्वरीची जत्रा भरते व माना मोठ्या संख्येने तेथे जातात. ह्या माणिकेश्वरीचे अथवा मानिकादेवीचे पूजक म्हणून ह्या जमातीचे नाव मानी व पुढे त्याचेच माना (Mana) असे झाले असावे. आजही माना लोकांचा 'मानि लोक' असाच उल्लेख बऱ्याच भागात होतो." हे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे.

## नागपूजकता

'गहिलू' राजाने बांधलेल्या माणिकगड ह्या किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर वरच्या बाजूस मोठे नागाचे चित्र खोदलेले आहे. तेही ह्या लोकांच्या नागवंशीयत्वाचे अथवा नागपूजकतेचे निदर्शक आहे असे म्हणण्यास हरकत नाही. माणिकगढ व किल्ला माणक्या नावाच्या गोंडराजाने बांधला अशीही आख्यायिका आहे. परंतु गोंडानी बांधलेल्या वास्तूवर असलेले **'हत्तीवर आरूढ झालेला सिंह'** हे राजचिन्ह माणिकगडच्या किल्ल्यावर अजिबात नसून त्याऐवजी वर वर्णन केल्याप्रमाणे नागाचे चिन्ह आहे. गोंडराजाच्या कुठल्याही वास्तूवर नागाचे चिन्ह नसल्याने माणिकगढ हा नागवंशीय राजानेच (मानांच्या पूर्वजाने) बांधलेला असला पाहिजे. ह्या मानांनी अथवा नागवंशीय राजांनी इ. स. च्या ९ व्या शतकापासून थेट १२ व्या शतकापर्यंत चंद्रपूर परिसरात राज्य केले. १२ व्या शतकाच्या शेवटी गोंडजमातीतील पुढारी (कोल-भिल्ल, Kol-Bheel) याने आपल्या जमात बांधवांना एकत्र केले. त्यांना लोह खनिजापासून लोह गाळण्याचे व त्याची शस्त्रे बनविण्याचे शिक्षण दिले व माना राजावर चढाई केली. माना राजांनी गोंडाच्या हल्ल्याला बऱ्याच काळपर्यंत तोंड दिले तरी शेवटी त्यांना गोंडांसमोर शरणागती पत्करावी लागली. त्यानंतर गोंडसत्ता सतत प्रबळ राहिल्याने व मानांच्या लघुसंख्येने मानांना राजसिंहासन हस्तगत करता आले नाही. मूळचे हे परदेशीय असल्याने त्यांची संख्या कमी होती, म्हणूनच ते राजे असताना सुद्धा अधून-मधून दक्षिणेकडील मोठ्या सत्तेचे त्यांना मांडलिकत्व स्विकारावे लागत असे. १२ व्या शतकाच्या प्रारंभी गोंडांनी चंद्रपूरचे राज्य हस्तगत केले तरी १५ व्या शतकापर्यंत मानांचे एकंदरील प्राबल्य बरेच

असल्याचे दिसून येते. १३८६ साली अशाच एका माना प्रमुखाने भद्रावती (चंद्रपूरच्या वायव्येस १६ मैल) येथील भद्रनाथाच्या मंदिराचे भद्रनागाच्या मंदिरात रूपांतर केले याच देवळात सापडलेल्या अशुद्ध संस्कृतात लिहिलेल्या शिलालेखात म्हटले आहे की १३ व्या शतकात गोंडांतर्फे झालेल्या मानांच्या पराभवानंतर त्यांनी गोंडांच्या अधिपत्यात राहण्याऐवजी शेती करण्याकडे आपला मोर्चा वळविलेला दिसतो. धानाची शेती करण्यात त्यांनी तेव्हापासूनच नाव कमावलेले आहे. शेती हा व्यवसाय स्विकारूनही त्यांच्यातील शिपाईगिरी वा शौर्य ते कित्येक दिवस विसरलेले नव्हते हे विशेष.

१९१६ साली त्यावेळच्या भारत सरकारचे एक उच्च अधिकारी आर. व्ही. रसेल यांच्या "Tribes and Castes of Central Provines Vol. VI" मध्ये त्यांनी त्यावेळच्या मानांचे जे वर्णन करून ठेवलेले आहे ते मानांचा लढावू बाणा वर्णन करणारेच आहे. ते म्हणतात, मानांच्या पतनानंतरही त्यांनी लढावू वृत्ती जोपासली होती. काटोल व सातपुडयाच्या आसमंतातील अनेक शहरात त्यावेळच्या लुटारू पेंढाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी मानांच्या पलटणीची नियुक्ती केली जाई.

एकंदरीत उपरोक्त ऐतिहासिक माहितीवरून माना हे गोंडांच्याही आधीचे चंद्रपूर जिल्हयाचे रहिवासी असावेत. प्रथम त्यांनी राज्य केले असले तरी लौकरच त्यांचा पराभव झाल्याने खेडयात अथवा जिल्हयाच्या अंतर्भागात वस्ती करून राहिले व मागासलेले आयुष्य कंठू लागले.

**मानांचा चंद्रपूर जिल्ह्यातील अस्तीत्वाबद्दलचा इतिहास हा त्यावेळी असलेल्या तज्ज्ञ लोकांनी लिहून ठेवलेला आहे.**

चंद्रपूरचे श्री. अ. ज. राजूरकर यांनीही 'चंद्रपूरचा इतिहास' नावाचे जे पुस्तक लिहिलेले आहे (शारदा प्रकाशन, प्रथमावृत्ती ७ ऑक्टोबर १९५६) त्यातही मानांविषयी लिहिलेले आहे. परंतु ते बहुतेक ल्युसी स्मिथ व रसेल यांच्या लिखाणावरूनच घेतलेले दिसते.

आजच्या मानाला मात्र आपल्या इतिहासाची विशेष माहिती दिसत नाही. ●

# जंगल वाचवा

(चाल—उठाव आवाज एकीचा)

थांबवा जंगलतोडीला
आदिवासी जंगलचा राजा
फळेमुळे तो खाणारा
कष्टकरी यो वनाचा
थांबवा जंगलतोडीला...॥ १ ॥

तोडुन तोडुनी जंगल आमुचे
खुर्च्या बनल्या धन्याच्या
दलाल बनला पोटभऱ्या
लागला जंगलतोडीला
थांबवा जंगलतोडीला...॥ २ ॥

सरकार आली पार्टी आल्या
आमची मते घ्यायला
गावचा सावकार पुढारी झाला
कायदे बनवून फसवायला
थांबवा जंगलतोडीला...॥ ३ ॥

जंगल झाले उजाड रान
लाकूड नाही घर बांधण्या
फळे नाही आम्हाला खायला
लाकूड नाही जाळायला
थांबवा जंगलतोडीला...॥ ४ ॥

जंगल झाले उजाड रान
डोंगर लागला कोसळायला
पाणी गेले वाहून फार
उपाशी मेलो आम्ही ठार !
थांबवा जंगलतोडीला...॥ ५ ॥

जंगल वाचवा शेत बाचवा
याच्यासाठी केले पाहिजे काय
एकी करुनी लढा लढू या
संघर्ष याचा एकच उपाय
थांबवा जंगलतोडीला...॥ ६ ॥

**किशोर वसंतराव देशपांडे**
वन–निकेतन प्रकल्प' मुरवाड.

# ॥ डोक्शा मागुन येणारी : कविता ॥

अंगळ । मंगळ । टंगळवाली पोरं
जसी बसल्यात इराण्याच्या हॉटेलात
लता-मुकेशच्या दर्दी आवाजात आत्मशोधाचे नवे-नवे प्रयोग करीत
तसा मी बसलो होतो. जवळच्या शहरात सुरू झालेल्या काव्य सम्मेलनात
माझ्या समकालीन कवींच्या कवितांचा
आशा आणि निराशेच्या मधल्या अंतरावर खून झाला आहे.
कडूसं पडताना सम्मेलन संपल्याबरोबर गावाकडं येताना
वाटेत खूपच रात्र झाली म्हणूनशान
सामंताच्या आंबराई जवळील
साऱ्या शिवारात फेमस असलेल्या
चेटकिनीच्या ओढ्यात शांतपणे झोपलो
मधेच जाग आली
चंद्राचा आभाळात कुठेच नामोनिशाना दिसत नव्हता
उठून ओढ्याबाहेर येऊन गावच्या दिसेने पाहिलं
गावही दिसत नव्हतं
बत्या विझल्या होत्या
कि विझवल्या होत्या ?
चालत-चालत गावाजवळ आलो
तांबडं फुटलं होतं
टिकाव । फावडं । कुदळ । घमेली । विळा हाती घऊन
कोमेजलेल्या चेहऱ्यांचा तांडा आला तसाच माझ्या मागे गेला
मेंढरांचा कळप जावा तसा माझ्यापासून तटस्थता दाखवीत
उगवतीच्या दिशेने.
गावात एकही जीवप्राणी भटकताना दिसला नाही.
मग मात्र तसाच पुढे येऊन बसलो आहे नदीच्या किनाऱ्यावर.
तेव्हापासून—
डोक्यात स्वत:बद्दलचे चांगले-वाईट विचार येतायत्
येका बाजूला नदीचा डोह दिसत आहे / आणि दुसऱ्या बाजूला
मी ज्यांच्यावर मनस्वी प्रेम करतो
अशी हिरवी-हिरवी शेतं.
शहरातल्या अंगळ । मंगळ । टंगळवाल्या पोरांच्यागत
मोठ्या आजीब कैचीत सापडलो आहे या वेळी मी.

**भारत सातपुते**

# काठेवाडी गवळ्यांमुळे निर्माण झालेल्या समस्या



**मनोहर राजर्षी**

काठेवाडी गवळ्यांच्या आगमनामुळे विदर्भ-अमरावती भागात काही प्रश्न निर्माण झाले. कायदा आणि सुव्यवस्था, भ्रष्टाचार, स्थानिक जनतेचा विकास आणि ऱ्हास अशा अनेक बाबींशी हे प्रश्न निगडित आहेत. या सर्वांचा विचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ७८–७९ साली एक उच्चस्तरीय समिती नेमली होती. तेव्हाचे अमरावती भागाचे वनसंरक्षक आणि आताचे वनविकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री. मा. य. सोवनी यांनी या समितीला एक अहवाल सादर केला होता. (वनविकास, १९७९, पृ. १६–२६). हा लेख म्हणजे प्रामुख्याने या अहवालाचे संकलन आहे.

### काठेवाडी गवळी आणि त्यांची पशुसंपत्ती

काठेवाडी गवळी जमात मूळची काठेवाडातली. ही जमात अत्यंत काटक, कष्टाळू आणि उद्योगप्रिय आहे. टोळ्यांत विभागलेले असूनही त्यांचे संघटन आणि एकजूट वाखाणण्याजोगी आहे. त्यांचा परंपरागत व्यवसाय गायी पाळून दुधाची विक्री करण्याचा आहे. गायींबरोबर ते शेळ्या, मेंढ्या आणि उंटही पाळतात. त्यांची जनावरे उत्तम दर्जाची आहेत. गीर जातीच्या गायी ते पाळतात. या गायी भारतातल्या दुभत्या जनावरातली एक उत्कृष्ट जात समजली जाते. गोठ्यात जनावरे बांधणे त्यांना माहीत नाही. त्यांचे पुढारी सांगतात की, आमची जनावरे खुल्या माळरानात चरली तरच जास्त दूध देतात. शिवाय सुदृढ आणि दीर्घायुषी होतात.

### वऱ्हाडात आगमन आणि नंतरचे स्थित्यंतर

पंधरा–सोळा वर्षांपूर्वी, दुष्काळामुळे असेल किंवा काठेवाडातील चराईक्षेत्र जनावरांच्या वाढत्या संख्येला अपुरे पडत असेल, त्यांनी काठेवाड सोडले आणि ते बुऱ्हाणपूर (मध्यप्रदेश) येथे गेले. तिथून ते विदर्भ-अमरावती भागात आले. तेव्हा त्यांच्याकडे तुरळक जनावरे होती. शहरी भागाजवळची चांगली चांगली चराईक्षेत्रे त्यांनी काबीज केली. सुरुवातीस दुचाक्यांवर कासंड्या बांधून ते शहरभागात रतीब घालीत. गावाबाहेरच्या पडजमिनीत किंवा खाजगी जमिनीत त्यांनी आपल्या हेट्या (तळ) उभारल्या.

आज एकेका कुटुंबाकडे शंभर-दोनशे गायी सहज आहेत. काही मोठे हेटीवाले तर हजार-बाराशे गायी बाळगून आहेत. एका गायीची किंमत दोन हजारांच्या पुढे आहे. शिवाय गीर गाय वर्षात सरासरी १६७५ किलो दूध देते. यावरून त्यांच्या संपत्तीची कल्पना येईल. हे स्थित्यंतर कशामुळे झाले ?

### वनखात्याचे कर्मचारी आणि काठेवाडी

महाराष्ट्र शासनाने, चराई क्षेत्रे कोणाला द्यावयाचे याचे सर्वसाधारण अग्रक्रम ठरवून दिले आहेत. तरीही वनखात्याकडून काठेवाड्यांना रोखण्यात कुचराई झाली. सुरुवातीला याचे स्वरूप दुर्लक्षिले असले तरी नंतर त्याचे रूपांतर हातमिळवणीत झाले. इतके की, आदिवासी आणि जुने ग्रामनिवासी यांना वाटते की, वनखात्याच्या संमतीनेच ते वनखात्याच्या जमिनीवर गुरे चारतात. मुळात स्थानिक जनावरांना पुरेल इतकेसुद्धा गवत उपलब्ध नाही. त्याचा परिणाम शेतकऱ्यांनी निकृष्ट पण संख्येने जास्त गुरे पाळण्यात झाला होता. अनिर्बंध चराईचे दुष्परिणाम – जमिनीचा दर्जा खालावणे, जमिनीची धूप वाढणे, वनराईचा ऱ्हास होणे इत्यादी ज्ञात आहेतच.

वडाळी रमणा नावाचा एक रमणा अमरावतीस आहे. ज्या क्षेत्रातून केवळ गवत कापूनच नेता येते,

अशापैकी एक. चांगल्या प्रतीचे गवत वाढवणे आणि त्याची सतत जोपासना करणे यासाठी असे रमणे राखून ठेवण्यात येतात. यात गुरे चारण्यास पूर्ण मनाई आहे. वडाळी रमण्यास कुंपणाचाच खर्च दीड लाख आला होता. हे कुंपण तर चोरीला गेलेच; शिवाय सर्रास चराई चालूच राहिली. याशिवाय काही जमिनीवर चरणाऱ्या गुरांच्या संख्येवर निर्बंध आहेत. त्यातला उद्देश स्पष्ट आहे. असे असूनही काठेवाड्यांची अनिर्बंध चराई या जमिनीवरही चालूच राहिली. प्रत्येक जनावरापोटी रक्कम दिली जाते असे म्हणतात.

खात्याच्या कर्मचाऱ्यांची उघडउघड हातमिळवणी, काही ठिकाणी बंदोबस्तात येणाऱ्या अडचणी, वनखात्याच्या कर्मचाऱ्यांवर क्वचित् पडणारा कामाचा ताण आणि गोपालनातले काठेवाड्यांचे उपजत कौशल्य या सर्वांमुळे हे शक्य झाले. उदा. विस्तीर्ण माळरानावर जनावरे कुठे चरत आहेत, ते कळत नाही; पण इतस्ततः विखुरलेली जनावरे, गुराख्याने विशिष्ट आवाज काढताच क्षणार्धात हद्दीबाहेर पळून जातात !

या सर्वांबरोबर अजून एक घटक महत्त्वाचा आहे तो म्हणजे—

## दुग्धोत्पादक सहकारी संघ आणि काठेवाडी

याच सुमारास महाराष्ट्र शासनाचा दुग्धोत्पादक योजनांचा धडाक्याचा कार्यक्रम सुरू होता. या योजनांचा खरा हेतू असा की, कास्तकारास एखादा पूरक व्यवसाय मिळावा आणि त्यांच्याकडे दोनतीन चांगली दुभती जनावरे यावीत. या योजनांची काही वैशिष्ट्ये मुद्दाम उल्लेखिली आहेत. एक म्हणजे या योजनेखाली मिळणारी कर्जे व्यक्तिशः मिळत नाहीत तर ती दुग्धोत्पादक संघांना शासकीय हमीवर दिली जातात. दुसरे म्हणजे ही कर्जे सुलभ हप्त्यांची आणि सवलतीच्या व्याजाची असतात. दुग्धोत्पादनात वाढ हा या योजनेचा स्वाभाविक हेतू होता. ते उद्दिष्ट नव्हते, परंतु याकडेही दुर्लक्ष होऊन वऱ्हाडात या कर्जाचा सर्वात जास्त फायदा काठेवाड्यांनी उठविला. काठेवाडी हे स्थानिक नव्हेत, शिवाय ते कास्तकारही नाहीत. या योजनेतले सभासद गावचे रहिवासी असावेत या नियमाकडेही कानाडोळा झाला.

दुग्धोत्पादक सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना आपल्या संस्थेतर्फे मोठ्या प्रमाणावर दूध पुरविले जाते असे सांगण्यात येते, हा या प्रकारातला एक भाग; पण खरी मेख अशी आहे की, काठेवाडी गवळी आणि हे संघ संपूर्णतः परस्परावलंबी आहेत. काठेवाडी नसेल तर या योजनांना इतका दूधपुरवठा होणार नाही. उलट या योजना नसल्या तर काठेवाड्यांना गिऱ्हाईक मिळणारच नाही. त्यासाठी लागणारी यंत्रणा, मनुष्यबळ त्यांच्याकडे नाही. दोन प्रकारचा भ्रष्टाचार या योजनांत शिरला आहे. दोन रुपये कागदोपत्री दाखवून उत्पादकास दीड-पावणेदोन रुपयेच (७८–७९ चे आकडे) देण्यात येतात. दुसरे म्हणजे वजनदार पदाधिकाऱ्यांकडे एक दुभते जनावर नसले तरी त्यांच्या नावावर ५०–१०० लिटर दूध जमा केले जाते !

या दोन वर्गाचे हितसंबंध किती गुंतले आहेत, याचा श्री. सोवनींनी एक पुरावाच जणू काही दाखल केला आहे. ७४ ते ७८ पर्यंतच्या काळात हिवरखेड, नरनाला या आकोटच्या उत्तर भागात वस्ती करून असलेल्या काठेवाड्यांच्याकडून अकोट दुग्धोत्पादक सहकारी संस्थेस दूध मिळत होते. जून ७८ च्या सुमारास जिल्हाधिकाऱ्यांनी या गवळ्यांना तडीपार केले. कारण त्यांच्या मुजोर आणि बेबंद वागण्याचा तसेच जनावरांचा तालुक्यातील जनतेस, कास्तकारांस त्रास होतो अशा वाढत्या तक्रारी येत होत्या. त्यामुळे हा कळप मेळघाटाच्या पश्चिम भागात गेला. (त्यांनी अर्थातच वनखात्याची परवानगी घेतली नाही.) अकोटच्या संघाने मात्र त्यांचे दूध संकलित करणे चालूच ठेवले. याच सुमारास अमरावती-यवतमाळ भागात अवैध चराईबद्दल कडक कारवाई सुरू झाली. त्यामुळे ३५००–४००० गायींचा एक मोठा तांडा घेऊन काठेवाडी मेळघाटात येऊन स्थिरावले. याबद्दल अमरावती संघाच्या कार्यकर्त्यांनी 'आमचे दूध तुटले !' आणि ते अकोटला मिळाले अशी कुरबूर केली, तर अकोटच्या पदाधिकाऱ्यांनी त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री छेदीलालजी गुप्ता यांना एक विनंतीअर्ज केला ! त्यात म्हटले होते की, भटक्या जमाती स्थायिक करण्याचे, त्यांचा विकास करण्याचे पुरोगामी शासनाचे धोरणच आहे ! त्यानुसार या काठेवाड्यांना हाकलून वगैरे लावल्यास अन्याय होईल आणि आमची संस्था डबघाईस येईल !

## निर्माण झालेल्या समस्या

काठेवाड्यांमुळे निर्माण झालेल्या समस्या याप्रमाणे विविध प्रकारच्या आहेत. काही ठिकाणी तर कायदा आणि सुव्यवस्था यांचे प्रश्न उद्भवले आहेत. असंघटित



स्थानिक कास्तकार संघटित आणि पैशाच्या बळाने काहीशा मुजोर बनलेल्या काठेवाड्यांपुढे कमी पडतात. भर पिकात जनावरे घुसवणे, दंडेली करणे यापासून खून-माऱ्यामाऱ्यांपर्यंत प्रकरणे गेली आहेत.

दुसरी समस्या म्हणजे स्थानिक जनतेत असंतोष वाढत जाणे अपरिहार्य आहे. त्यात बाहेरचा-परका आणि स्थानिक असा वाद आहेच; पण खरे म्हणजे स्थानिक जनतेला आपल्या विकासाला वाव नाही, असे वाटणे स्वाभाविक आहे.

तिसरी समस्या परिसराच्या ऱ्हासाची आणि अवमूलनाची आहे. परिसराचे संवर्धन स्थानिक जनतेच्या विकासाचेच एक महत्त्वाचे अंग आहे, त्या दृष्टीने हा प्रश्न काही वेगळा नाही.

काठेवाड्यांच्या अनिर्बंध चराईमुळे जमिनीचा आणि गवताचा नाश जवळ येत आहे. काठेवाडी अल्प किंमतीत शासकीय वनक्षेत्रात, जमिनीत गायी चारतात आणि स्वतःचा आर्थिक विकास घडवून आणतात, हे गैर आहे यात शंका नाही. मेळघाट भागात महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी व्याघ्रप्रकल्पही चालू आहे. त्यासाठी चिखलदरा पठारावर गेले शे-दोनशे वर्षे रहात आलेले गवळी तेथून हलवून अगदी पश्चिमेस (वान-धुलघाट भागात) हलवण्याची शासनाची योजना आहे. या गवळ्यांची जागा काठेवाडी घेण्याची दाट शक्यता आहे— परिणामी चिखलदऱ्याचे गवळी आणि व्याघ्रप्रकल्प या दोघांच्या तंट्यात काठेवाडी मात्र वाढतील.

## श्री. सोवनींनी सुचविलेल्या उपाययोजना

१. काठेवाड्यांचे हळूहळू पण संपूर्ण उच्चाटन केले पाहिजे. २. अल्पभूधारक विकासयंत्रणेमार्फत लहान कास्तकारांना गायी ठेवण्यास प्रवृत्त केले पाहिजे. यामुळे हळूहळू दुधाचा पर्यायी पुरवठा उपलब्ध होईल. यास अर्थात वेळ लागेल. ३. सर्वसाधारण कास्तकार आणि धंदेवाईक गवळी यांच्यात चराईक्षेत्रावर गाई चारण्याच्या शुल्काच्या दृष्टीने फरक केला पाहिजे. काठेवाड्यांच्या गायी वर्षास सुमारे १६७५लिटर दूध देतात हे लक्षात घेऊन, त्यांचे उत्पन्न ध्यानात घेऊन त्यांना चराई-शुल्क निर्धारित केले पाहिजे. ४. चराई-शुल्क ही शासनाच्या जमेची बाब नव्हे; पण किमान शुल्क ठेवल्याने सामान्यतः भाकड जनावरे कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून सर्वांनाच किमान शुल्क ठेवावे. ५. राखीव कुरणे ही राखीव राहण्यासाठी योग्य तो बंदोबस्त निग्रहाने आणि कटाक्षाने केला गेला पाहिजे. यामुळे परिसराचे रक्षण होऊन काठेवाड्यांसही आळा बसेल. ६. यापुढे कोणत्याही काठेवाड्यास महाराष्ट्रात येण्यास प्रतिबंध करावा. तसेच त्यांना शेतजमिनी घेण्यास, दुग्धोत्पादक संघांचे सभासद होण्यास बंदी घालावी. त्यांचे दुध दुसऱ्याच्या नावावर सरकारी योजनांस मिळणार नाही अशी खबरदारी घेण्यात यावी. ७. मेळघाट आणि तत्सम महत्त्वाच्या वनक्षेत्रांत त्यांचा प्रवेशही होऊ देऊ नये.

## उपसंहार

श्री. सोवनींच्या काही उपाययोजना या चर्चेच्या पलीकडच्या आहेत. उदाहरणार्थ कायदा-सुव्यवस्था यांचे प्रश्न योग्य त्या रीतीनेच हाताळले गेले पाहिजेत. परिसराच्या संरक्षण-संवर्धनाच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घ्यायला हवी, अन्यथा या गवळ्यांबरोबर सर्व समाजाचेही हित धोक्यात येईल; पण त्यांनी सुचविलेल्यांपैकी काही उपाययोजना उपलब्ध प्रशासनयंत्रणेत आणि समाजव्यवस्थेत शक्य आणि दीर्घकालीनदृष्ट्या पाहिल्यास इष्ट होतील काय ?

सरकारी योजनांचे रीतसर सभासदत्व काठेवाड्यांस देऊन पदाधिकारी आणि गवळी यांच्या हितसंबंधांच्या पायावरच घाला पडणार नाही काय ? काठेवाडी गवळी

(पुढील मजकूर पान ४४ पहा)

# रोजगार हमी योजनेतील : एक अनुभव



वि. नी. भावे

प्रत्येकाला काम मिळावे हा घटनेत नमूद केलेला नागरिकांचा अधिकार मान्य करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असून यामुळे महाराष्ट्रांतील अनेक गरीब लोकांना स्वाभिमानाने सरकारकडे काम मागता येणार आहे. या काम मागण्यात किंवा मजुरी रूपाने पैसे मागण्यात कोणतीही लाचारी नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्या अर्धबेकार लोकांना ही योजना सहाय्यक होऊ शकेल.

वरसई (तालुका – पेण) या गावाच्या उत्तरेकडे सुमारे ३ किलो मीटर लांबीचा रस्ता रोजगार हमी योजनेत मंजूर करून घेतला. वरसईच्या उत्तर दिशेस ७ ते ८ गावांना वाहतुकी योग्य असा एकही रस्ता नाही व शेतीचे काम सोडल्यास इतर वेळात लोकांना काहीही काम नसते. त्यामुळे लोकांना मजूरीही मिळेल. व रस्त्याचेहि काम होईल. अशा विचाराने रोजगार हमी योजनेखाली हे काम घेण्याचे ठरले. हे काम रोजगार हमीत घेण्याचे आणखी एक कारण म्हणजे अर्थसंकल्पीय समितीची मंजूरी व राजकीय प्रभाव इत्यादी गोष्टींपासून रोजगार हमीचे काम अलीप्त राहाते. रोजगार हमीत एकदा मंजूरी मिळाल्यानंतर प्रशासकीय मंजूरी, तांत्रिक मंजुरी, आर्थिक वर्षापुरती मंजुरी इत्यादी गोष्टी रोजगार हमीच्या कामाआड येत नाहीत. मजुरांना सवड असेल त्याप्रमाणे काम करता येते. आम्ही सुचवलेला रस्ता १९६१-८१ च्या आराखड्यात नसल्यामुळे त्याला लगेच मंजुरी मिळाली नाही. नियोजन खात्याचा ठराव आणि तालुका समन्वय समितीची मंजुरी मिळाली नाही. नियोजन खात्याचा ठराव आणि तालुका समन्वय समितीची मंजुरी अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी कामाला दीड वर्षापेक्षा अधिक काळ लागला. दि. ३१-१-८० ते २६-२-८० एकूण २५ दिवस रस्त्याच्या भरावाचे काम केले.

(१) पहिल्या ३ किलो मीटर रस्त्याच्या भराव व पाईपकरिता ३२५९२ रुपये रक्कम मंजूर झाली होती. ही रक्कम फक्त भरावाकरताच आहे. असा मजुरांचा समज झाला. २५ दिवसांच्या कामामध्ये ४००० रुपये खर्च झाले. ३२५९२ रुपयांपैकी फक्त ४००० रुपये खर्च झाले. तेव्हा बाकीची रक्कम काय झाली असा संशय मजुरांच्या मनात आला. घनमिटर मापाप्रमाणे मजुरी मिळणार आहे ही गोष्ट त्यांना पटकन पटली नाही. सर्वच्या सर्व रक्कम भरावावर खर्च झाली पाहिजे. असा त्यांचा समज होता. मापाप्रमाणे मजूरी मिळते असे त्यांना वारंवार पटवून द्यावे लागले.

(२) समुहाने काम करण्याची कल्पना मजुरांना नीट पटत नाही. आठवड्याच्या कामाची रुपयात किंमत काढून त्याला मनुष्य बळाने (Man days) भागून प्रत्येक मजुराची दैनिक मजुरी काढली जाते ही पद्धत शास्त्रशुद्ध आहे. परंतु समुहाने काम केले समुहाची आठवड्याची मजुरी एकाच माणसाच्या हातात द्या. आम्ही ती आपआपसात वाटून घेऊ असा मजुरांचा आग्रह दिसतो. ही मागणी अर्थातच मान्य होण्यासारखी नाही.

(३) तसेच मजुरांच्या समुहामध्ये जातीय भावना प्रखर दिसते. वरील कामात मराठे, कातकरी, कोयना विस्थापीत, नवबौद्ध या चारही प्रकारच्या लोकांची संख्या अल्प असली तरी वेगवेगळ्या गटागटानेच काम केले. उदा. दोन मराठे व दोन कोयना विस्थापित एका गटात काम न करता स्वतंत्रच काम करतात.

वाशिवली मोहीली इनाम रस्त्याच्या कामाला उपजिल्हाधिकारी – रोजगार हमी योजना यांनी ११-३-८० रोजी भेट दिली. त्यांच्या अहवालात त्यांनी मजुरी कमी पडल्याची कारणे दिली आहेत. १३-२-८० ते १९-२-८०, २०-२-८० ते २६-२-८० या दोन आठव-

ड्यात दैनिक मजूरी अंदाजे १ रु. ५० पैसे एवढीच पडली आहे. रस्त्याची २० फुट रुंदी साफ करताना मधे उगवलेली झाडे झुडपे तोडणे व ती रचून ठेवणे. तसेच रस्त्यावर पडलेले दगड (लूज मटेरीयल) उचलून कडेला रचून ठेवले. या दोन्ही गोष्टींची मजुरी मिळालेली नाही. असे या अधिकाऱ्यांनी स्पष्ट नमूद केले असून झाडे झुडपे तोडणे व दगड रचणे यांची स्वतंत्र मजुरी देण्यात यावी असे लिहिले आहे. सर्वच रस्त्यांच्या कामात घन मिटर खोदाईमधून जे दगड निघाले ते भरावात न गाडता किंवा आस्ताव्यस्त न टाकता रस्त्याच्या कडेला व्यवस्थित रचून ठेवले आहेत. भरावाच्या कामाकरिता खोदाई आणि भराव करणे या कामापेक्षा खोदकामातून निघालेले दगड व्यवस्थित रचून ठेवणे हे वेगळ्या प्रकारचे काम आहे. त्यामुळे त्या दगड रचण्याचीही मजुरी देण्यात यावी अशी आम्ही मागणी केलेली आहे.

याबाबत सबंधित ओव्हरसिअरने मजुरांना कोणतीही जादा रक्कम देता येणार नाही. असे उप जिल्हाधिकारी रो. ह. यो. यांना कळविले. त्यानंतर उपजिल्हाधिकारी रो. ह. यो. यांनी उप-अभियंता पेण, कुलाबा जिल्हा परिषद यांना मजुरी कमी पडण्याची कारणे शोधण्यास सांगितले. उप-अभियंता (पेण) यांनी कामावरील एका मजुराचा आमची कोणतीही तक्रार नाही! असा जबाब नेला (मजूरी कमी पडण्याची कारणे न शोधताच) दि. ३०।९।८० च्या पत्राप्रमाणे झाडेझुडपे तोडणे व दगड रचणे यांची जादा मजुरी देता येत नाही असे कळविले. यानंतर उप जिल्हाधिकारी रो. ह. यो. यांनी १५।१०।८० रोजी कार्यकारी अभियंता कुलाबा जिल्हा परिषद अलिबाग यांची नेमणूक मजुरी कमी पडण्याची कारणे शोधण्याकरीता केली. कार्यकारी अभियंता यांनी स्वतः कामाला भेट न देताच हा विषय उप अभियंता पेण यांचेकडे ३०।३।८१ रोजी सोपविला.

गटविकास अधिकारी पेण यांनी २९ जून ८१ हा दिवस भेटीसाठी कळविला याच दिवशी तालुका समन्वय समितीची मिटींग असते. त्यामुळे प्रत्यक्ष कामाला भेट देता येणार नाही. हे बी. डी. ओ. पेण यांना २९।६।८१ याच दिवशी लक्षात आले. बी. डी. ओ. पेण यांनी कामाला भेट देता येत नाही असा निरोप माणसाबरोबर देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी काहीही कळविले नाही. त्यामुळे मजूर लोक बी. डी. ओ. पेण यांची वाट पहात राहीले होते. त्यामुळे त्या लोकांचा एक दिवस फुकट गेला. २४।१०।८१ रोजी शेतीच्या कामांचा हंगाम आहे. त्यामुळे तूर्त कामास भेट देऊ नये असे बी. डी. ओ. पेण यांना कळविले (मजुरांतर्फे)

**निष्कर्ष** — हमी योजनेमधे एखादा वाद उत्पन्न झाल्यास तो किती दीर्घकाळ रेंगाळत राहातो याचे हे एक चांगले उदाहरण आहे. उप जिल्हाधिकारी रो. ह. यो. यांचे ११।३।८०च्या अहवालाची पूर्तता २० महिने उलटून गेले तरी अद्याप झालेली नाही. हमी योजनेची अंमलबजावणी करणारी खाती (जि. प) अशा वादा विषयी निर्णय घेण्यास उत्सुक नसतात. मजुरांना पुन्हा (Repayment) पगार करण्याचा व्याप त्याना नको असतो. त्यामुळे संबंधित अधिकारी स्वतःचे मत न देता समाधानाचा जबाब घेऊन प्रकरणच मिटविण्याच्या मागे असतात.

रोजगार हमी योजनेचे जिल्ह्यातील सर्वाधिकार जिल्हाधिकारी यांना असतात. उपजिल्हाधिकारी यांच्या अहवालाची पूर्तता करण्यास जिल्हा परिषदेचे अधिकारी टाळाटाळ करीत आहेत. यावर जिल्हाधिकाऱ्यांकडे काहीच उपाय नाही काय ? याविषयी ठराविक मुदतीत जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून अवहाल मागविण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असावा.

वाशिवली मोहिली इनाम, (ता. पेण) याच रस्त्यावर केलल्या कामातील अनुभव पुढीलप्रमाणे :

(१) सातव्या दिवशी ओव्हरसिअर मापे घेण्यास येत नाही त्यामुळे पेमेंटला उशीर होतो.

(२) आठवड्याच्या कामाचे घन मीटर मधील माप व त्याची पैशातील किंमत याची चिठ्ठी प्रत्येक गटाला देणे आवश्यक आहे तशी दिली जात नाही.

(३) प्रत्येक आठवड्यात प्रत्येक गटाने किती ब्रास खडी तयार केली ते मजूर लक्षात ठेवतात. प्रत्यक्ष मोजमापाच्या वेळी ब्रास कमी असल्यास त्याची कल्पना मजुरांना दिली जात नाही. त्यामुळे मजुरांच्या अपेक्षे इतकी मजुरी त्यांना मिळत नाही या करता प्रत्येक आठवड्याला मजुरांना त्यांच्या कामाची चिठ्ठी मिळणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष** — वशिवली, मोहीली इनाम परिसरातील ७ ते ८ गावांना आज किंवा उद्या बारमाही रस्ता होईल; त्यावरून एस टी. धावेल; लोकांना रोजगारही मिळेल व रस्त्याच्या निर्मितीमध्ये गावकऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असेल. अशी आशा रोजगार हमीने निर्माण केली आहे. हेच या योजनेचे यश आहे.

पुस्तक परीक्षण

सुभाष लेले

कर्नाटकातील एक गाव सिरसी. त्याच्या आजूबाजूला सात मोठे जलविद्युत प्रकल्प करण्याची योजना आहे. दि टोटगर्स को-ऑपरेटिव्ह सेल सोसायटीने शास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ञ, तंत्रज्ञ यांचा एक मेळावा जानेवारी १९८१ मध्ये भरवला व त्यात या जलविद्युत प्रकल्पांचा त्यांच्यावर काय परिणाम होईल यावर चर्चा केली. या चर्चेत वाचल्या गेलेल्या निबंधांपैकी काही महत्वाचे निबंध गांधी पिस फाऊंडेशन, दिल्ली व दि टोटगर्स को-ऑपरेटिव्ह सेल सोसायटीने यांनी मिळून ' Major Dams : A Second Look ' या नावाने प्रकाशित केले आहेत.

पुस्तिकेत एकूण १७ निबंध व श्री. के. सी. रेड्डी, (मेंबर सेक्रेटरी, बेड्टी समिती) यांना सादर केलेले निवेदन आहे. निबंधाचे चार प्रमुख भागात विभाजन केले आहे. प्रथम जल-विद्युत याबद्दलचे निबंध आहेत. दुसऱ्या भागात पर्यायी उर्जेवरील निबंध, तिसऱ्यात पर्यावरणावरील परिणाम व चवथ्या भागात श्री. रेड्डी यांना सादर केलेले निवेदन व इतर दोन निबंध आहेत.

पहिला निबंध श्री. शर्मा यांचा आहे. कर्नाटकातील उर्जेची वाढती गरज लक्षात घेऊन एकूण १२ जलविद्युत प्रकल्पांची योजना केली आहे. त्यातील ७ प्रकल्प हे उत्तर कन्नडा या जिल्ह्यात आहेत. या सात प्रकल्पांबद्दलची माहिती श्री. शर्मा यांनी दिली आहे. या सात धरणापासून सुमारे २२०० मेगॅवॉट एवढी विद्युतशक्ती मिळावी अशी अपेक्षा आहे. काळी, बेड्टी, अघनाशिनी, शरावती इ. नद्यावर धरणे बांधण्याचा कार्यक्रम यात आहे. (सुपा येथे होणाऱ्या धरणाची जागा चुकीची आहे असे लेखकाचे म्हणणे आहे. धरणाचा खर्च प्रचंड आहे. त्यामानाने लाभ कमी होतील.)

यानंतरच्या निबंधात डॉ. गाडगीळ धरणांचे जंगलावर व इतर गोष्टींवर होणार परिणाम विशद करतात. पश्चिम घाटातील (सह्याद्री) भरपूर पाऊस व कोकणाकडील उतार लक्षात घेता, जलविद्युत प्रकल्पांना ही उत्तम जागा आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र, गुजराथ, कर्नाटक, तामिळनाडू व केरळ यांची बरीचशी वनसंपत्ती पश्चिम घाटातच आहे. जलविद्युत प्रकल्प व शेती पाणी पुरवठा योजनांमुळे येथे प्रचंड प्रमाणात वृक्षतोड झालेली आहे. ही वृक्षतोड फक्त पाण्याखाली जाणाऱ्या जमिनींवरचीच झाली नसून, पाणलोट क्षेत्रातील ( Catchment area ) झाडांचीही तोड या निमित्ताने झाली आहे. याचा पर्यावरणावर परिणाम होणे अटळच आहे. याचा मुख्य परिणाम हा इथे राहणाऱ्या शेतकरी व आदिवासींवर झाला आहे.

काली विद्युतप्रकल्पातील लोकांचे पुनर्वसन रामनगर येथे होणार आहे. हे खरे तर राखीव जंगल. १९७५ मध्ये पुनर्वसनासाठी त्याचा ताबा घेण्यात आला. यावेळी संपूर्ण जंगल तोडले गेले. त्यानंतर जमिनीची धूप होऊ नये म्हणून कुठलेही उपाय योजले गेले नाहीत. पावसामुळे चांगली माती वाहून गेली व आता ती जागा वाळवंटासमान बनली आहे. तेथे जाऊन रहावयास कोणीही तयार होत नाही. हे जंगल न कापता तसेच ठेवले असते तर कदाचित लोकांना रेशमी किडे पाळणे इ. उद्योग करता आले असते. हे आर्थिकदृष्ट्या तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने अधिक योग्य झाले असते.

चुकीच्या योजनेने भुर्दंड कसा बसू शकतो, याचे उदाहरण देताना डॉ. गाडगीळ म्हणतात— लिंगणामक्की येथील धरण हे गेल्या २० वर्षांत फक्त ३ वेळा पूर्ण भरले गेले. कारण पाणी किती जमा होईल याचे अंदाजच चुकले. कमी उंचीचे धरण केले असते तर हजारो एकर जंगल वाचू शकले असते, जे सध्या कापले गेले आहे.

या सर्व जंगलतोडीमुळे जंगल उत्पादनांचा तुडवडा जाणवतो. मातीच्या धुपीमुळे जमीन तर खराब होतेच पण धरणात गाळ साठून धरणाचे आयुष्य कमी होते व पर्यायाने लाभ कमी होतात. याबरोबरच निसर्ग-संतुलन व विविध उपयोगी जंगली झाडे नष्ट होतात. पुढील काळातील विकासाचे कार्यक्रम कसे असावेत यावर भाष्य करताना डॉ. गाडगीळ म्हणतात— उत्तर कन्नडातील नैसर्गिक संपत्ती वापरुन तळागाळातील माणसांचे जीवनमान कसे उंचावता येईल हा खरा प्रश्न आहे. कुद्रेमुख येथील लोखंडाच्या उद्योगाला

उर्जा कशी द्यावयाची, याबरोबरच उत्तर कन्नडातील लोकांच्या सरपणाची सोय कशी करता येईल ? कागद उद्योगाकरिता बांबू वापरून झाल्यावर स्थानिक लोक की जे बांबूवर जगतात त्यांचे काय ? याचाही विचार होणे आवश्यक आहे.

बेड्टी प्रकल्यापासून होणारी वीज ही मुख्यत: शहरी भागात वापरली जाणार आहे. या ठिकाणी सुमारे १०,००० लोकांना ७ वर्षे काम मिळणार आहे. परंतु सुमारे १२००० लोक शेती धरणात बुडाल्याने बेकार होणार आहेत त्याचे काय ? त्याचप्रमाणे फायद्या–तोटयाचे गणित कदाचित फायदा किती हे सांगेल परंतु फायदा कोणाला व कोणाच्या बलिदानामुळे हे मात्र ते सांगू शकणार नाही.

फायद्या – तोटयाचे गणित करताना अर्थातच सर्व खर्च ध्यानात धरले पाहिजेत. तसे केलेले दिसत नाहीत. उदा. वीजवहनाचा खर्चच ध्यानात धरलेला नाही ! धरणाखाली जाणाऱ्या जंगल संपत्तीच्या तोटयाच्या बाजूचा विचारच नाही ! त्याचप्रमाणे पाण्याखाली जाणाऱ्या शेतीच्या उत्पन्नाचे काय ? वसाहती व इतर कारणासाठी झाडी तोडल्याने होणाऱ्या जमिनीच्या धुपीचा विचार योग्य तऱ्हेने केलाच नाही ! जर योग्य तऱ्हेने फायद्या–तोटयाचे गणित केले तर दिसते काय ? फायदा तीन रुपये तर त्याकरिता खर्च दहा रुपये ! या धरणामुळे जो फायदा होणार तो सगळा शहरांना व सगळा तोटा सहन करावयाचा खेड्यांनी ? का ? हा खरा प्रश्न आहे.

यानंतरच्या दोन निबंधात पुनर्वसनाचे प्रश्न व त्याबाबतचा कायदा याबद्दल माहिती दिली आहे.

समजा धरणे बांधणे हे तोटयाचे होत आहे, तर उर्जासमस्या सोडवायची कशी? श्री. दामोदरन त्यांच्या निबंधात सांगतात– भारतात सर्वात जास्त उर्जेची उधळपट्टी होते. ती वाचवा, तुमचा उर्जेचा प्रश्न सौम्य होऊ शकेल ! भारतात एकूण क्षमतेच्या फक्त ४८ टक्के उत्पादन केले जाते तर जपान, दक्षिण कोरिया, फिलिपाइन्स येथे ६० ते ७० टक्के ! अनेक उद्योगधंदे गरज नसताना जास्त ताकदीच्या मोटर्स वापरतात, उत्पादनाच्या पद्धती चांगल्या नसतात. अशा पद्धतीने जादा वीज वापरून कमी कामे केली जातात.

## छोटे प्रकल्प

मोठया जलविद्युत प्रकल्पांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. निसर्ग संतुलनाचा विचार करता ते परवडणारे नाहीत. चीनने १९७८ अखेरपर्यंत सुमारे ८७,००० छोटे जलविद्युत् प्रकल्प बसविले आहेत. चीनच्या एकूण गरजच्या ३० टक्के गरज याने भागविली जाते. याकरिता फक्त १० मीटर उंचीचा धबधबा लागतो. याचे प्रयोग भारतातही सुरू आहेत ते अधिक प्रमाणावर होणे आवश्यक आहे.

श्री. सुब्रम्हण्यम त्यांच्या लेखात जलविद्युत प्रकल्पाला असलेले इतर पर्याय विशद करतात. बायोगॅस प्रकल्प, छोटे जलविद्युत प्रकल्प याबद्दल यात चर्चा केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धरणांच्या जागी जंगले वाढविली तर अधिक उर्जा मिळू शकेल. परंतु जंगलापासून माणसाला वापरता येणाऱ्या पद्धतीची उर्जा कशी मिळवायची हे स्पष्ट होत नाही, त्याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल हे बघणे आवश्यक वाटते. याचप्रकारची चर्चा श्री. शामसुंदर त्यांच्या निबंधात करतात. एकूणच जंगलापासून किती विविध प्रकारचे फायदे होऊ शकतात हे त्यांनी मांडले आहे.

यापुढील श्री. अडकोली, श्री. राव यांच्या लेखात जंगल व त्यापासून होणारे विविध फायदे यावर चर्चा आहे. सूर्यप्रकाशापासून मिळणारी उर्जा साठवण्यासाठी झाडे ही आदर्श माध्यम होऊ शकतील असे त्यांचे म्हणणे आहे. धरणांमुळे जे पाणी साठते त्यामुळे होणारे विविध रोग, पावसाचे प्रमाण व जंगले यावरील लेखात विशेष असे काही मांडलेले नाही. श्री. भट यांच्या लेखात निसर्ग-संतुलन व पर्यावरणयांचा माणसावर परिणाम काय झाला आहे याचे विवेचन आहे. बेड्टीच्या आजूबाजूला जे जंगल व प्राणीजीवन आहे त्याचे वर्णन श्री. कारंथ यांच्या लेखात आहे. श्री. हेगडे यांचा लेख धरणांचा गवतावर व पर्यायाने दुग्धउद्योगावर होणारा परिणाम विशद करतो.

ही पुस्तिका वाचून झाल्यावरही काही प्रश्न अनुत्तरितच राहतात. उदा. छोटे जलविद्युत प्रकल्प उभारा असे म्हणताना त्याचेही फायद्या–तोटयाचे गणित केले पाहिजे. देशात असे किती प्रकल्प होणे शक्य आहे ? एकूण उर्जेच्या किती टक्के गरज यामुळे भागेल ? जंगलांपासून ऊर्जा मिळवा असे म्हणताना ती कशी वापरता येईल ? त्यामुळे धूर इ. मुळे प्रदूषण होईल का ? इत्यादि बाबींवरही पुस्तिकेत विवेचन असते तर योग्य झाले असते.

अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांवर विचार करायला लावणारी ही पुस्तिका आहे. राष्ट्राचा आर्थिक विकास झालाच पाहिजे यात काहीच शंका नाही. पण त्याकरिता किती किंमत मोजावयाची, फायदा कोणाचा व किंमत मोजणारे कोण, हा खरा प्रश्न आहे. धरणे हा एक भाग यात येतो. इतर गोष्टींवरदेखील विचार होणे आवश्यक आहे, असे वाटत राहते.

पुनर्वसनाच्या प्रश्नावर श्री. हेगडे व इतर म्हणतात– उत्तर कन्नडातील मालनाड प्रांतात उत्तम तऱ्हेच्या फळबागा आहेत. एकएक बाग तयार करण्याकरिता १०–१२ वर्षे भरपूर पैसा व श्रम ओतावे लागतात. त्यामुळे धरणाच्या पाण्याखाली या बागा बुडविण्या-ऐवजी पर्यायी उर्जेसंबंधी विचार करावा.

( 'Major Dams....' Environmental Cell Gandhi Peace Foundation, 223 Upadhyaya Marg, New Delhi-2. Rs. 12-50 )

●

---

(पान ३९ वरून)

शेतजमिनी घेत असल्यास त्यांना घेऊ द्याव्यात; पण ते शेतीच करतील असेही बघावे, म्हणजे त्यांचा दुग्धोत्पा-दनावरचा भर कमी होईल. काठेवाड्यांच्या उपजत कौशल्याचा आणि त्यांच्या सकस पशुसंपत्तीचा वापर परिसराचा ऱ्हास टाळून, सर्वच समाजाच्या अधिक कल्याणाकडे होईल, अशी काही उपाययोजना करता येईल का ?

काठेवाड्यांना नव्याने येण्यास प्रतिबंध कसा करणार? यासंबंधीची शासकीय यंत्रणा कमी पडेल काय ? मुळात काठेवाडी काठेवाडात रहाणे कठीण झाले म्हणूनच ते सर्वत्र विखरले. काठेवाड्यांमधूनच काही समजूतदार माणसांना, आत्ता जे चाललेय ते चालू राहिले तर त्यांना इथूनही तिसरीकडे जावे लागेल आणि एक वेळ अशी येईल की, जायला जागाच उरणार नाही, हे पटवून देता येईल काय ?

●

# तुझे नांव काय ?

समाज कार्य करणाऱ्या तुझे नांव काय ?
तुझे नांव काय, तुझे काम काय ?
जन जागृती–जन जागृती–जन जागृती ।। ध्रु ।।
गरीब लोकांचे हाल पाहुनी
त्यांच्या पोटाची आग जानुनी
भुकेकंगाल जन सुखासाठी
आम्ही त्याग करनार हाय.
त्याग करनेवाले तुझे परमान काय ?
तुझे परमान काय, तुझे अरमान काय ?
समाजक्रांती – समाजक्रांती – समाजक्रांती ।।१।।
दीन–दलितांचा होउनी कैवारी
सत्यासाठी जाओनी सामोरी
भांडवलशाहीची मोडुनी चाकोरी
जनहिताचे रक्षण करणार हाय.
जनहित करनेवाले, तुझे करम काय ?
तुझे करम काय, तुझे इमान काय ?
जनक्रांती – जनक्रांती – जनक्रांती ।। २ ।।
अर्ध उपासी जनतेत जाउनी
हक्कांची त्यांना जाणीव देवुनी
स्वकर्तव्याचे पालन करूनी
अन्यायाची चीड धरोनी
दारिद्र्याची आन घेउनी
अत्याचाराची लाज धरोनी
जनपद्धतीची एकी करुनी
ह्या स्वार्थी सरकारसी लढा देण्यास्तव
संघटना करनार हाय–
संघटना करनेवाले तुझा संदेश काय ?
तुझा संदेश काय, नी तुझा उद्देश काय ?
क्रांती – क्रांती – क्रांती – ।।३।।

**आनंदा गंगाराम बनकर**

(पान ५ वरून)

लिपीच्या अभावी या आदिवासींकडून साहित्य-निर्मिती होऊ शकली नाही. कवितांची पुस्तके नसली, तरी प्रत्येक रेडइंडियन हा जन्मतःच कवि असतो व प्रत्यक्षात जीवनाचा प्रत्येक क्षण काव्यासारखा जगतो. आज अमेरिकेत शिक्षण घेतलेले रेडइंडियनही खूप आहेत. त्यापैकी जॉन लिफिगर व जेम्स वेल्थ हे कवि म्हणून प्रसिध्द आहेत.

हातांच्या खुणा हे रेडइंडियनांचे खास वैशिष्टय आहे. युध्द, शांति, भूक लागली, पाणी हवे या भावना खुणांच्या व्दारे रेडइंडियन एकमेकांना सांगतात.

रेडइंडियनांच्या धार्मिक कल्पना फारच मजेदार. आकाशाला ते आपला पिता व जमीनीला माता मानतात. समुद्राला निरनिराळे प्राणी भेट देण्याची प्रथा आहे. प्रार्थनेसाठी जी जमीन वापरतात ती पवित्र मानतात. ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला असला तरी अनेक मूळच्या गोष्टींची सरमिसळ झाली आहे. पियोटे ही एक प्रकारची निवडुंग वनस्पती गांजासारखी वापरतात. त्यांच्या वापरामुळे अनेक भास होतात. हे पियोट ओढण्याचा एक मोठा विधी असतो. टिपी नावाच्या तंबूत रात्रभर हा समारंभ चालतो. त्यावेळी भरपूर खाणे, गाणी व प्रार्थना चालू असते. सर्व जगाच्या निर्मितीमागे एक शक्ती आहे असे त्यांना वाटते. मिशनरी प्रवृत्तीचा अभाव आदिवासींच्या धर्मात आढळतो. स्वप्न व दृष्टांत यावर खूपच भर आढळतो.

## रूढ कल्पना

रोग का होतात या विषयी रेडइंडियनांच्या निश्चित कल्पना आहे आपल्याकडील समाजातील रूढ कल्पनांशी त्याचे खूपच साम्य आहे.

निरनिराळया जमातींची नावेही मोठी मजेदार आहेत. झूरी, अपाचे पिबलो इ. जमाती आहेत. जमातीच्या नावाचा विशिष्ठ अर्थ असतो. ओपी म्हणजे शांत लोक, पकागो म्हणजे वाळवंटातील लोक, पिमाज म्हणजे नदीचे लोक व मोहाओ म्हणजे पाण्याच्या बाजूचे लोक.

त्यांच्या भाषेवर स्पॅनिश व इंग्रजी भाषेचा प्रभाव आहे. परंतु आज अमेरिकन इंग्लीशमध्ये वापरली जाणारी कित्येक नावे मूळची रेडइंडियनांची. न्यूयॉर्क या जगप्रसिद्ध शहराचे नाव 'मोठे सफरचंद' या अर्थाच्या रेडइंडियन शब्दावरून पडले.

थट्टेने रेडइंडियन माणसास अपाचे रेडस्किन, हिमाचिफ असे म्हणतात. त्यांना चिडविण्यासाठी तोंडावर हात ठेवून होळीत आपल्याकडे जशी बोंब मारतात तसा ध्वनिही केला जातो, परंतु शहाण्या माणसाने अमेरिकेत गेल्यावर हे करणे टाळले पाहिजे कारण रेडइंडियन्नांना या गोष्टीचा मनस्वी राग येतो.

## ट्रेल ऑफ ट्रीअर्स

शत्रूची डोक्याची कातडी सोलून नेणे या प्रकाराला स्कालपिंग-असे नाव आहे, हा प्रकार करणारे रेडइंडियन अमेरिकनांनी क्रूर ठरविले परंतु त्यांच्या मूळ जमिनीवरून त्यांना हुसकून लावून जेव्हा मिसीसिपीपलिकडे कायद्याने ढकलण्यात आले व लाखो रेडइंडियनांची वाताहत केली, त्यातील क्रौर्य अमेरिकन विसरले. परंतु रेडइंडियन मात्र तो इतिहास विसरू शकत नाहीत. हजारो मैल पायी चालत ओकलाहामा इथे आलेल्या या प्रसंगाला 'ट्रेल ऑफ ट्रीअर्स' म्हणूनच ओळखतात.

स्वभावतःच डावखोऱ्या असणाऱ्या या रेडइंडियनामध्ये आत्महत्येचे प्रमाणही अमेरिकेत आज जास्त आढळते. आज जुन्या अर्थाने गुलामी अमेरिकेत नाही. रेडइंडियनांना अमेरिकेचे स्वतंत्र नागरिकत्व मानले गेले आहे. त्यांना मतदानाचा हक्क आहे. १९४८ साली ॲरिझोना व न्यू मेक्सिको या राज्यात सर्वात शेवटी हा हक्क बहाल करण्यात आला. अमेरिकेत कोठेही वास्तव्य करण्याची, परवानगी असली तरी बहुसंख्य रेडइंडियन अजूनही रिझर्व्हेशनमध्येच रहातात. शिक्षणाचे प्रमाणही, सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. १९६९ मध्ये नवाजोमध्ये रेडइंडियनांसाठी पहिले कॉलेज काढण्यात आले.

अमेरिकन सरकार रेडइंडियनांच्या सुधारणेसाठी काही खास प्रयत्न करते. ज्या खात्यामार्फत ते काम चालते त्याला 'ब्युरो ऑफि रेडइंडियन अफेअर्स' असे नाव आहे. केंद्रशासन व रेडइंडियन यामधील हा दुवा असतो. रिझर्व्हेशनमध्ये फक्त केन्द्राचे व जमातीचे कायदे चालतात. ५५ निरनिराळ्या जमातींना दारूबंदीचा कायदा लागू नाही. उरलेल्यांना लागू आहे.

आज प्रत्यक्षात रेडइंडियन तरुण दारुडे दिसतात. दारूमुळे येणारे लठ्ठपणा, लिव्हरची दुखणी, व डायबेटीस हे प्रमुख आजार. शिकार करणे व मासेमारीसाठी रेडइंडियनांना विशेष परवाने दिले जातात. त्यांनी शेती न करण्याबद्दल सरकार त्यांना पैसे देते. सरकारी

(पान ४७ वर पहा)

# हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !

महाराष्ट्र शासनाचा संपूर्ण कार्यक्रम समस्त गरीब जनतेच्या सर्वांगीण कल्याणासाठीच आखण्यात आला आहे. विकासाचा जास्तीत जास्त वाटा गरिबांना मिळवा हा त्यामागचा हेतू आहे.

हे उद्दिष्ट साधण्यासाठीच लहान शेतकऱ्यांची व्याख्या नुकतीच बदलण्यात आली आणि ६ हेक्टरापर्यंत (१५ एकर) कोरडवाहू जमीन बाळगणाऱ्या किंवा ज्यांच्या एकूण शेतसारा २५ रूपया पर्यन्त आहे अशा शेतकऱ्यांचा समावेश लहान शेतकरी ह्या सदरात करण्यात आला. बहुसंख्य शेतकरी आता ह्या सदरात मोडतील व लहान शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ आणि सवलती त्यांना प्राप्त होतील.

ज्यांचे कोणी नाही अशांना मदतीचा हात देणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना, तसेच बेकार तरूणांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सहाय्य करणारी संजय गांधी स्वावलंबन रोजना ही शासनाच्या उपक्रमाची इतर महत्त्वपूर्ण अंगे आहेत. भूमिहीन मजुरांसाठी सहकारी तत्त्वावर फलोद्यान वसाहती स्थापन करणे हा असाच आणखी एक उपक्रम.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांचे मोल दिले अशा थोर हुतात्म्यांची स्मृति चिरंतर राहण्यासाठी राज्यात २०४ ठिकाणी उभारण्यात यावयाच्या स्मारकांच्या भूमिपूजनाचा शुभारंभ मुंबईत ९ ऑगस्ट रोजी करण्यात आला. त्याबरोबरच हुतात्म्यांच्या निकटच्या नातेवाइकांना आर्थिक मदत देण्याची योजनाही अंमलात आली. संपूर्ण देशात एकमेवाद्वितीय असलेल्या ह्या योजनेतून ज्यांचा समाजास आजवर विसर पडला अशा व उपेक्षित आणि गरजू लोकांबाबतची शासनाची बांधिलकी स्पष्टपणे प्रत्ययास येते.

पंतप्रधानांच्या वीस कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी येथे राज्याच्या पंचवार्षिक योजनेबरोबर जोमदार-करण्यात येत आहे. ह्या दोन्हीमध्ये बरेच साधर्म्य आहे. ह्या जोमदार अंमलबजावणीमुळे अधिष्ठित असा समाज निर्माण करण्याचे अंतिम उद्दिष्ट गाठण्यासाठी राज्यात अव्याहत सुरू असलेल्या निर्धारपूर्वक महान प्रयत्नांचे यथार्थ दर्शन घडून येते.

ज्यांचा प्रखर त्याग व थोर बलिदान ह्यामुळे आपण आज स्वातंत्र्याची फळे चाखीत आहोत अशा समस्त गरीब जनतेबाबतचे आपले कर्तव्य निर्धाराने व सर्व शक्तीनिशी पार पाडण्याची आजच्या पवित्र दिनी आपण सर्वजण पुन्हा एकवार प्रतिज्ञा करू या आणि कृतनिश्चयाने म्हणू या !

# हे राज्य ठरावे नंदनवन गरिबांचे !

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय !**

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०००३२

नोकऱ्यात त्यांच्यासाठी राखीव जागा असतात. व त्या प्राधान्याने भरल्या जातात.

२५ हजार रेडइंडियनांनी दुसऱ्या जागतिक महायुध्दात अमेरिकेच्या, बाजूने भाग घेतला होता. इतर नागरिकांप्रमाणे अमेरिकन रेडिइंडियनही सरकारला कर देतो. आपले प्रतिनिधी अमेरिकन सिनेटमध्ये निवडून देण्याची मुभा रेडइंडियनांना आहे.

जमातीचे स्थानिक शासन कौन्सिल मार्फत चालविले जाते. त्याचे अध्यक्ष लोकनियुक्त असतात. या अध्यक्षपदासाठी जमातप्रमुख व धार्मिकदृष्टया श्रेष्ठ मानले गेलेले लोक यांच्यात संघर्ष होतो. प्रत्यक्षात आज ही सर्व यंत्रणा भ्रष्टाचाराने पोखरली गेली आहे. 'ब्यूरो ऑफ रेडइंडियन अफेअर्स 'मधील निम्मे कर्मचारी रेडइंडियन व निम्मे गोरे. अधिकाऱ्यात लष्करातून निवृत्त झालेल्यांचा भरणा अधिक.

## बेकार भत्ता

रेडइंडिनांमधील ६० टक्के लोक आज बेकार आहेत. दर आठवड्याला ३० डॉलर्सपेक्षा जास्त मिळकत नाही. अमेरिकेत बेकारभत्ता असल्याने अनेक मंडळी काम करण्यापेक्षा आळशीपणाने बेकारभत्ता घेणे पसंत करतात.

मुळात संस्कृती भिन्न असू शकतात, पण उच्च व नीच नसतात. तसा समज झाला तर दोन संस्कृतीतले नाते पालक व पाल्याचे बनते. आज अमेरिकेन रेडइंडियनांमधील अनेकांना हे नाते मान्य नाही. माणसाच्या शब्दांवर विश्वास हे आदिवासी संस्कृतीचे वैशिष्ठ्य. परंतु रेडइंडियनांचा विश्वासभंग युरोपियन अमेरिकनांनी इतक्या वेळा केला की आता रेडइंडियनांचा अमेरिकनांवर विश्वास उरला नाही. एकाचवेळी जेव्हा अमेरिकन सरकार सांस्कृतिक अभिसरणाचा प्रयोग करते, त्यावेळी रेडइंडियन युवक जहाल, स्वतंत्र फुटीरतेची चळवळ करतो. सरकारी दडपशाही जेवढी जास्त, तेवढी बंडखोरीही जास्त. आपल्याला न्याय मिळणार नाही, अशी कल्पना झाली की त्यातून हिंसाचाराचा उदय होतो. औद्योगिक-करणाच्या झपाट्यात हा मानववंशच अस्तंगत होण्याचा धोका होता. पण तो टळला. आणि जीव वाचलेले आदिम संस्कृतीचे हे वारसदार आता सुखासीन बनले असे चित्र दिसते. स्वतःची नेमकी अस्मिता न सापडल्यामुळे रेडइंडियन तरूणवर्ग गोंधळला आहे. पौरूषत्व म्हणजे गुंडगिरी व दारुडेपणा असे चुकीचे समीकरण मांडले जात आहे. आपआपसातील भांडणे, मारामाऱ्या व समाजातील दुही याने रेडइंडियन समाज पोखरून निघाला आहे. याला कंटाळून काही स्त्री पुरूष रिझर्वेशन सोडून शहरी भागातील 'घेट्टो' म्हणजे आपल्या कडील झोपडपट्टी सदृश वस्तीत रहावयास जातात.

वॉशिंग्टन, ओरेगॉन, याहो या राज्यातील रेडइंडियन इतर ठिकाणांपेक्षा अधिक प्रमाणात स्वार्थी बनले आहेत. भेटीच्या मोबदल्यात ते अधिक किंमतीच्या वस्तुची अपेक्षा करतात. प्रतीष्ठेच्या मध्यमवर्गीय कल्पना हळूहळू पण निश्चितपणे या समाजात प्रवेश करू लागल्या आहेत.

## राजकीय चळवळ

रेडइंडियनांची जहाल राजकीय चळचळ 'अमेरिकन रेड इंडियन मुव्हेमेंट ' या नावाने ऊभी राहिली आहे. रसेल मौन्स हे त्यांचे पुढारी. १९७३ मध्ये ' दुखावलेला गुडघा ' या ठिकाणी उठाव झाला. पिनरिच रिझर्व्हेशन एक महिना पूर्णपणे बंडखोरांच्या ताब्यात होते. राजकीय चळवळीस पाठिंबा व अमेरिकन चित्रपट उद्योगाची रेडइंडियनांकडे बघण्याची विकृत दृष्टी; याच्या निषेधार्थ जगप्रसिद्ध अमेरिकन नट, मार्लन ब्रॅंडो याने अॅकेडमी अॅवॉर्ड घेण्याचे नाकारले.

१९७२-७३ मध्ये अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन (बी. सी.), येथे रेडइंडियनांच्या मागण्यासाठी निदर्शने झाली. २० कलमी मागण्यांचा मसुदा अध्यक्षांना सादर केला गेला. याआधी मिनेसोटा राज्यातील सेंटपॉल गावी; २२ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर ७२ पर्यंत सर्व रेडइंडियनांची एक परिषद बोलाविली होती. या अधिवेशनाला १०० निरनिराळया जमातीचे रेडइंडियन्स उपस्थित होते. हिंसाचार व सरकारी मालमत्तेची हानी यावर अधिवेशनात खूप खडाजंगी झाली.

मवाळांनी असे ठरविले की १९६८ च्या कराराबाबत कायदेशीर भांडण करावे. रेडइंडियनांच्या हक्काचे संरक्षण करण्यास मायनॉरिटी कमिशन नेमले जाते. त्यापुढे आपल्या अडचणींची मांडणी करावी व कायदेशिररित्या झगडावे. जहालांनी रेड इंडियन मुव्हमेंट अधिक बळकट करण्याची आवश्यकता सांगून सरकारी दडपशाहीचा निषेध केला.

## संस्थापरिचय

हिमालयातील गढवाल – कुमाऊँच्या पहाडी भागात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांमध्ये 'पर्वतीय नवजीवन मंडळ' सिल्यारा व 'दशोळी ग्राम–स्वराज्य मंडळ' गोपेश्वर या संस्थांना अतिशय महत्वपूर्ण स्थान आहे.

१९६२ च्या चीनी आक्रमणानंतर चीनशी खरी लढाई प्रादेशिक नसून वैचारिक आहे या जाणीवेने व स्व. जयप्रकाश नारायण, सरलादेवी यांच्या प्रेरणेने जे सर्वोदयी कार्यकर्ते उत्तराखंडात पाय रोवून उभे राहिले त्यामधून या संस्थांचा जन्म व विकास झाला.

## 'पर्वतीय नवजीवन मंडळ'

सिलयारा या नितांत रमणीय जागी चीड या वनात नवजीवन आश्रम आहे. श्री. सुंदरलाल व विमलाजी बहुगुणा, त्यांची कुटुंबीय मंडळी व साथीदार कार्यकर्ते संस्थेची धुरा वहातात.

खादी प्रसार, बुनियादी तालीम, नशा–बंदी आंदोलन आदि महत्वपूर्ण कार्यक्रम हाती घेतल्यानंतर नवजीवन मंडळातर्फे प्रामुख्याने वन–संबंधी प्रश्नावर जोर देण्यात आला. वनठेकेदारांच्या शोषणात व मजुराची गठण सुटका व्हावी म्हणून वनश्रमिक सहकारी संथांस्चे वननिगमाच्या स्थापनेनंतरहि जाणवलेल्या वन–धोरणातील उणीवा व त्या लक्षात घेऊन पर्यावरणा संबंधी मुलभूत भूमिका मांडणाऱ्या 'चिपको' आंदोलनात सहभाग असे मंडळाच्या प्रवासाचे थोडक्यात वर्णन करता येईल. श्री. सुंदरलालजी बहुगुणा झुंजार पत्रकार व प्रभावी वक्ते आहेत. 'चिपको,' आंदोलनाचा संदेश देशभर पसरविण्यास त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

'पर्वतीय नवजीवन मंडळातर्फे' सध्या सिल्यारा येथे एक आश्रम शाळाहि चालविण्यात येते.

सर्वस्वी प्रताप शिखर, विजय जडधारी व कुँवर प्रसून हे मंडळाचे कार्यकर्ते 'युवक संघा'चेहि काम बघतात.

**(नवजीवन आश्रम डा. सिल्यारा, व्हाया घनसाली, जि. टेहरी गढवाल, उ. प्र. २४९ १५५)**

— ० —

## दशोली ग्राम-स्वराज्य मंडळ

मंडळातर्फे सर्वप्रथम स्थानिक, लोकांना रोजगार पुरविण्यासाठी मजूर-सहकारी समित्यांची स्थापना करण्यात आली. या कामात उल्लेखनीय प्रगति केल्यावर मंडळाने वनौषधिच्या व्यापारात लक्ष घातले व दलालांकडून होणाऱ्या वारेमाप नफाखोरीस यशस्वी पायबंद घातला. नंतर वनसंपत्तीवर आधारित कुटिरोद्योग सुरू करण्याची योजना आखून चीड वृक्षाच्या राखेपासून टर्पेंटाइन बनविणाऱ्या व शेतीची अवजारे बनविण्याच्या छोटया प्रकल्पांची उभारणी केली.

१९७० मध्ये अलकनंदेने उडविलेला हाहाःकार व १९७३ मध्ये स्थानिक लोकांना शेती-अवजारांसाठी अंगु-वृक्ष पुरविण्याबाबत सरकारने केलेला अन्याय यातून 'चिपको' आंदोलनाचा जन्म झाला. आंदोलकांनी लाखो झाडे तोडीपासून वाचवली आहेतच. त्याचबरोबर पाणलोट क्षेत्रातील संवेदनाशील भागात लोकांच्या गरजेची लाखो झाडेहि लावली आहेत. डालियोंका दगडया (वृक्ष मित्र)व 'महिला मंडळ' दलांद्वारे तरुण व महिलांचा जोरदार सहभाग मिळविला आहे.

सिल्यारा व गोपेश्वर दोन्ही केंद्रे 'चिपको' आंदोलनाशी संबंधित असली तरी दोन्हीकडच्या विचारधारेत, कार्यपद्धतीत महत्त्वाचे फरक आहेत. पहिले मुख्यतः एका झंझावाती व्यक्तिमत्वाच्या नेतृत्वाखाली पूऱ्या भारत खंडाच्या मागण्या पुढे रेटते आहे, तर दुसरे सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या सामूहिक नेतृत्वाला पेलतील अशा मागण्या घेऊन आस्ते पण शाश्वत वाटचाल करीत आहे. एकाची बैठक जास्त तात्त्विक-भावनिक आहे, तर दुसऱ्याची भावनेला प्रखर वास्तवाची जोड देणारी ! 'चिपको' आंदोलनाच्या वाटचालीत दोन्ही विचारधारांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे व भागीरथी-अलकनंदेप्रमाणे संगम झाल्यास पर्यावरणाचा संदेश आणखी प्रभावी व ताकदवान होईल.

**(दशोली ग्राम-स्वराज्य मंडळ, गोपेश्वर, जि. चमोली. उत्तर प्रदेश २४६ ४०१)**

(पान क्र. ३२ वरून)

बसला. आपल्याकडेही सासुरवाशिणी आत्महत्या करतात, पण एकत्र येऊन सामूहिक आत्महत्या करावीशी वाटणे ही घटना गंभीर आहे! अशा या स्त्रियांत जागृती अशी फारशी दिसत नाही. मुख्य म्हणजे ही जागृती अजून समाजातच दिसत नाही. अशी हि होळी !

आम्ही पहाणी केलेल्या ९ गावांपैकी ५ गावांत 'चिपको' आंदोलनाची माहिती होती. त्यात प्रत्यक्ष भाग घेतलेले कार्यकर्तेही भेटले. पपडियाना गावातले मुरारीलाल, टंगसामधील तिवारीजी, दोगडीमधले आनन्दसिंग विष्टजी हे सारे दशौली ग्रामस्वराज्य संस्थेचे कार्यकर्ते आहेत. तिघेही आपआपल्या गावांत काम करीत आहेत. या गावांतून वन-संवर्धनाचे काम सुरू आहे. टंगसा गावात ग्रामस्थांनी होळीच्या दिवशी वृक्षारोपणाचा कार्यक्रम केला. त्यात आम्हीही सामील होऊ शकलो. दिवाळीही त्यांनी अशी साजरी केली असे त्यांनी सांगितले. टंगसामध्ये तिवारीजींनी विधायक कामासाठी संस्था काढली आहे. येथे नदीचे पाणी वळवून त्या जलशक्तीवर चीड वृक्षाच्या लाकडाचे रेल्वेचे स्लीपर्स बनवले जातात. तसेच माल्टा फळांचा रस काढून तो बाटलीबंद करून विक्रीसाठी पाठविला जातो. फळापासून टिकाऊ पदार्थ बनवण्याचे प्रशिक्षण देण्याची सोय येथे आहे. संस्थेमार्फत बालवाड्याही चालविल्या जातात, पण या संस्थेत लोकांचा सहभाग कितपत असेल असा प्रश्न तेथील वातावरण पाहून आम्हाला पडला. दोगडीमध्ये आनंदसिंगजी काम करतात. त्यांचे काम लोकात रुजले आहे असे वाटले. नदीचे पाणी पाटाने वळवून इच्छित ठिकाणी उंचीवर आणून त्या जलशक्तीवर पिठाची गिरणी, तेलाची घाणी आणि विशेष म्हणजे वीज निर्माण केली आहे व ही वीज दोगडी गावाला पुरवली आहे. तेलाची घाणी काढल्यामुळे येथे सरसोंचे (मोहरी) उत्पादन वाढवता आले आहे.

कार्यकर्ते अभिमानाने सांगत होते की, आमची वीज आम्हीच निर्माण केली आहे. गावातल्या अर्ध-शिक्षित–अशिक्षित लोकांनी हे काम पूर्णपणे स्वतः केले आहे. वीजमंडळाच्या असहकाराला त्यांनी हे चोख उत्तर दिले. उत्पादन ३५ किलोवॅट करून कांडई, बंबियनालाही वीज द्यायची अशी पुढची योजना आहे. सध्या ३ किलोवॅट वीजनिर्मिती होते.

चिपको किंवा खरे तर सर्वोदय संघटनेचे काम या भागात रुजलेले दिसते. कठूर, गैर, पाडोलीसारखी अस्पृश्य गावे आहेत तरीही कामाविषयी लोकांना माहिती आहे. पर्यावरणाची कल्पना लोकांच्या जीवनात शास्त्र म्हणून आली आहे. संघटनेच्या कामाचे हे यश मानायला हवे. नाही तर भारतीय संस्कृतीतील दैववादी उत्तर लोकांनी येथेही स्वीकारले असते. भौगोलिक पर्यावरणाबाबत लोकांच्यात जाण असली तरी सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण मात्र बिघडलेल्या अवस्थेत आहे. जातीचा जहरी नाग या समाजाला विळखा घालून बसला आहे. उच्चनीच भेद सर्वांच्या मनात पक्का आहे. सार्वजनिक जीवनातून हा भेद नाइलाजाने सोडावा लागतो पण गावात हा भेद मोठा दिसतो. स्त्रियांची परिस्थितीही अशीच आहे. दलित आणि स्त्रियांना मिळणारी वागणूक आंदोलनाच्या प्रभावाने बदललेली अजून तरी दिसत नाही. आंदोलनाचा तसा रोखही दिसत नाही. धार्मिक भावनांचा पगडा सर्व वातावरणावर फार मोठा आहे. यातून कार्यकर्तेही सुटलेले दिसत नाहीत. येथील निसर्ग, तीर्थक्षेत्रांची मोठी संख्या, मोठ्या प्रमाणावर येणारी यात्रेकरूंची संख्या याने हे वातावरण भारावलेले आहे.

चिपको आंदोलनात स्त्रियांचा सहभाग प्रथमपासून असल्याचे समजते. रेणीची लढाई स्त्रियांनी सुरू केली अशा हकीकती ऐकायला मिळाल्या. गोपेश्वरला जयंती-देवीसारख्या जुन्या कार्यकर्त्या भेटल्या ज्यांनी तुरुंगवासही भोगला आहे. गोपेश्वरला महिला मंगल दलाचे कार्य अनेक वर्षे चालू आहे. नित्य जंगल आणि पत्थर राखण्याचे काम या स्त्रिया करत आहेत. या स्त्रिया स्वतःच्या कामाचे ओझे सांभाळून वृक्षसंवर्धन–रक्षण या कामात भाग घेत आहेत. आंदोलनाच्या नेतृत्वात यांना अजून वाव द्यायला पाहिजे असे फार वाटते. या आंदोलनाच्या प्रभावामुळे जंगलखाते बरेच नरम आले आहे. त्यांचा भ्रष्टाचार थांबल्यामुळे त्यांच्या अस्तित्वाचा मूळ आधारच गेला असावा. शिवाय गावाने वनरक्षण–संवर्धन ही कामे स्वयंस्फूर्तीने स्वतः-कडे घेतल्यावर यांना फारसे कामही उरले नसावे काही गावांनी स्वतःच्या रोपवाटिका (नर्सरी) तयार केल्या आहेत. गोपेश्वरला 'दालियोंका दगड्या'ची छोटीशी पण स्वयंपूर्ण रोपवाटिका हे एक चांगले उदाहरण वाटले. दालियोंका दगड्या म्हणजे वृक्षमित्र ही छात्रांची संघटना आहे. कॉलेजमधील युवकांची ही संघटना

आहे. वर्षातून दोन-तीन शिबिरे भरवून हे युवक वृक्षा-रोपणाच्या मोहिमा हाती घेतात. या कार्यकर्त्यांवर अधिक लक्ष केंद्रित करायला हवे असे फार वाटते. परिवर्तनाची प्रेरकशक्ती म्हणून हे युवक फार महत्त्वाचे आहेत. डेहराडूनच्या सरकारी वन-संशोधन-संस्थेने या साऱ्या कामाचा जितका आपुलकीने अभ्यास करायला हवा तसा तो केलेला दिसला नाही. त्यांच्या कामाचा हा भाग असायला हवा असे वाटते. जंगल-ठेकेदार, वनरक्षक (सरकारी) न भेटल्याने त्यांच्या दृष्टिकोना-विषयी माहिती मिळू शकली नाही.

### जन–वन–नाते

हे सारे बघत असतांना सतत मनात आपल्या भागातला प्रश्न कार्यकर्त्यांना जाणवत होता. महाराष्ट्रा-तले उजाड झालेले डोंगर, उजाड माळराने ही डोळ्यां-समोरून हलत नव्हती. पाऊस १० इंच असो वा २५० इंच असो परिस्थिती एकच होऊ लागली आहे लोकांना झाडे निश्चित हवी आहेत, पण भावनिक; नाते निर्माण करून जन-वन-नाते निर्माण करावे लागेल आणि यात स्त्रिया फार महत्त्वाच्या जागेवर (key-position) काम करू शकतील. स्त्रियांना या कामात कसे गुंतवता येईल हे बघायला हवे. सामाजिक वनीकरणाच्या योजना आता सरकारी स्तरावर येऊ लागल्या आहेत. त्या लोकांपर्यंत पोचवून, त्यांच्या जाणिवा जागृत करून या योजनांना योग्य वळण देणे, त्यांना पूरक योजना आखणे हे काम स्वयंसेवी संघटनाना करावयात हवे.

उत्तराखंडातील गढवालच्या विविध विभागांतून (उत्तरकाशी, टेहरी, पौडी व चमोली या जिल्ह्यातून) विखुरलेले पाचही गट दि. १५ मार्च रोजी श्रीनगर (गढवाल) या मध्यवर्ती जागी एकत्र जमले. श्रीनगरच्या पुढील दोन दिवसांच्या मुक्कामात गट–अहवाल सादर करणे, इंस्टिटयूट ऑफ हिमालयन स्टडीज व रिजनल डेव्हलपमेंट आणि गढवाल विश्व-विद्यालयातील प्राध्यापक-विद्यार्थ्यांशी चर्चा व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

• • ०

## पाहणी अहवालातील महत्त्वाचे मुद्दे

सर्व-प्रथम प्रत्येक गट-प्रमुखाने आपल्या गटातील साथीदारांसह पहाणीचा गट-अहवाल सादर केला. अह-वाल व त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेतील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे –

१) मोहिमेचे भौगोलिक-क्षेत्र जरी गढवालपुरतेच मर्यादित असले तरी नैसर्गिक व सामाजिक परिस्थिती 'चिपको' आंदोलनाची व्याप्ति, कार्यपद्धती, प्रभाव यामध्ये खूप विविधता आढळली. इतकेच नव्हे तर अलकनंदेच्या दोन तीरांवरील परिस्थिती वेग-वेगळी आढळली.

२) हिमालयातील व महाराष्ट्रातील नैसर्गिक परि-स्थितीमध्ये फरक आहे. जंगल-तोडीच्या भीषण परि-णामांची कल्पना हिमालयात जितक्या तीव्रतेने, तातडीने, व स्पष्टपणे जाणवते तेवढी महाराष्ट्रात जाणवत नसली तरी त्यामुळेच धोका जास्त आहे. लोकांना आत्तापासूनच सावध करण्याचे अवघड काम कार्यकर्त्यांना करायचे आहे.

३) उत्तरखंडात लोकजीवन व जंगल यांचा घनिष्ठ संबंध आहे. अनेक गावातून व्यापारी जंगल-तोड थांब-विण्याचे यशस्वी प्रयत्न झाले आहेत. काही ठिकाणी जंगलाची लागवडही करण्यात आली आहे; पण वाढती लोकसंख्या, तिच्या वाढत्या गरजा, उपलब्ध जागा आणि संरक्षण, धरणे-रस्ते यांच्या योजना यांचा एकत्रित व संतुलित विचार होऊन कार्यक्रम आखणे अत्यावश्यक आहे. सध्या प्रत्येकजण आपापल्या मर्यादित भूमिकेतूनच या प्रश्नाचा विचार करताना आढळतो.

३) वन-विनाशामुळे उद्भवलेल्या भीषण परि-णामांची व्याप्ती फक्त उत्तरखंडापुरतीच मर्यादित नाही, तर गंगेच्या खोऱ्यावरही त्याचे दूरगामी परिणाम घडत आहेत, घडणार आहेत. त्याप्रमाणेच महाराष्ट्राच्या वन-विभागात होणाऱ्या वन-विनाशाचे परिणाम त्या विभागापुरते वा आदिवासींपुरतेच मर्यादित रहाणार नसून सर्वदूर घडणार आहेत हे प्रथम आपण समजावून घेतले पाहिजे व इतरांना समजावून दिले पाहिजे.

४) पर्यावरणाच्या समस्या सामाजिक असमानतेशी निगडित आहेत व त्या सामाजिक संदर्भ सोडून सोडविता

येणार नाहीत. उदा० मूठभर श्रीमंत लोकांच्या हातात जोपर्यंत बहुतांश सुपीक जमीन आहे, तोपर्यंत बहुसंख्य गरीब जनतेचे जंगल-पहाडी जमिनीवरचे आक्रमण व पर्यायी दुष्टचक्र चालूच रहाणार.

मात्र त्याबरोबरच सामाजिक असमानता दूर करणाऱ्या जमीन-मालकीच्या नवीन कायद्यांबरोबर पर्यावरणाची जाणीव आपोआप वाढीस लागत नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

५) पर्यावरण गरजा – सरपण-चाऱ्याची मागणी व रोजगार यांचा एकत्रित विचार करणाऱ्या वनी-करणाच्या योजना आखल्या पाहिजेत. तसेच अनुत्पादित शेतीकडून 'वन-शेती' अथवा वन आणि शेतीच्या मिश्रणाकडे लोकांना आकर्षित करणाऱ्या योजना पाहिजेत.

६) वन-संवर्धनाचा अर्थ अनेकदा नुसती झाडे लावणे (ती पण निलगिरीसारखीच) असा घेतला जातो. वन-संवर्धनातील महत्त्वाचा भाग असलेल्या जंगलाचे रक्षण करणे व त्यासाठी वैध-अवैध जंगलतोड थांबवणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी 'चिपको' आंदोलनात उपयोगात आणलेल्या लोक-जागृतीच्या निरनिराळ्या तंत्रांचा विचार करणे.

लोकजागृतीसाठी, विशेषत: वन-संवर्धनासाठी कला-माध्यमचा परिणामकारक उपयोग करणे, कला-पथकाचे कार्यक्रम बसविणे.

७) नैसर्गिक साधन– संपत्तीचा उपयोग करणारी पाणचक्कीसारखी साधने आपल्या भागात सुरू करणे. तसेच आपले गाव-आपले पाणी, यासारख्याच आपले गाव व आपली वीजयोजनेचा पाठ पुरावठा करणे स्वत:ची नर्सरी बनविण्याचाहि प्रयत्न करणे.

८) विशिष्ट परिस्थितीमुळे 'चिपको' आंदोलनात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. वन-हक्काबाबत मोठ्या प्रमाणावर जागृतीही आहे. तथापि स्त्रीचे एकंदरित सामाजिक स्थान गौणच आहे. अशा लोक-आंदोलना बरोबर स्त्री मुक्ती आंदोलन कसे जोडून घेता येईल याचा विचार करणे.

परिस्थितीच्या रेट्यामुळे नाही तर लोक आंदोलनाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून इतरत्रही स्त्रीयांना कसे सामावून घेता येईल याची आखणी करणे.

९) लहानपणापासूनच मुलांना झाडांबाबत गोडी कशी निर्माण करता येईल या दृष्टीने गोष्टी, चित्रे, कविता करणे.


१०) संकलिपत वन-बिधेयकाची माहिती करून घेणे व त्याबाबत काम करणाऱ्या संघसाधनांशी संपर्क करणे.

१६ मार्चला संध्याकाळी 'इस्टिटयूट ऑफ हिमालयन स्टडीज' चे प्रमुख डॉ. तेजवीर सिंग यांच्याशी चर्चा व स्लाईड-शो असा कार्यक्रम पार पडला. डॉ. सिंग यांनी मानव व पर्यावरण यांचा संबंध आपल्या खास लखनवी हिंदीत समजावून सांगितला.तसेच हिमालयाच्या परिसरातील फुलां-फळांच्या-शिखरांच्या सुंदर स्लाईडस्हि दाखवल्या. १७ मार्चला सकाळी सर्व पथकाने गढवाल विश्व-विद्यालयास भेट दिली व प्राध्यापक-विद्यार्थ्यांशी आपल्या अनुभवांची-विचारांची देवाण-घेवाण केली. विश्व-विद्यालयातील वानिकी विभागाचे प्रमुख डॉ. भगवती नौटयाल यांनी वानिकी-विद्येची ओळख करून देतानाच मानव व निसर्ग या बाबत मूलभूत मुद्दे उपस्थित केले व आपण आपल्या भोगवादी प्रवृत्तीला आळा घातल्याशिवाय पर्यावरण-रक्षण कसे करणार असा रोकडा सवाल केला !

दि. १५ व १७ मार्च रात्री गढवाली व मराठी लोकगीतांचे कार्यक्रम बहारदार झाले. १८ मार्चला पहाटे सर्व पथक श्रीनगरहून हरिद्वारमार्गे दिल्लीला आदिम जाती सेवा संघाच्या वसतिगृहात मुक्कामाला आले. १८ मार्चला सकाळी मा. पंतप्रधानांची भेट ठरली होती. त्याप्रमाणे सर्व पथक नियोजित वेळी त्यांच्या निवास-स्थानी गेलेही; पण आयत्या वेळी सर्व भेटी रद्द केल्या गेल्याने सर्वांची निराशा झाली. १९–२० मार्च रोजी दिल्ली व आग्रा-फत्तेपूर-शिक्री-मथुरादर्शनाचा कार्यक्रम झाला.

१९ मार्च रोजी झालेल्या मोहिमेच्या मूल्यमापनाच्या सत्राममध्ये कार्यकर्त्यांनी मोहिमेतील सभासदांची निवड, पूर्व-तयारी, मोहिमेचा कालावधी, पाठपुरावा याबाबत आपले विचार व्यक्त केले. २१ मार्च रोजी मोहिमेतील कामाचा पाठपुरावा करण्याविषयी झालेल्या सत्रा मध्ये काम परिणामकारकपणे होण्यासाठी कामाची विभागणी करण्यात आली.

अभ्यास- मोहीम पूर्ण करून पथक दि. २३ मार्चला मुंबईस परतले.



परिशिष्ट १

# हिमालयातील पर्यावरण अभ्यास–पाहणी मोहिमेसाठी तयार करण्यात आलेली प्रश्नावली

१) गावाचे नाव – जिल्हा – पोस्टाचा पत्ता.

२) गावाची समुद्रसपाटीपासून उंची – हमरस्त्यापासूनचे अंतर – शाळा, पोस्ट, बँन्क, वीज, बस इत्यादि सोयी.

३) गावाची लोकसंख्या – कुटुंब संख्या – प्रमुख जातींची नावे – गावाच्या वस्तीची रचना व विभागणी– घरांचे प्रकार, आतील व्यवस्था.

४) गावातील सरासरी जमीन धारणा – प्रमुख पिके व हंगाम – पाट-बंधारेच्या सोयी – शेतीमधील सरासरी उत्पन्न – गेल्या दहा वर्षातील चढउतार – कारणे – नैसर्गिक, मानवी वा इतर काही ? शेतमजुरी – जमीनदार (असल्यास) – शेतमजूर संबंध – गावातील इतर प्रमुख व्यवसाय – विशेषत: जंगलाशीसंबंधित व्यवसाय.

५) घरातील सरासरी जनावरांची संख्या – प्रकार – गेल्या दहा वर्षातील बदल – कारणे (उदा० महाराष्ट्रातील गवळी, धनगर)

६) गाव व जंगल परस्पर संबंध – गावाभोवती जंगल होते ! आहे काय ? कोणत्या प्रकारचे – उदा० सूचिपर्णी – रुंदपर्णी – लोकांच्या उपयोगाची झाडे – पूर्वी त्यापासून मिळणारे उत्पन्न – जंगलांची आजची स्थिती – जंगलनाश होत असल्यास त्याला जबाबदार कोण ? याबाबत तपशीलासह उदाहरणे.

७) गेल्या दहा वर्षात गावावर ओढवलेल्या नैसर्गिक आपत्ती – उदा० पूर, कडे कोसळणे इत्यादि. (जागांना शक्यतो भेट द्यावी) – लोकांच्या मते आपत्तीची कारणे.

८) जळण, चारा, पाणी मिळण्याच्या जागा, अंतरे, अडचणी – गेल्या दशकातील बदल – गावकऱ्यांच्या मते त्याची कारणे – तुम्हाला जाणवणारी कारणे – कार्यकर्त्यांचा आपल्या भागातील अनुभव.

९) गावातील स्थलांतरीतांचा प्रश्न – स्थलांतर कोण करतात, कुठे करतात ? कारणे – गेल्या दशकातील परिस्थिती – स्थलांतरित व जंगले यामध्ये काही संबंध ? कार्यकर्त्यांचा याबाबत आपल्या भागातील अनुभव – कारणमीमांसा.

१०) गावामध्ये पुरुष – स्त्रिया – म्हातारे – लहान मुले – जास्त कोण आढळले ? कारणे ? स्त्रिया कोणती कामे करतात ? गेल्या दशकातील कामाच्या स्वरूपात व प्रकारात बदल – कारणे – स्त्रीचे समाजातील एकूण स्थान – खास प्रश्न – जागृती.

११) 'चिपको' आंदोलनाची लोकांना माहिती आहे काय ? केव्हा व कशी झाली ? नेमके काय घडले ? लोकांचा सहभाग किती व कोणत्या प्रकारचा ? लोकांच्या दृष्टीकोणातून 'चिपको' आंदोलनाचे मूल्यमापन – आंदोलनाने सोडवलेले व न सोडवलेले प्रश्न. 'स्त्रियांचा 'चपको' आंदोलनाबाबतचा दृष्टिकोन सहभाग कसा व कोणत्या प्रकारचा ? गावकऱ्यांना विशेषत: स्त्रियांना आंदोलनाकडे आकर्षित करणारी खास तंत्रे – स्त्रीयांनी संघटित होऊन सोडवलेले प्रश्न न सुटलेले प्रश्न – कारणे.

१२) गावातील वन कर्मचारी, वन-मजूर व जंगल ठेकेदार यांचा आंदोलनाकडे बघण्याचा दृष्टिकोन – व– संवर्धनाबाबतचे त्यांचे विचार.

१३) वन संवर्धनाबाबत गावकऱ्यांकडून होणारे प्रयत्न – सरकारतर्फे होणारे प्रयत्न – कोणत्या प्रकारचे ? लोकांचा सहभाग – लोकांच्या दैनंदिन गरजा उदा० जळण, चारा, भाकरीचा प्रश्न, राष्ट्रीय गरजा व वन संवर्धन यामध्ये कसा मेळ घालता येईल ? लोकांचे विचार व नेमक्या योजना – तुमचे विचार व नेमक्या योजना.

१४) गावातील वास्तव्याचा काळ – केव्हा पोचला – निघाला. विशेष घटना – कार्यक्रम.

–०–

'हाकारा' पहिला, जानेवारी १९८० : जबरन ज्योत जंगल जमीन खास विभाग

'हाकारा' दुसरा, एप्रिल १९८० : 'आदिवासी व शिक्षण' खास विभाग

'हाकारा' तिसरा, जुलै १९८० : 'आदिवासी व वन-संवर्धन' खास विभाग

'हाकारा' चौथा, ऑक्टोबर १९८० : 'आदिवासी साहित्य व कला' खास विभाग

'हाकारा' पाचवा, जानेवारी १९८१ : 'नोकरीतील राखीव जागा' खास विभाग

१) दलितांच्या सवलती —गं. बा. सरदार,
२) राखीव जागा माहिती —पत्रके
३) दलितांच्या सवलती काही गैरसमजुती —रा. प. नेने
४) राखीव जागा-शासकीय आदेशांची उपयुक्त माहिती
५) अनु. जाती—जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती इतर मागास जाती यांची समग्र यादी
६) वनशेती — शंकर रंगनाथन्
७) आदिवासी व वनखाते—अतिरिक्त वन—संरक्षक आदि माहितीपूर्ण मजकूर.

'हाकारा' सहावा, एप्रिल १९८१ : 'आदिवासी आणि आरोग्य' खास विभाग

१) डॉ. अल्बर्ट स्वाइट्झर —रंगनाथ गोडबोले
२) मलेरियाची गोष्ट —अरविंद पटवर्धन
३) आदिवासी आणि अनुवांशिकता —एस. एल. काटे
४) ग्राम आरोग्य प्रकल्प—कोसबाड —अनुताई वाघ
५) आदिवासींची श्रद्धास्थाने —वि. म. गोगटे
६) ह्यो दवाखाना आमासाठी हाये —के. आर तोरसकर
७) आदिवासी आणि आधुनिक वैद्यक —अनंत फडके
८) औषधी परिचय — मेहता ट्रस्टचे बहुमोल कार्य औषधी पेटी, होमिओपथी इत्यादि माहितीपूर्ण मजकूर.

'हाकारा' सातवा, जुलै १९८१ : 'वनशेती व वनसंवर्धन' खास विभाग

१) धनगराला धत्तुरा, शहरवाल्यांना मलिदा — जगदीश गोडबोले
२) जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती — दीनानाथ मनोहर
३) वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था — ब्रह्मदेव शर्मा
४) निलगिरीची वनशेती — आनंद मसलेकर
५) वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास —इत्यादि माहितीपूर्ण मजकूर

'हाकारा' आठवा, आक्टोबर १९८१ : 'रोजगार हमी योजना' विशेषांक

१) रोजगार हमी योजने-अंतर्गत वनीकरण काही विचार —डॉ. अरविंद रेड्डी
२) रोजगार हमी योजना —डॉ. मधुसूदन साठे
३) हमी योजनेवरील मजुरांचे अनुभव —भिमसिंग गिरासे
४) हमी योजनेचा आढावा व शिफारसी —निकीभाऊ कार्डोझो
६) हमी योजनेसंबंधी महाराष्ट्राचा अधिनियम तसेच हमी योजनेसंबंधीच्या सरकारी आदेशातील महत्त्वाचा भाग.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# हाकारा . . .

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणही सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन ! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| सभासद | २० रुपये वार्षिक |
| आणि | |
| हाकाराची वार्षिक वर्गणी | १५ रुपये |
| हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी | २० रुपये फक्त |

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

नवीन पत्ता—

**महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद**
द्वारा, जगदीश गोडबोले,
'सीमा', ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४.

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.